CMYK

आजचा सामना
राजस्थान वि. कोलकाता
वेळ : दु.३.३० वाजता
ठिकाण : कोलकाता

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

आजचा सामना
पंजाब वि. लखनौ
वेळ : सायं. ७.३० वाजता
ठिकाण : चंदीगड

लातूर | रविवार, १९ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ४२ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ‘तरुण भारत’ सामाजिक बांधिलकीचे प्रतीक

## भय्याजी जोशी यांचे प्रतिपादन ● दैनिक तरुण भारतच्या पुणे आवृत्तीचे थाटात लोकार्पण

**पुणे, १८ एप्रिल**

भारतात स्वातंत्र्यानंतर वेगळी भूमिका आणि ध्येयवादी विचार देणारी स्वतंत्र वृत्तपत्रे मोठ्या संख्येने आवश्यक होती. मात्र, काळाच्या ओघात व्यापारी आणि राजकारण्यांनी आपल्या सोयीसाठी वृत्तपत्रांना व्यावसायिक भूमिका दिली. मात्र, तरुण भारत हे एकमेव असे वृत्तपत्र आहे, ज्याने कुठलीच व्यावसायिक भूमिका न घेता समाजाला सदैव योग्य दिशा दिली. त्यामुळेच तरुण भारत हे सामाजिक बांधिलकीचे खरे प्रतीक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह सुरेश उपाख्य भय्याजी जोशी यांनी शनिवारी केले.

श्री नरकेसरी प्रकाशनाच्या दैनिक तरुण भारतच्या पुणे आवृत्तीचा लोकार्पण सोहळा फर्ग्युसन महाविद्यालयातील सभागृहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, श्री नरकेसरी प्रकाशनाचे कार्याध्यक्ष अनिल दांडेकर, व्यवस्थापकीय संचालक धनंजय बापट, मुख्य संपादक शैलेश पांडे आणि पुणे आवृत्तीचे निवासी संपादक सचिन कापसे उपस्थित होते. या सोहळ्यात विविध विषयांवरील पुरवण्यांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर वी-अजाईल कंपनीचे तुषार आचार्य, वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष विजय पारगे, मुख्य वितरक धनंजय लेंडे, छपाई विभागाचे प्रमुख लक्ष्मण मोरे (उर्वरित वृत्त पान ३ वर)



फर्ग्युसन कॉलेज, ॲम्फी थिएटर येथे तरुण भारत, पुणे आवृत्तीचे शनिवारी थाटात लोकार्पण झाले. यावेळी (डावीकडून) श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे कार्याध्यक्ष अनिल दांडेकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी, श्री रामजन्म भूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष श्री स्वामी गोविंददेव गिरी महाराज, व्यवस्थापकीय संचालक धनंजय बापट, महापौर मंजूषा नागपुरे, निवासी संपादक सचिन कापसे, मुख्य संपादक शैलेश पांडे

पुण्याच्या वैचारिक भूमीत प्रगल्भ विचाराचे पुनरागमन होत आहे. हा अपूर्व योग जुळून आला असून ही अभिमानाची बाब आहे. पुणे हे नेहमीच विचारांचे केंद्र राहिले आहे. विचारांची दिशा देणारे वृत्तपत्र पुण्यात नसल्याची उणीव गेल्या अनेक वर्षांपासून भासत होती. कारण सध्याच्या माध्यमांचे स्वरूप बदलले आहे. व्यावसायिकता हाच एकमेव निकष माध्यमांपुढे आहे. त्यामुळे चांगले विचार आणि माहिती देणाऱ्या वृत्तपत्रांची गरज आहे. माध्यमांचा अंकुश जेव्हा प्रभावीपणे वापरला जातो तेव्हा नक्कीच समाजात बदल घडून येतो, त्या समाजहिताच्या दृष्टीने तरुण भारत नक्कीच चांगले योगदान देईल.

- मंजूषा नागपुरे, महापौर, पुणे.

राष्ट्रीय विचारांचे परखड दैनिक असावे. हा माझा, तो माझा असे न करता परखड मत व्यक्त करणारे वृत्तपत्र अपेक्षित आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आली तेव्हा तरुण भारतला फटका बसला. प्रमोद महाजन यांच्या काळात तरुण भारतच्या पुनरुज्जीवनाचा प्रयोग झाला होता. मात्र, तो यशस्वी झाला नाही. स्वयंसेवक या नात्याने पुणे तरुण भारत आता कधीही बंद होणार नाही, याची आम्ही पूर्ण काळजी घेऊ. या वर्तमानपत्राचा खप नक्कीच वाढणार आहे. पुणेकर आणि समाजातील चांगल्या विचारशक्तींचा आर्थिकदृष्ट्याही सक्षम पाठिंबा या दैनिकाला असेल.

- चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

# विरोधकांनी चिरडली महिलांची स्वप्ने

## पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल ● संविधानाच्या निर्मात्यांच्या भावनांचा केला अपमान

**नवी दिल्ली, १८ एप्रिल**

लोकसभेत शुक्रवारी जे घडले, ते केवळ बाके वाजवणे नव्हते, तर तो देशातील महिलाशक्तीच्या स्वाभिमानावर आणि आत्मसन्मानावर केलेला प्रहार होता. स्त्री सर्व काही विसरू शकते, पण आपला अपमान ती कधीच विसरत नाही. काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन अधिनियंम (१३१ वी घटनादुस्ती) विधेयकाला विरोध करून महिलांचा स्वप्ने चिरडली. महिलांच्या आरक्षणामध्ये अडथळे आणणाऱ्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, अशा कठोर शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी विरोधकांवर हल्लाबोल केला.

महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी शनिनारी रात्री ८.३० वाजता देशवासीयांना संबोधित केले. महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधकांवर घणाघात करताना ते म्हणाले, आज भलेही हे विधेयक पारित करण्यासाठी ६० टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. *(वृत्तसंस्था)*



### परिसीमनावर अपप्रचार

या विधेयकामुळे अधिक तामिळ लोक हे संसदेत आले असते. परंतु द्रमुकने त्याला विरोध केला. समाजवादी पक्षाने तर राम मनोहर लोहिया यांच्या विचारसरणीचा कधीच त्याग केला आहे. तृणमूलने कधीही महिलांच्या सन्मानाचा आदर केला नाही. काँग्रेसने जनधन, आधार, डिजिटल पेमेंट यासह तिहेरी तलाक, कलम ३७० हटवण्याला विरोध केला. सर्व प्रयत्नांनंतरही आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही. परिसीमनाबाबत जाणीवपूर्वक खोटे बोलले गेले. तांत्रिक पेच निर्माण करून देशाला चुकीचे सांगण्यात आले.

### फोडा आणि राज्य करा काँग्रेसचे सूत्र

नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली असून, याची किंमत त्यांना मोजावी लागेल. नारीशक्ती वंदन विधेयक हे प्रत्येकाला काही तरी देणारे होते, कुणाचेही काहीही काढून घेणारे नव्हते. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे मतदारसंघांमध्ये मोठी वाढ होणार होती. परंतु, काँग्रेसला ते नको होते. फोडा आणि राज्य करा हे सूत्र काँग्रेसच्या अंगवळणी असल्याचे मोदी म्हणाले.

## राज्यात दोन दिवस वादळी पावसाची शक्यता

**मुंबई** : राज्यातील विविध भागांत २० ते २२ एप्रिलदरम्यान मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, खान्देश, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरणासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. वजांचा कडकडाट, जोरदार वारे तसेच गारपीट होण्याचीही अंदाज आहे.

Suyash
नवीन प्रवेश
- इ.१०वी बोर्ड परीक्षेला बसलेले विद्यार्थी
  ❖ ११वी सायन्स रेग्युलर (JEE,NEET,CET)
  ❖ ब्रीज कोर्स(फक्त एप्रिल व मे)
- १२वी सायन्स
- १०वी व्हेकेशन बॅच(एप्रिल/मे) (Science, Maths, English)
- मूलभूत शिक्षण,स्पर्धा परीक्षा (JEE,NEET,CET पूर्ण तयारी)
- शास्त्रज्ञ,शिक्षक,प्रोफेसर इत्यादीसाठी लागणारे पायाभूत ज्ञान, सर्व प्रॅक्टीकल्स व प्रोजेक्टसहित
- निवासी/अनिवासी/बस सुविधा

‘सुयश’ची विद्यादान योजना
- आर्थिकदृष्टया दुर्बल मुलां-मुलींसाठी संपूर्ण शिक्षण मोफत व इतर सुविधा(अल्प शुल्क)
- इतर विद्यार्थ्यांसाठी शुल्कमध्ये २०-२५% स्कॉलरशिप

सुयश ज्युनिअर कॉलेज
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मोबा.७६२०७०९२३७, ९७३०७०१४०७,

प्रवेश चालू
CBSE/STATE BOARD
- CBSE Nursery ते ५वी, ७वी ते १०वी
- State Board(semi. Eng.) ५वी, ७वी ते १०वी
- विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील NTS, MTS, NEET, JEE पूर्वतयारी. Foundation classes मोजक्याच जागा उपलब्ध आहेत. त्वरीत संपर्क साधावा.

सुयश गुरुकुल/सेंट्रल स्कूल(CBSE)
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मोबा.७६२०७०९२३७




# अल्पवयीन मुलीवर बलात्कार; तरुणाला वीस वर्षांची सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ एप्रिल-**

एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी राजकुमार सायबु खेत्री (वय-२३, रा.आहेरवाडी, ता.दक्षिण सोलापूर) या तरुणाला विशेष न्यायाधीश जे.जे.मोहिते यांनी वीस वर्षांची सक्तम जुरी आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पीडित अल्पवयीन मुलगी आणि आरोपी हे सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात आले होते. मोबाईलवरुन ते दोघे संवाद साधत असत. दि.८ डिसेंबर २०२० रोजी सकाळी यातील आरोपी राजकुमार खेत्री याने पिडीतेला एका मंदिराजवळ बोलावून घेत तेथून तिला मोटरसायकलवरुन आपल्या घरी नेले.

त्यावेळी घरात कोणीही नव्हते. तेव्हा आरोपी राजकुमार खत्री याने तिच्या संमतीशिवाय शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर, त्याने तिला तिच्या घरी सोडले. पुन्हा दि.११ डिसेंबर २०२० रोजी सकाळच्या सुमारास पिडीतेला मामाच्या शेतात नेले आणि तिथेही त्याने तिच्यावर संमतीशिवाय लैंगिक अत्याचार केला. दरम्यान, दि.३१ डिसेंबर २०२० रोजी पीडिता आणि तिच्या आईमध्ये घरकामावरून भांडण झाले. पीडितेने आरोपी राजकुमार खेत्री यास याबद्दल माहिती दिली. दि.१ जानेवारी २०२१ रोजी आरोपी राजकुमार खेत्री याने पिडीतेला पुन्हा त्या मंदिराजवळ बोलावून घेतले. तेथून अन्य दोन मंदिरात नेले. पुढे कर्नाटक राज्यातील आगरखेड येथील एका गावात नेले. ही सर्व घडलेली घटना पीडितेने तिच्या आईला सांगितली. त्यानंतर पिडीतेच्या नातेवाईकांनी विजापूर नाका पोलिस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली. यावरुन बलात्कार तसेच पोक्सो कायदयानुसार गुन्हा दाखल करुन आरोपी राजकुमार खेत्री यास अटक केली.

पोलिस उपनिरीक्षक वाय. एस.गायकवाड यांनी या गुन्ह्याचा तपास करुन न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी विशेष न्यायाधीश जे.जे. मोहिते यांच्यासमोर झाली. सरकारी पक्षातर्फे एकूण ७ तर आरोपीच्या वतीने २ साक्षीदार तपासण्यात आले. न्यायालयाने सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीस २० वर्षांचा सक्त मजुरी आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. सदर खटल्यात सरकारच्यावतीने ॲड.कविता बागल, ॲड.शितल डोके, ॲड.एस.एस.क्यातम तर आरोपीच्या वतीने ॲड.ए.एन. शेख यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून एस.एस. घाडगे यांनी मदत केली.

# महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ

## ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांसह ६९ लाख निवृत्तीवेतनधारकांना फायदा

**नवी दिल्ली, १८ एप्रिल**

देशभरातील लाखो कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना मोठा दिलासा देत केंद्र सरकारने महागाई भत्त्यात दोन टक्के वाढीस मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे, डीए आता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के झाला आहे.

ही वाढ १ जानेवारी २०२६ पासून लागू होईल, अशी घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केली. केंद्र सरकारच्या या घोषणेचा फायदा सुमारे ५० लाख केंद्र सरकारी कर्मचारी तसेच ६९ लाख निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना होईल.



यामुळे त्यांचे मासिक उत्पन्न वाढेल आणि महागाईच्या काळात त्यांना आर्थिक दिलासा मिळेल. डीए वाढीमुळे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन आणि निवृत्तीवेतन थेट वाढेल. ही वाढ सातव्या वेतन आयोगाअंतर्गत येणाऱ्या सर्व कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना लागू होईल. महागाई भत्त्याचा (डीए) मुख्य उद्देश कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या उत्पन्नाचे महागाईच्या परिणामांपासून संरक्षण करणे हा आहे. तो मूळ वेतनाच्या टक्केवारीनुसार निश्चित केला जातो आणि वर्षातून दोनदा सुधारित केला जातो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### बार्शीच्या पोदार लर्न स्कूलचे सीबीएसई दहावी परीक्षेत यश

**बार्शी, दि. १८ एप्रिल-**

**सलग तिसऱ्या वर्षी १०० टक्के निकाल**

शहरातील फिनिक्स पोदार लर्न स्कूलने माध्यमिक शालांत परीक्षेत सलग तिसऱ्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली. यंदा शाळेचा विद्यार्थी समर्थ गवळी याने ९८ टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून सलग दुसऱ्या वर्षी शाळेचा विद्यार्थी तालुक्यात अव्वल ठरला आहे. तसेच शाळेचे सहा विद्यार्थी तालुक्यात द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले आहेत. यामध्ये समृद्धी कांबळे (९६.४ टक्के), अक्षरा देशमाने (९६.२ टक्के), हिंदवी इंगळे (९५.८ टक्के), विराज आडकर (९५.४ टक्के), रिचा गुगळे (९४.६ टक्के) या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले. शाळेच्या मार्गदर्शक विजय कबाडे, संस्थेच्या अध्यक्षा वैशाली कबाडे, सचिव संदीप बरडे आणि मुख्याध्यापक रविराज बेलुरे यांनी यशस्वी विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले.




### महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त 'कायकवे कैलास'वर व्याख्यान

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर व ड्रीम फाऊंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'कायकवे कैलास' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. 'कायकवे कैलास' या तत्वज्ञानाचा अर्थ काम हीच पूजा असा असून प्रामाणिक परिश्रमातूनच यश मिळते,हा संदेश व्याख्यानातून अधोरेखित करण्यात आला. या कार्यक्रमात वक्ते म्हणून सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथ वडतीले यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून समाधान हॉस्पिटल, सोलापूर येथील डॉ. मल्लिकार्जुन तरनळ्ळी उपस्थित होते. कार्यक्रमात विविध उद्योजकांनी आपले अनुभव मांडत प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. रोजगाराच्या बदलत्या संधी व उद्योजकतेचे महत्त्व यावर त्यांनी माहिती दिली. नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी निर्माण करणारे बना असा संदेश त्यांनी दिला.

### सौंदरे येथे विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**बार्शी, दि. १८ एप्रिल-**



बार्शी तालुक्यातील सौंदरे गावात एका २६ वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, घटनेमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलीस तपास सुरु आहे. रोहिणी सागर बोंदरे (वय २६) यांनी शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी दुपारी २-३० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच तिचे पती सागर बोंदरे यांनी तिला खाली उतरवून नातेवाईकांना कळविले. यानंतर नातेवाईकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व महिलेला पुढील वैद्यकीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे हलविण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची माहिती महादेव सुभाष बोंदरे (वय ५५, रा. सौंदरे) यांनी पोलिसांना दिली असून, त्यांच्या खबरी जबाबावरून मयत नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलीस हवालदार बोबडे अधिक तपास करत आहेत.

### बार्शीत जातीवाचक शिवीगाळ व मारहाण; आरोपीविरुध्द गुन्हा दाखल

**बार्शी, दि. १८ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील बोरगांव (खुर्द) येथे जातीय शिवीगाळ करत मारहाण केल्याची गंभीर घटना शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी सकाळी ८-३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी दयानंद संपत्ती गायकवाड (वय ६३ वर्षे, व्यवसाय शेती, सेवानिवृत्त कर्मचारी) यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी दयानंद गायकवाड हे आपल्या कुटुंबासह बोरगांव (खुर्द) येथे वास्तव्यास असून त्यांची पत्नी संगीता गायकवाड या ग्रामपंचायत सदस्य तसेच विद्यमान उपसरपंच म्हणून कार्यरत आहेत. गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कंपाऊंडच्या बांधकामाचे काम ग्रामपंचायत निधीतून सुरु आहे. घटनेच्या दिवशी फिर्यादी शाळेच्या बांधकामावर प्लॅस्टरला पाणी मारत असताना, त्याच गावातील आश्रु चंदू कांदे हा मागील बाजूने येऊन जातिवाचक अपशब्द वापरत शिवीगाळ करु लागला. महार असूनही अशी कामे करतोस असे म्हणत त्याने फिर्यादीस उसाच्या शेतात ओढून नेले व मारहाण केली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दरम्यान, भांडणाचा आवाज ऐकून आसपासचे नागरिक घटनास्थळी धावून आल्याने फिर्यादी त्यांच्या तावडीतून सुटले. लोकांना पाहताच संशयित तेथून पसार झाला. त्यानंतर फिर्यादींनी घडलेला प्रकार गावातील मारुती जाधव, आप्पासाहेब कांदे आणि शिवाजी उकिरडे यांना सांगितला. या प्रकरणी आश्रु चंदू कांदे याच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने बी. सी. हॉस्टेलमधून घडताहेत विद्यार्थी

## रावबहादूर डॉ.विनायकराव मुळे यांच्या सहकार्याने ९४ वर्षांपासून उभारलेली परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ एप्रिल-**

सामाजिक न्यायाचे प्रणेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने सोलापूरमध्ये सुरु झालेली बी.सी. बॉईज आणि बी.सी. गर्ल्स हॉस्टेल्स ही केवळ वसतिगृहे नसून, वंचित समाजाच्या प्रगतीचा भक्कम पाया ठरली आहेत. ९४ वर्षांची परंपरा लाभलेली ही वसतिगृहे त्याच उदात्त ध्येयाने कार्यरत आहेत. हजारो वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणातून नवे आयुष्य मिळाले आहे.

१ जानेवारी १९२५ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून सोलापूर शहरातील थोरला राजवाडा परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील पहिले वसतिगृह सुरु केले. तत्कालीन नगराध्यक्ष रावबहादूर डॉ. विनायकराव मुळे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील सखोल मैत्रीमुळे या कार्याला अधिक बळ मिळाले.



विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेल्याने १९३२ साली रावबहादूर डॉ.विनायकराव मुळे यांनी त्यांच्या पुढाकारातून बी.सी. बॉईज हॉस्टेलची स्थापना केली. या कार्यात त्यांचे बंधू भालचंद्र उर्फ काकासाहेब मुळे यांचेही मोलाचे योगदान होते. या वसतिगृहाच्या व्यवस्थापनात उपाध्यक्ष पापय्या बेलपवार आणि तज्ज्ञ संचालक जिवाप्पा ऐदाळे यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली.

सोलापूर जिल्हा डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशनल सोसायटीच्या माध्यमातून ही संस्था कार्यरत राहिली. मुलींच्या शिक्षणासाठी १९३६ साली स्वतंत्र बी.सी. गर्ल्स हॉस्टेल सुरु करण्यात आले. वाडिया हॉस्पिटल परिसरातील या वसतिगृहातून आजही मुली शिक्षण घेत आत्मनिर्भर होत आहेत. येथे नर्सिंग कोर्स मोफत शिकवला जातो. योगा, शिवणकाम यांसारख्या कौशल्याधारित प्रशिक्षणाचीही सुविधा उपलब्ध आहे. अनाथ मुलींसाठी १८ वर्षांपर्यंत मोफत निवास व शिक्षणाची सोय येथे करण्यात आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून उभ्या राहिलेल्या या वसतिगृहांनी केवळ विद्यार्थ्यांना आसरा दिला नाही, तर त्यांना स्वाभिमान, शिक्षण आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवला. हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागील सुमारे दीड एकर जागेत उभारलेले बी.सी. बॉईज हॉस्टेल अनेक पिढ्यांच्या घडणीचे केंद्र ठरले. येथे राहून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वैमानिक, पोलिस अधिकारी, तहसीलदार, मंडल अधिकारी, इंजिनिअर अशा विविध उच्च पदांवर आहेत. आजही माजी विद्यार्थी भेट देऊन डॉ.आंबेडकर यांच्या प्रेरणास्थानाला नतमस्तक होतात.

# कॉम्प्युटर सायन्सला सर्वसाधारण विजेतपद

## ऑर्किड महाविद्यालय क्रीडा स्पर्धा : मेकॅनिकल विभाग उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

ऑर्किड महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धेत काँप्युटर सायन्स विभागाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. मेकॅनिकल विभागाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

याचे वितरण माजी कुलगुरू प्रा. डॉ शिवाजीराव पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी आंतर विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या खेळाडूंचाही सन्मान करण्यात आला. यावेळी कुस्तीचे प्रशिक्षक मार्गदर्शक फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे एपीआय अजित पाटील, प्राचार्य डॉ. बी के सोनगे, उपप्राचार्य डॉ श्रीनिवास मेतन, उपप्राचार्य डॉ विनायक पत्की, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ. यु. के. जाधव यांनी केले. प्रा ऋचा श्रीराम यांनी आभार मानले.



हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विपुल बाग, प्रा सूर्याजी काळे, क्रीडा समन्वयक प्रा आमिर जामदार, आर. आर. पाटील, श्री अंबादासव, विद्यार्थी सचिव ओम गुंजाळ, सहसचिव प्रतीक डांगे, समन्वयक सौरभ पांढरपिसे, योगेश बोबडे, शुभम गाडे, दानिश शेख, रेहान शेख, शेजल पवार, वामन पवार, प्रमोद लिगाडे, दादा पांगळे यांनी सहकार्य केले.

### पंढरपूरच्या चंद्रभागेत तरूण बुडाला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ ,एप्रिल -**

येथील चंद्रभागा नदीत पोहण्यासाठी गेलेल्या तरूणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अमित प्रक्षाळे (वय ३५, रा.नारायण चिंचोली. हल्ली मुकाम-पुणे) असे मृत तरूणाचे नाव आहे.

अमित काल आपल्या तीन मित्रांसमवेत इसबावी येथील पाणी पुरवठा जॉकवेल जवळच्या चंद्रभागा नदीत पोहण्यासाठी गेले होते. खोल पाण्याचा अंदाज न आल्याने अमित प्रक्षाळे हा तरूण पाण्यात बुडाला. त्याचा काल पासून शोध सुरू होता. आज दुपारी अमितचा मृतदेह सापडला. या प्रकरणी पंढरपूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे. अमित प्रक्षाळे हा आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने गावी आला होता. दरम्यान ही दुर्दैवी घटना घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# भागवत कथा सप्ताहाची सांगता तीन हजार भाविकांचा सहभाग

**तथा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १८ एप्रिल-**



मनुष्य हीच जात; माणुसकी हाच धर्म आहे. जात नाही आचरण असले पाहिजे, असे प्रतिपदन बालयोगी वेदांताचार्य गोपाल महाराज कारखेडकर यांनी कथेच्या वेवीचनात सांगितले. येथे संगीतमय भागवत कथेच्या समारोप सोहळ्यात त्यांनी सांगितले.

क्षणोक्षणी हाचि करावा विचार। तरावया पार भवसिंधु. हा नरदेह मोठ्या भाग्याने प्राप्त झाला. आई वडिलांच्या पुणाईने प्राप्त झाला. पांडुरंगाच, सावतोबांच दर्शन घ्या. पवित्र तुळशीची माळ घाला.जगा आणि जगू द्या. एकादशीच व्रत पाळा. मोडनिंब येथील भागवत कथा सप्ताहाच्या सांगता दिवशी गोपाल महाराज कारखेडकर यांचा संयोजक व समस्त मोडनिंब ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रसंत सद्गुरू श्रीपादबाबा यांच्या २८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संगनबसवेश्वर मठ येथे सप्ताह पार पडला.

या संगीतमय भागवत कथेचा समारोप झाला. या सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. आठवडाभर चाललेल्या या कथेच्या माध्यमातून बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांनी विविध अध्यात्मिक विषयांवर मार्गदर्शन केले. ९ एप्रिल पासून या सोहळ्याची सुरुवात झाली. १५ एप्रिलला सांगता झाली. मोडनिंब ग्रामस्थाच्या वतीने आयोजित या सोहळ्याचे यंदाचे यजमान सौ व श्री गणेश मस्के हे होते.

#### कथा सप्ताहास आजपासून टेंभुर्णीत प्रारंभ

टेंभुर्णी (ता. माढा) येथे बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या संगीतमय भागवत कथा सप्ताहास रविवारपासून (दि.१९) प्रारंभ होत आहे. याचे आयोजन शिवतीर्थ लक्ष्मी मैदाना आनंद विद्या मंदिराजवळ करमाळा रोड येथे आयोजित केला आहे. शनिवारपर्यंत हा सप्ताह पार पडणार आहे. रोज सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत हा सप्ताह आहे. भव्य संगीतमय अमृतवाणीतून भागवत श्रावणाचा टेंभुर्णी व पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अक्षय तृतीयेच्या पूर्वसंध्येला भक्तीच्या प्रकाशात आत्मशांतीचा मार्ग उजळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

अक्षय तृतीयेच्या पूर्वसंध्येला सोलापुरातील वालचंद शिक्षण समूहात आयोजित भक्तामर दीपार्चना उत्सवात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मचा तेजस्वी संगम अनुभवायला मिळाला. असंख्य दीपांच्या लखलखत्या प्रकाशात उजळलेल्या परिसराने एक अद्वितीय आध्यात्मिक वातावरण निर्माण केले आणि उपस्थितांच्या अंतःकरणात आत्म शांतीचा दीप प्रज्वलित झाला.

स्वर्गीय भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वालचंद शिक्षण समूहातर्फे डब्ल्यू. आय. टी. जैन टेंपल येथे आयोजित करण्यात आलेल्या या भव्य उत्सवात परम पूज्य निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज ससंघ यांचे मंगल सान्निध्य लाभले. त्यांच्या उपस्थितीत भक्तामर स्तोत्राच्या ४८ मंत्रांचे सामूहिक मंत्रोच्चारण करत हजारो दिव्यांची अर्पणा करण्यात आली. सुमारे एक हजार श्रावकांनी एकूण पंधरा हजार दीप प्रज्वलित करत संपूर्ण परिसर दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघाला.



बेंगलोर, बेळगाव, आळंद, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, लातूर, धाराशिव, पंढरपूर तसेच इंडी, विजापूर परिसरातून मोठ्या संख्येने भाविक या सोहळ्यास उपस्थित होते. श्रावक, दाम्पत्य, लहान मुले आणि कुटुंबीय मंत्रोच्चारात तल्लीन होत, भक्तीभावात डोलत आणि एकसुरात स्तोत्र म्हणत होते. त्या क्षणी प्रत्येक जण भक्तीच्या भावविश्वात हरवून गेला होता.

दीपांच्या तेजस्वी प्रकाशात आणि मंत्रांच्या नादमय स्पंदनात जणू अज्ञानाचा अंधार दूर होऊन आत्मज्ञानाचा दिवा प्रज्वलित होत असल्याची अनुभूती सर्वांना येत होती. संपूर्ण परिसर भक्तिमय ऊर्जेने उजळून निघाला होता आणि वातावरणात एक अद्भुत शांतता व समाधान अनुभवास येत होते.

या उत्सवात सौधर्म इंद्र सौ. साधना प्रकर्ष संगवे, कुबेर इंद्र श्रीमती सुवर्णा सुरेंद्र चौगुले तसेच ईशान इंद्र, विक्रम भाऊसाहेब गांधी यांनी मान घेतला. कार्यक्रमाला वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विविध भागांतून आलेल्या श्रावकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

जैन धर्मातील अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकांतवाद या तत्त्वांची जाणीव करून देत, या उपक्रमातून आत्मचिंतन आणि आत्मपरिष्काराचा प्रभावी संदेश देण्यात आला. भक्ती, श्रद्धा आणि संकल्प यांच्या माध्यमातून आत्मकल्याण साध्य करण्याचा मार्ग या सोहळ्याने उजळवला.

एकंदरीत, भक्तामर दीपार्चना उत्सवाने सोलापूरमध्ये दिव्यांच्या प्रकाशात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करत, प्रत्येकाच्या अंतःकरणात भक्तीचा अखंड दीप प्रज्वलित केला.

# सामाजिक बांधिलकीच्या नात्याने काम करा

## समाधान शिबीरात आमदार खरेंचा प्रशासनाला सल्ला; १ हजार ५६७ लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, यासाठी सुरु केलेला समाधान शिबीर हा उपक्रम चांगला आहे. मात्र, शेवटचा माणूस केंद्रबिंदू मानून सामाजिक बांधिलकीच्या नात्याने काम करा, असा सल्ला आमदार राजू खरे यांनी दिला.

उत्तर सोलापूर तहसिल कार्यालयाच्या वतीने शुक्रवारी वडाळा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत वडाळा मंडळातील गावांचे समाधान शिबीर आयोजित केले होते. या शिबीराचे उद्घाटन आ.खरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.याशिबीरात विविध एक हजार ५६७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे, जि.प.सदस्या चैताली मुळे, उपसभापती सुनील भोसले,




तहसिलदार निलेश पाटील,तालुका कृषी अधिकारी माळी, नायब तहसिलदार विठ्ठल जाधव, मंडळ अधिकारी कन्याकुमारी भोसले, श्रीकांत मुळे, जितेंद्र शिलवंत, जयदीप साठे, मेजर लक्ष्मण राठोड यावेळी उपस्थित होते.

आ.खरे म्हणाले, लोकांच्या कामाचा निपटारा लगेच झाला पाहिजे. त्यांना तहसिल कार्यालयाला हेलपाटे मारावे लागू नये, याची दक्षता घ्यावी. त्यासाठी सामाजिक बांधिलकी जोपासणे गरजेचे आहे. दिवसभर चाललेल्या या शिबीरात देण्यात आलेला लाभ आणि लाभार्थी संख्या पुढीलप्रमाणे - निकाली काढण्यात आलेले फेरफार - ७७, सात-बारामधील दुरुस्तीसाठी स्विकारलेले अर्ज ९, डिजीटल सातबारा वाटप ५०९, ८ अ उतारे - २३७, विविध प्रमाणपत्रांची वाटप संख्या ४६५,सात-बारा अद्ययावत करणे - ३२, यावेळी कृषी विभागाच्या वतीने कृषी यांत्रिकीकरण योजनेतून पाच शेतक-यांना खरेदीपूर्व संमती आदेश, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेतून २२८ कर्जदार शेतक-यांना मंजुरी आदेश तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने पाच गरोदर मातांना बेबी केअर कीट देण्यात आले.

या शिबीरात एक हजार ५६७ लाभार्थ्यांना या प्रकारचा लाभ मिळाला. तहसिलदार निलेश पाटील यांनी प्रास्तविक, पत्रकार दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले. तर वडाळा मंडळ अधिकारी कन्याकुमारी भोसले यांनी आभार मानले.

#### भोसलेंचे योग्य नियोजन

वडाळा मंडळ अधिकारी कन्याकुमारी भोसले यांनी अल्पावधीत शिबिराचे नेटके नियोजन केले होते. या शिबीरात दीड हजार लोकांनी हजेरी लावली होती.

#### वातानुकुलित सभागृह; गैरसोय टळली

शिबीर विठ्ठल मंगल कार्यालयात ठेवले होते. कार्यालय व्यवस्थापक अनिल माळी यांनी कार्यालयात वातानुकुलित यंत्रणा व मोठे कुलर लावल्यामुळे वातावरण थंड होते. त्यामुळे बाहेर तापमान असले तरी देखील लोकांची गैरसोय टळली.

#### शिबीराला उशीर; नागरिक ताटकळले

शिबीराचे उद्घाटन तब्बल सव्वा बारा वाजता झाले. शिबीराला लाभार्थींची मोठी गर्दी होती. मात्र ताटकळत बसावे लागले.

CMYK



महिलांवर अत्याचार करणारे हे समाजात वावरणारे लांडगे आहेत. अशा नराधमांना कठोर शिक्षा झालीच पाहिज. पॉश ॲक्टमध्ये बदल होणे गरजेचे आहे. ज्या कंपनीच्या सहली जातात तिथे पण महिलांचा छळ केला जातो. व्हॉट्सॲपच्या चॅटिंगमधून देखील महिलांना छळाला सामोरे जावे लागते.

**चित्रा वाघ**, भाजपाच्या नेत्या






भोंदू खरातचे प्रकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत कठोरपणे हाताळले. महिलांचा कसा सन्मान करावा हे राज्यातील प्रत्येकाने फडणवीस यांच्याकडून शिकले पाहिजे. भोंदू खरातचे प्रकरण त्यांनी संवेदनशीलतेने हाताळले आहे.

**प्राजक्ता माळी**, अभिनेत्री

### आज अक्षयतृतीया



### श्री परशुराम जन्मोत्सव आज



### विचारपुष्प



'संघटन' हे एक आपल्या शरीरासारखे जीवमान एकक (युनिट) आहे. शरीरातील प्रत्येक पेशीचेही स्वतंत्र कार्य असते, पण सर्वांचे मिळून बनलेल्या आपल्या शरीराचीही स्वतंत्र ओळख असते. संघटनेचेही असेच असते. संघटनेला जेवढे अधिक पोषक द्रव्य द्यावे, तेवढे संघटन अधिक सुदृढ व बलशाली बनते.

**एकनाथ रानडे**

रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

### महत्त्वाचे

#### अमेरिकेत पाच वैज्ञानिक रहस्यमयरीत्या बेपत्ता

**वॉशिंग्टन, १८ एप्रिल**

अमेरिकेत पाच वैज्ञानिक बेपत्ता आणि सहा जणांचा रहस्यमय परिस्थितीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली. या घटनांमागे परग्रहवासी किंवा अज्ञात उड्डाण करणाऱ्या घटनांशी काही संबंध आहे का, याबाबत चर्चा सुरू आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी याप्रकरणाची सखोल चौकशीचा आदेश संबंधित तपास यंत्रणांना दिला. ट्रम्प यांनी या प्रकरणावर सांगितले की, या घटनांबाबत पुढील काही दिवसांत स्पष्टता मिळेल. या घडामोडी केवळ योगायोग आहे, की त्यामागे काही गंभीर कारण आहे याचा तपास करण्याचा आदेश दिला आहे. अहवाल समोर आल्यावर यासंदर्भातील माहिती समोर येईल. सर्व संबंधित यंत्रणा आणि तपास संस्था समन्वय साधून या घटनांचा सखोल आढावा घेत आहे. प्रत्येक प्रकरणातील समान धागेदोरे शोधण्याचे प्रयत्न सुरू असून, तपासात कोणतीही कसूर ठेवली जाणार नाही.

# मुत्सद्देगिरी कामी आली, इंधनाची चिंता मिटली

● रशियन तेल खरेदीसाठी भारताला मुदतवाढ ● अमेरिकेकडून महिनाभरासाठी निर्बंध शिथिल

### शुभवार्ता

**वॉशिंग्टन, १८ एप्रिल**

होर्मुझ सामुद्रधुनीतील वाढता तणाव आणि कच्च्या तेलाचे गगनाला भिडलेले दर यामुळे जागतिक इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. यावर उपाय म्हणून अमेरिकेने रशियावरील निर्बंध शिथिल करीत मार्च महिन्यात तेल खरेदीसाठी ३० दिवसांची परवानगी दिली होती. ही मुदत शुक्रवारी संपल्यानंतर भारताने मुत्सद्देगिरी आणि वाटाघाटीच्या मदतीने रशियाकडून तेल खरेदीसाठी मुदतवाढ देण्याची मागणी अमेरिकेकडे केली होती. वाटाघाटीला यश आले असून, अमेरिकेने भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यास १६ मेपर्यंत मुदत दिली आहे.



जागतिक तेल पुरवठा सुरळीत राहावा आणि दर नियंत्रणात ठेवण्यासाठी रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारताला महिनाभरासाठी मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी शनिवारी दिली. कच्च्या तेलाच्या खरेदीवर लावलेले निर्बंध १६ मेपर्यंत शिथिल करण्यात येत आहे. ही मुदत वाढवण्यात आल्याने भारताला ऊर्जेची गरज पूर्ण करण्यात अडथळा येणार नाही. हा निर्णय जागतिक ऊर्जा किमती स्थिर करण्याच्या आणि पुरवठा सुनिश्चित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे असेही त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

विशेष असे की, मुदतीच्या एक दिवस आधी अर्थात् गुरुवारी बेसेंट यांनी रशिया आणि इराणवरील निर्बंध यापुढे शिथिल केले जाणार नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, भारताने अमेरिकेच्या निर्णयाला विरोध करीत रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवणार असल्याचे ठणकावले होते, तर दुसरीकडे मुदतवाढीसाठी मुत्सद्देगिरी आणि वाटाघाटी सुरू केल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)





#### तेल, गॅसचा पुरवठा वाढवणार : डेनिस अलिपोव्ह

अमेरिकेच्या निर्णयाचे स्वागत करताना भारतातील रशियन राजदूत डेनिस अलिपोव्ह म्हणाले, भारत आमचा विश्वासार्ह व्यापारी भागीदार आहे. रशिया भारताला कच्चे तेल, एलपीजी आणि एलएनजीचा पुरवठा आणखी वाढवेल. भारताला ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी कोणत्याही देशाच्या परवानगीची गरज नाही. तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी कुणाकडून करायचे हा भारताचा निर्णय असून, त्यात तिसऱ्या देशाने हस्तक्षेप करू नये.


#### ४४ अब्ज डॉलर्सची आयात

'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लीन एअर'च्या अहवालानुसार, भारताने मार्चमध्ये रशियाकडून ५.८ अब्ज डॉलर्स किमतीचे कच्चे तेल खरेदी केले, जे फेब्रुवारीतील १.५४ अब्ज डॉलर्सच्या खरेदीच्या तुलनेत तिप्पटीहून अधिक आहे. मार्च २०२२ पासून, रशियन तेलासाठी एक प्रमुख बाजारपेठ म्हणून उदयास आली. २०२४ मध्ये, भारत रशियाकडून दररोज सुमारे २० लाख बॅरल तेल खरेदी करतो, तर गेल्यावर्षी ही आयात सुमारे ४४ अब्ज डॉलर्सची होती.

## संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

**नवी दिल्ली, १८ एप्रिल**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे शनिवारी सूप वाजले. महिला आरक्षणासंदर्भातील १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक पारित करण्यासाठी तिसऱ्या टप्प्यात १६ एप्रिलपासून तीन दिवसांचे विशेष सत्र बोलावण्यात आले होते. लोकसभा तसेच विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे घटनादुरुस्ती विधेयक



लोकसभेत शुक्रवारी दोन तृतियांश बहुमताच्या अभावी फेटाळले गेले. हे विधेयक पारित झाले असते तर, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या टप्प्याची ती सर्वांत मोठी आणि ऐतिहासिक अशी उपलब्धी ठरली असती.

शनिवारी सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभेचे कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याची घोषणा केली. या अधिवेशनात सभागृहाची कामकाजाची उत्पादकता ९३ टक्के राहिली, सभागृहाच्या ३१ बैठकी झाल्या आणि एकूण कामकाज १५१ तास ४२ मिनिटे झाल्याचे बिर्ला यांनी सांगितले. २८ जानेवारीला अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले होते. १ फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीपर्यंत चालला. ९ मार्चला अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू झाला होता.राज्यसभेचे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन् यांनी सभागृहाचे कामकाज संस्थगित करण्याची घोषणा केली. ◂(वृत्तसंस्था)

# 'त्या' मुद्यावर हुमायू कबीर यांचा पक्ष निवडणूक रिंगणात

**श्यामकांत जहागीरदार**

**नवी दिल्ली, १८ एप्रिल**





मुर्शिदाबाद जिल्ह्यात अयोध्येतील वादग्रस्त मशिदीसारखी मशीद उभारण्याची घोषणा करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवणाऱ्या आम जनता उन्नयन पक्षाचे हुमायू कबीर यांनी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत १८४ उमेदवार उतरवले आहे. कबीर स्वत:ही निवडणूक लढवत आहे.

गंमत म्हणजे काही महिन्यांपूर्वी पक्ष स्थापन करणाऱ्या कबीर यांनी शेखचिल्लीसारखी स्वप्न पाहायलाही सुरुवात केली आहे. विधानसभा निवडणुकीत आमचा पक्ष किमान ८० जागा जिंकेल, असा दावा करत राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी भाजपा वा तृणमूल काँग्रेसला आमच्या पक्षाची मदत घ्यावी लागेल, म्हणजे आमचा पक्ष किंग मेकर राहील, असा दावाही कबीर करत आहे.

हुमायू कबीर हे तृणमूल काँग्रेसचे विद्यमान आमदार आहेत. मुर्शिदाबाद येथे बाबरी मशीद उभारण्याची घोषणा केल्यानंतर कबीर यांची तृणमूल काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली. मुर्शिदाबाद येथे ६ डिसेंबरला वादग्रस्त मशिदीचे नामसाधर्म्य असलेल्या मशिदीची पायाभरणी केल्यानंतर कबीर राज्यातच नाही तर, देशातही एकदम चर्चेत आले. २२ डिसेंबर २०२५ ला त्यांनी आम आदमी उन्नयन पक्षाची स्थापना केली. राज्यातील विधानसभेच्या सर्व म्हणजे २९४ जागा लढवण्यासाठी आमच्याजवळ पैसा आणि माणसही नाही, त्यामुळे आम्ही यावेळी १८४ जागा लढवत असल्याचे कबीर सांगतात.बिहारमधील निवडणुकीत तेथील मुस्लिमांनी असदुद्दिन ओवैसी यांच्या पक्षाचे पाच आमदार विजयी केले होते. त्याचप्रमाणे पश्चिम बंगालमधील मुस्लिम माझ्या पक्षाला मतदान करतील, असा विश्वास कबीर व्यक्त करतात.

कबीर यांच्या पक्षाने असदुद्दिन ओवैसी यांच्या पक्षाशी आघाडी केली होती. पण, ही आघाडी फारकाळ टिकू शकली नाही. निवडणुकीच्या आधीच त्यांचा घटस्फोट झाला. ओवैसी यांच्या पक्षाशी कबीर यांचा काडीमोड का झाला, त्याचे कारण दोन्ही पक्षांनी सांगितले नाही. आमचा लढा हा तृणमूल काँग्रेस आणि भाजपाशी आहे, असा दावा करताना कबीर यांच्या पक्षाने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध भवानीपूर येथे तर, भाजपाचे शुभेंदू अधिकारी यांच्याविरोधात नंदीग्राम येथे उमेदवार उतरवले आहे. आमच्या पक्षाला बहुमत मिळाले तर, राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच आम्ही मुस्लिम मुख्यमंत्री देऊ, असा दावा करताना कबीर म्हणतात की, सरकार स्थापन करण्यासाठी ज्या पक्षाला आम्ही पाठिंबा देऊ, त्यांच्याकडे आमच्या पक्षासाठी उपमुख्यमंत्रिपदाची मागणी करू. मी स्वत: उपमुख्यमंत्री होईल.

## धर्मनिरपेक्ष प्रतिमेसाठी काही हिंदूंनाही उमेदवारी

**नवी दिल्ली, १८ एप्रिल**

आमचा आम जनता उन्नयन पक्ष हा धर्मनिरपेक्ष आहे, असा हुमायू कबीर यांचा दावा आहे. आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ मुस्लिमबहुल नसणाऱ्या मतदारसंघातून काही हिंदूंनाही त्यांनी उमेदवारी दिली आहे.

वादग्रस्त मशिदीच्या नावावर राज्यातील मुस्लिम मतदार आपल्याकडे ओढण्याचा हुमायू कबीर यांचा प्रयत्न आहे. तृणमूल काँग्रेसमधून काढल्यामुळे त्यांचा रोष मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर आहे. काही झाले तरी राज्यात ममता बॅनर्जी यांचे सरकार बनू देणार नाही, असा त्याचा दावा आहे. त्यामुळे कबीर यांच्या पक्षाचा सर्वांत मोठा फटका ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेसला बसण्याची शक्यता आहे. कारण, २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील बहुतांश मुस्लिमबहुल मतदारसंघातून तृणमूल काँग्रेसचे आमदार विजयी झाले होते.

हुमायू कबीर यांनी सर्व राजकीय पक्षांचा प्रवास केला आहे. २०११ च्या विधानसभा निवडणुकीत ते काँग्रेसतर्फे रेजीनगर मतदारसंघातून निवडून आले. मात्र, पुढच्याच वर्षी त्यांनी राजीनामा देत तृणमूलमध्ये प्रवेश केला. तृणमूलमध्ये आल्यावर ममता बॅजर्नी यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले. मात्र, या पक्षातही ते टिकले नाही. ◂(तभा वृत्तसेवा)

### चेन्नईचा चौथा पराभव

**चेन्नई** : चेन्नई सुपर किंग्सला चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. शनिवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने त्यांचा १० धावांनी पराभव केला. १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, चेन्नईला आपल्या निर्धारित २० षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात केवळ १८४ धावांपर्यंतच मजल मारता आली.





सोलापूर : मल्लिकार्जुन मंदिर परिसरात मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व सामाजिक सेवा महामंडळाने श्री शक्ती जागरनिमित्त शनिवारी महाआरतीचे आयोजन केले होते. उपायुक्त पाटील यांच्या हस्ते बसवेश्वराच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. (छाया : केवल तिवारी)



## 'त्या' वाहन परवान्यांच्या नूतनीकरणाची मुदत वाढवली

**केंद्र सरकारचा निर्णय**

**मुख्यमंत्री फडणवीस यांची 'एक्स'वर माहिती**

**मुंबई, १८ एप्रिल**

राज्यातील वाहतूक व्यावसायिकांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, 'ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन' प्रणालीतील अडचणींमुळे प्रभावित झालेल्या वाहन परवाना नूतनीकरणाची मुदत ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ही मुदतवाढ मंजूर केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एक्स'वर दिली. ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन प्रणालीच्या अंमलबजावणीदरम्यान निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींमुळे परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया विस्कळीत झाली होती.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे १५ लाख वाहतूक व्यावसायिकांना फायदा होणार आहे. यामध्ये ऑटो-रिक्षा, टेम्पो, शालेय बस तसेच इतर व्यावसायिक वाहनधारकांचा समावेश आहे. ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन प्रणालीतील तांत्रिक अडथळ्यांमुळे नूतनीकरण प्रक्रिया ठप्प झाली होती.

या अडचणीमुळे महाराष्ट्रातील ११ प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या (आरटीओ) कार्यक्षेत्रात परवाना नूतनीकरण पूर्णपणे बंद झाले होते. त्यामुळे अनेक वाहनधारकांना व्यवसायिक तसेच आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी हा मुद्दा केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यानंतर फडणवीस यांनी नितीन गडकरी यांना पत्र लिहून या प्रणालीतील तांत्रिक अडचणी दूर करण्याची आणि नूतनीकरण प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याची विनंती केली.

या विनंतीला प्रतिसाद देत केंद्र सरकारने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रणाली स्थिर झाल्यानंतर वाहनधारकांना नूतनीकरणासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. वाहतूक क्षेत्रावर आलेला ताण कमी करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरत आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## 'तरुण भारत' सामाजिक बांधिलकीचे प्रतीक

(पान १ वरून)

यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

भय्याजी जोशी म्हणाले, देशातील अनेक वृत्तपत्रांमधील विचारांची मांडणी पाहिली, तर प्रत्येक पानातील मथळे आणि शीर्षकावरून ते वृत्तपत्र समाजात चुकीचे विचार पसरवत आहेत, हे स्पष्ट होते. मात्र, अशा विचारशक्तींच्या आधारावर देशाची दिशा सुलभ आणि शुद्ध राहील याची खात्री नसते. व्यावसायिक दृष्टिकोन नसला तर काही गोष्टी अव्यावहारिक घडतात. मात्र, हा दृष्टिकोन न ठेवता श्री नरकेसरी प्रकाशनने तरुण भारतच्या माध्यमातून ध्येयाला अनुसरून योग्य विचारांच्या आधारावर वाटचाल सुरू ठेवली. समाजाला काय अपेक्षित आहे, कोणते विचार सापेक्ष पद्धतीने मांडले पाहिजेत, ही अचूक जाण असणारे वृत्तपत्र म्हणजे दैनिक तरुण भारत आहे. काळानुरूप तरुण भारतचा दर्जा दिवसेंदिवस चांगलाच होत चालला आहे. जनजागरण, मनोरंजनाबरोबर चांगल्या विचारांचा लेखक, स्तंभलेखकांचा विशिष्ट वर्ग दैनिक तरुण भारत सोबत जोडला जात आहे. देशात बुद्धिभ्रम करणाऱ्यांची संख्या कमी नाही. नकारात्मक भूमिका घेऊन वाटचाल करत असलेली वृत्तपत्रे रसातळाला चालली आहेत; तर ध्येयानुसार चाललेली वृत्तपत्रे वेगळ्या उंचीवर जात आहेत.

गोविंददेव गिरी महाराज म्हणाले, तरुण भारतच्या विचारांचा मागोवा घेत माझे बालपण गेले आहे. लहाणपणापासून तरुण भारत, श्री नरकेसरी प्रकाशन, बोधचिन्ह असलेला सिंह आणि स्वयमेव मृगेंद्रता हे वाक्य मला वारंवार प्रेरणा देत आले आहे. तरुण भारत हे वृत्तपत्र नाही, ते विचारपत्र आहे. या विचारांची समाजाला आवश्यकता आहे. माणसाला योग्य तो विचार मिळाला पाहिजे. लोकांपर्यंत चुकीचे विचार पोहोचवल्याने समाजाचे मोठे नुकसान होते. देशाची संस्कृती आणि परंपरेचे नुकसान टाळण्यासाठी अशा वृत्तपत्रांची आवश्यकता आहे. तरुण भारतने आरंभापासून राष्ट्रीय विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. संघ दृष्टिकोनातून विचार मांडून तरुण भारतने समाज एकत्र करत जागृतीचे कार्य केले आहे.

व्यवस्थापकीय संचालक धनंजय बापट प्रास्ताविकात म्हणाले की, तरुण भारत हे विचारपत्र असून या मागे मोठी वैचारिक शक्ती आहे. हे ध्येयवादी पत्रकारितेचे एक जिवंत उदाहरण आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून रामजन्मभूमीच्या आंदोलनापर्यंत तरुण भारत अग्रेसर राहिला आहे. संस्कृतीची ओळख, राष्ट्रीय विचार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पंचसूत्री आणि राष्ट्रनिर्मितीची साधना हा विचार कायम तरुण भारतच्या सोबत राहिला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उल्का मोकासदार यांनी केले. आभार निवासी संपादक सचिन कापसे यांनी मानले. ◂(तभा वृत्तसेवा)

## पुणे विमानतळावरील धावपट्टी ९ तासांनंतर पूर्ववत्

### हवाई दलाच्या विमानाचे 'हार्ड लॅण्डिंग' झाल्याने गोंधळ

**पुणे, १८ एप्रिल**

लोहगाव येथील पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी रात्री झालेल्या एका तांत्रिक बिघाडामुळे बंद झालेली धावपट्टी तब्बल नऊ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर शनिवारी सकाळी पूर्ववत् करण्यात आली आहे. भारतीय हवाई दलाच्या एका विमानाचे लॅण्डिंग गिअर निकामी झाल्याने धावपट्टीवरच विमान अडकले होते. यामुळे विमानसेवा विस्कळीत होऊन प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. मात्र, आता उड्डाणे सुरळीत झाल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री १०.२५ च्या सुमारास हवाई दलाच्या एका विमानाचे 'हार्ड लॅण्डिंग' झाले. विमानाच्या लॅण्डिंग गिअरमध्ये बिघाड झाल्याने ते धावपट्टीच्या मध्यभागीच अडकून पडले. २,५३५ मीटर लांब असलेल्या या धावपट्टीवर विमान अडकल्याने नागरी विमानांची ये-जा पूर्णपणे थांबली. यामुळे पुण्यात येणारी किमान ३२ विमाने इतरत्र वळवण्यात आली किंवा रद्द करण्यात आली, तर पुण्याहून जाणारी अनेक विमानेही रद्द करावी लागली. विमानतळावरील क्रेन आणि अवजड यंत्रसामग्रीच्या मदतीने हवाई दल आणि विमानतळ प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून विमान धावपट्टीवरून बाजूला हलवले. सलग ६ ते ७ तास चाललेल्या या कामानंतर शनिवारी सकाळी आठ वाजता धावपट्टी उड्डाणांसाठी खुली करण्यात आली. ◂(तभा वृत्तसेवा)


## निदा खान पसार, पतीला अटक

**मोईन खानला कंपनीतून घेतले ताब्यात**

**नाशिक, १८ एप्रिल**

नाशिकमधील नामांकित टीसीएस आयटी कंपनीतील लैंगिक छळ आणि जबरदस्ती धर्मांतर प्रकरणातील संशयित आरोपी निदा खान गुन्हा दाखल होताच फरार झाली. पोलिस तिच्या मागावर होते. दरम्यान, निदा खान ठाण्यातील मुंब्रा भागात सासरी स्वतःच्या घरीच वास्तव्याला होती अशी माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे विशेष चौकशी पथकाने (एसआयटी) शुक्रवारी सकाळी तिच्या घराची रेकी केली. तिचा पती मोईन खान कामावर गेल्याची माहिती त्यांना यावेळी मिळाली. तो काम करीत असलेल्या कंपनीतून त्याला ताब्यात घेतले. तर निदा एसआयटी पथक घरी पोहोचण्यापूर्वी पसार झाली.

गत चार दिवसांपासून एसआयटी पथक मुंब्रा तसेच भिवंडी ठाण्यात तपास करत होते. साध्या वेशातील पथकाने गुरुवारी व शुक्रवारी सकाळी मोईन खानच्या घराची रेकी करून





करून छापा टाकण्यासाठीची वेळ निश्चित केली. एसआयटीच्या पथकाने त्याच्या घरापासून दूर वाहन थांबवून करून पायी मोईन खानचे घर गाठले. एसआयटी पथकातील तीन कर्मचारी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने मोईन खानच्या घरी पोहोचले. पथकाने घरात प्रवेश केला असता तेथे निदा खान व तिचा पती मोईन खान हे दोघेही सापडले नाहीत.

निदाने मुंबईला करून घेतली बदली

शुक्रवारी दुपारी नाशिक गुन्हे शाखेने मुंब्रा पोलिस ठाण्यात मोईन खानला आणले. मोईनला चौकशीसाठी ताब्यात घेऊन फरार निदा खानबाबत माहिती मिळवली. ही घटना समोर आल्यानंतर निदा खानने मुंबईला बदली करून घेतली होती. ती मोईन खानसोबत मुंब्रा येथे राहत होती. ती टीसीएस कंपनीच्या मालाड येथील कार्यालयात जात होती. आता कंपनीने तिला कामावरून काढल्याची नोटीस कंपनीने दिली आहे. त्यानंतर तिची मावशी नुरी शेख तिला दोन दिवसांपूर्वी नाशिक येथे घेऊन गेल्याचे पती मोईनने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# अक्षयं भवति भारत सर्वमेव....

प्रासंगिक

डॉ. भालचंद्र हरदास

**अस्यां तिथौ क्षयमुर्पति हुतं न दत्तं।**
**तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया॥**
**उद्दिष्य दैवतपितृन्क्रियते मनुष्यैः।**
**तत् च अक्षयं भवति भारत सर्वमेव॥**

श्रीकृष्ण म्हणतात हे युधिष्ठिरा, या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही; म्हणून हिला मुनींनी 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय -अविनाशी होते.

अक्षय्य तृतीया हिंदू संस्कृतीतील विशेष उत्सव आहे. हिंदू पंचांगानुसार वैशाख मासातील शुक्ल पक्षातील तिसऱ्या दिवशी अक्षय्य तृतीया तिथी येते. या सणाला आखा तीज, आखाजी, अख्खा तीज या नावानेही अनेक प्रांतात संबोधले जाते. समस्त भारतवर्षात मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने अक्षय्य तृतीया साजरी केली जाते. अक्षय्य तृतीयेला अनेक पौराणिक आणि ऐतिहसिक घटना जोडल्या गेल्या असल्याने या सणाचे विशेष महत्त्व आहे. याच दिवशी भगवान विष्णूंचे सहावे अवतार भगवान परशुराम यांचा जन्मदिवस असतो. ब्रह्मदेवाचा पुत्र अक्षय याचे प्राकट्य याच दिवशी झाल्याने अक्षय तिथी म्हणून हा दिवस प्रसिद्ध पावला.

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वर्षभरात साडेतीन शुभ मुहूर्त असतात. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा, वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय्य तृतीया , आश्विन शुक्ल दशमी म्हणजेच विजयादशमी (दसरा) हे तीन पूर्ण मुहूर्त असून दिवाळीचा पाडवा कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा अर्धा मुहूर्त आहे. कोणत्याही शुभ कार्याचा, नवीन कार्याचा प्रारंभ या दिवशी करतात. अक्षय्य तृतीया साडेतीन मुहूर्तातील अभिजित मुहूर्त असल्यामुळे या दिवशी इतर दिवसांप्रमाणे कोणतेही शुभ काम प्रारंभ करण्यास पंचांग बघण्याची गरज नाही. पौराणिक मान्यतेनुसार अक्षय्य तृतीयेला केलेल्या पुण्यकर्माचे फळ हे अक्षय असते. या दिवशी केलेले होम, हवन, जप जाप्य आदि साधना या संपूर्ण फलप्राप्ती देणाऱ्या असतात. म्हणूनच विवाह , उपनयन, गृहप्रवेश, वस्त्रआभूषण, वाहन खरेदीसाठी अक्षय्य तृतीया शुभ मानतात.

एका पौराणिक मान्यतेनुसार महाभारत काळात जेव्हा पांडव वनवासात होते तेव्हा योगेश्वर श्रीकृष्णांनी पांडवांना एक अक्षयपात्र त्यांना सप्रेम भेट दिले. या अक्षयपात्रामुळेच पांडवांना कधीही भोजन आदींची चिंता झाली नाही. श्रीकृष्ण आणि सुदामा यांच्या मित्रप्रेमाच्या कथेलादेखील अक्षय्य तृतीयेचा संदर्भ आहे. त्याचे झाले असे की आपल्या परिवाराच्या आर्थिक विवंचनेमुळे सुदामा अक्षय्य तृतीयेच्या दिवशी आपला परममित्र योगेश्वर श्रीकृष्णाकडे गेला. भेट झाल्यानंतर सुदाम्याने आपल्या शिदोरीत आणलेले मूठभर पोहे श्रीकृष्णाला दिले जे मोठ्या आनंदाने गोपाळकृष्णानी खाल्ले. यानंतर श्रीकृष्णाने आपला बालमित्र सुदाम्याचे आगतस्वागत मोठ्या अमीर उमरावाप्रमाणे केले. मात्र या सगळ्या गडबडीत सुदामा आपली पारिवारिक विवंचना सांगण्यास विसरून गेला आणि काहीही न बोलताच तसाच घराकडे यायला परत निघाला. घरी येऊन पाहतो ते नवलच! आपल्या झोपडीच्या जागेवर एक आकर्षक राजमहाल आणि दारात सुदाम्याची पत्नी आणि मुले उंची वस्त्र प्रावरणे घालून स्वागताला हजर! सुदाम्याने लगेच ओळखले की योगेश्वराने मूठभर पोह्यांच्या परतफेडीसाठी हे सगळे केले आहे. याच कारणाने धन-संपत्ती लाभासाठी अक्षय्य तृतीयेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

सुर्जी अंजनगाव येथील परब्रह्म महारुद्र सद्गुरू श्रीदेवनाथ महाराज यांच्या लीलाचरित्रात देखील अशाच प्रकारची घटना आपल्याला पाहावयास मिळते. एकदा गुर्जर प्रांतात गुजरात श्रीदेवनाथ महाराज यांचा प्रवास होता. त्यावेळी दर शनिवारी दत्तप्रासादिक परंपरेप्रमाणे भिक्षाटन करायचे असा देवनाथ महाराजांचा शिरस्ता होता. परंतु गुर्जर प्रांतातील राजाने साधू, फकीर, बैरागी यांच्या भिक्षेवर बंदी आणली होती. आता कसे करावे? म्हणून गाऱ्हाणे मांडायला गुर्जर प्रांतातील गणेश मंदिरात श्रीदेवनाथ महाराज गेले. सगळी परिस्थिती श्रीगणेशाला सांगितली आणि देव, देश, धर्मासाठी कार्य करणाऱ्या साधू संतांना तुझ्या राज्यात भिक्षा मिळत नसेल तर काय करायचे असे विचारले. पण एक नाही की दोन नाही गणेशमूर्ती बोलत नाही असे पाहून शीघ्रकवी सद्गुरू श्रीदेवनाथ महाराजांनी कमरेला म्यान असलेली तलवार गणेशावर उचलणार तोच गणेशमूर्ती तो वार चुकवण्यासाठी सर्रकन मागे सरकली आणि देवनाथांच्या झोळीत श्रीगणेशाने अक्षय मोदक टाकला.

**यापरी गणेशासी कथित यातना**
**श्रीगणेशा मान्य हो नाथप्रार्थना**
**प्रसन्नपणी देई नाथ रमणा**
**अक्षयमोदक दानासी**

समर्थ सद्गुरू श्रीमनोहरनाथ महाराज विरचित श्रीदेवनाथ लीलालहरी पारायण ग्रंथातील चौदाव्या तरंगात हा कथाभाग विस्तृतपणे आला आहे. याच मोदकामुळे श्रीनाथ महाराजांची झोळी अक्षय झाली. ही दत्तप्रासादिक अक्षयझोळी आजही सुर्जी अंजनगाव येथील श्रीनाथ पीठात विद्यमान आहे. पुढे सद्गुरू श्रीदेवनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने गुर्जर राजाने भिक्षा निर्बंध मागे घेतला.

अक्षय्य तृतीयेला दक्षिण भारतात युगादी तिथी संबोधतात. या दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाल्याचे मानतात. नर नारायण अवतारकथा अक्षय्य तृतीयेलाच घडली. बद्रीनाथ धाम येथील नर नारायण तपस्येमुळेच पुढे अर्जुन आणि श्रीकृष्ण यांचा अवतार झाला. महाभारताचे समापन आणि पांडवांना हस्तिनापूर साम्राज्य प्राप्ती आणि शिवशंकरांच्या जटेमध्ये निवास करणाऱ्या भगवती गंगेचे गंगावतरण याच दिवशी झाले. मान्यतेनुसार बद्रीनाथपासून तीन किलोमीटर दूर असलेल्या माना येथील गणेश गुहेत महर्षी वेदव्यास यांनी श्रीगणेशाला महाभारत कथा सांगून ते महाकाव्य लेखन अक्षय्य तृतीयेलाच प्रारंभ केले.

पितरांचे स्मरण आणि तर्पण अक्षय्य तृतीयेलाच करतात. यावेळी थंड पाण्याने भरलेला मातीचा घट (कुंभ किंवा माठ) वाळा टाकून दान देण्याची पद्धत आहे. धर्मसिंधुनुसार हा उदककुंभ प्रदान करताना खालील मंत्रोच्चार करावा-

**एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः ।**
**अस्य प्रदानात् तृप्यन्तु पितरोऽपि पितामहाः ॥**
**गन्धोदकतिलैर्मिश्रं सान्नं कुम्भं फलान्वितम् ।**
**पितृभ्यः सम्प्रदास्यामि अक्षय्यमुपतिष्ठतु ॥**

ब्रह्मा, विष्णू आणि शिव ज्यात सामावले आहेत असा हा धर्मघट मी ब्राह्मणाला दान केला आहे. या दानामुळे माझे पितर आणि देवता तृप्त होवोत. गंध, उदक, तिळ आणि फळे यांनी युक्त असा हा कुंभ मी पितरांसाठी देत आहे. हा कुंभ माझ्यासाठी सदा अक्षय्य (क्षय न पावणारा) ठरो.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीची मशागत अक्षय्य तृतीयेपर्यंत करून अक्षय्य तृतीयेला मातीचे आळे करून त्यात बीजारोपण करावे. यादृष्टीने पाहिल्यास अक्षय्य तृतीया हा आपल्या ऋषी आणि कृषी संस्कृतीचा संगम आहे.

हवामान आणि पीकपाण्याच्या अंदाजाच्या पद्धतीप्रमाणेच वऱ्हाडात यासाठी भेंडवळच्या घटमांडणीची पद्धत रूढ आहे. ही घटमांडणी ३५० वर्षांहून अधिक जुनी परंपरा आहे. अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर बुलढाणा जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या काठी वसलेल्या भेंडवळ गावात होणारी घटमांडणी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या पर्जन्यमान आणि पिकांच्या स्थितीवर अंदाज वर्तविते. तेव्हाच्या चंद्रभान महाराजांचा वसा त्यांच्या वंशजांनी आजही टिकवून ठेवला आहे. घटमांडणीनंतर वर्तवलेली गेलेली पीकपाणी, राजकीय आणि आर्थिक भाकिते बऱ्याचदा खरी ठरली आहेत. निव्वळ ठोकताळे असले तरी वऱ्हाडातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने आजही भेंडवळचे महत्त्व कमी झालेले नाही. अक्षय्य तृतीयेला या गावात विदर्भ, खान्देशसह अनेक भागांतून शेतकरी मुक्कामाला येऊन दुसऱ्या दिवशीच्या पहाटेची वाट पाहतात. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी राजाने किंवा प्रजेच्या पालनपोषणाची जबाबदारी असणाऱ्यांनी सामूहिकरीत्या राजवाड्यात किंवा सामूहिक पूजाविधीच्या ठिकाणी श्रीविष्णुसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून भक्तिभावाने पूजन करावे. यामुळे प्रजा सुखी व समृद्ध होते. लक्ष्मीदेवीची कृपाच आपल्यावर होत नाही; कारण लक्ष्मीदेवी ही श्रीविष्णूची शक्ती आहे. जेथे श्रीविष्णूलाच बोलावणे नाही, तर त्याच्यासोबत किंवा त्याच्यात असणारी त्याची शक्ती कशी बरे पूजास्थळी येऊन कृपा करेल ? म्हणून कोणत्याही रूपातील श्रीलक्ष्मी पूजनाच्या वेळी श्रीविष्णूला प्रथम आवाहन करावे व नंतर श्रीलक्ष्मीलाही आवाहन करावे. त्यामुळे उपासकाला लक्ष्मीतत्त्वाचा जास्तीत जास्त लाभ होतो.

अक्षय्य तृतीयेलाच खान्देशात आखाजी म्हणून संबोधतात. जळगाव, धुळे, नंदूरबार आणि नाशिक जिल्ह्याचा काही भागांत प्रामुख्याने अहिराणी बोली भाषा आहे. या अहिराणीत आखाजीविषयी अनेक गीते आहेत. या गीतातून खान्देशातील संस्कृती, जनजीवन, कुटुंबव्यवस्था, सासर-माहेर, नातेसंबंध यांचे असंख्य पदर उलगडून जातात. सासूरवाशिणीला माहेरचा अक्षय्य आनंद देणारी म्हणून अक्षय्य तृतीया ओळखली जाते. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी शब्दबद्ध केलेल्या अनेक कविता आजही आखाजी सणानिमित्त गायिल्या जातात.

**आखाजीचा आखाजीचा**
**मोलाचा सन देखा जी**
**निंबावरी निंबावरी**
**बांधला छान झोका जी ।**
**माझा झोका माझा झोका**
**चालला माहेराले जी**
**आला झोका आला झोका**
**पलट सासराले जी**

आखाजीनिमित्त माहेरवाशिणी झिम्मा, फुगडी, सारीपाट, उखाणे, झोपाळे यांचा मनमुराद आनंद लुटतात.

भारतीय संस्कृतीमधील पारिवारिक भावनेचे प्रातिनिधिक स्वरूप म्हणजे अक्षय्य तृतीया म्हणता येईल. शरीर आणि संसारातील सर्वच वस्तू या नाशिवंत आहेत. अक्षय -अविनाशी केवळ परमात्मा आहे. अक्षय्य तृतीया हा दिवस आत्मप्रेरणा घेण्याचा मंगल दिवस आहे. अक्षय आत्मतत्त्वावर दृष्टी असतानाच देव, देश, धर्मावर अनन्य श्रद्धा ठेवून विश्वमंगल भारताचे स्वप्न याचि देही याचि डोळा बघावयास मिळो हीच अक्षय्य तृतीयेच्या मंगलपर्वावर शुभकामना. चला तर सर्वांनी मंत्रघोष करूया, अक्षयं भवति भारत सर्वमेव...

९६५७७२०२४२
(लेखक भारतीय शिक्षण मंडळाचे नागपूर महानगर मंत्री आहेत.)

आदरांजली

सावनी शेंडे

# स्वरतारकेचा निरोप

**आपल्या सुरेल आवाजाने भारतीय संगीतविश्वाला श्रीमंत करणाऱ्या आशा भोसलेंचे नाव घेतले की मन आपोआपच सुरांनी भारून जाते. त्यांच्या आवाजात भावना, उत्साह, खट्याळपणा आणि कोमलता यांचे सुंदर मिश्रण होते. त्यांच्या सुरांनी अनेक पिढ्यांच्या भावनांना शब्द दिले. शब्दांना अर्थ दिला आणि गाणे म्हणजे केवळ सूर नव्हे, तर जगण्याचा उत्सव असतो, हे आपल्या प्रत्येक गाण्यातून सिद्ध केले. त्यांना वाहिलेली ही आदरांजली.**

स्वरमंडळातून आशा भोसले नावाचा एक तारा निखळला. खरे तर, अशी थोर व्यक्ती आपल्यातून निघून गेल्यानंतर मोठी पोकळी निर्माण होते, असे म्हटले जाते. आशाबाईंच्या जाण्यामुळे केवळ संगीत क्षेत्रातच पोकळी निर्माण झाली आहे, असे मी म्हणणार नाही. कारण त्या संगीताच्या माध्यमातून आपल्या सर्वांशी निगडित होत्याच; पण घरातल्या ज्येष्ठ व्यक्तीप्रमाणे त्या सदैव आपल्या जवळ होत्या. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेला हा रितेपणा आपल्या भावविश्वात झाला आहे. आपल्या घरात, आपल्या मनात झाला आहे. आशा भोसले यांनी एस. डी. बर्मन यांच्यापासून थेट ए. आर. रहमानपर्यंत विविध कालखंडांमधील अनेक संगीतकारांबरोबर काम केले आहे. मराठीत दत्ता डावजेकर, श्रीनिवास खळे यांच्यापासून श्रीधर फडके यांच्यापर्यंत असंख्य संगीतकारांच्या रचनांना त्यांनी सुरेल साज चढवला. मधुबाला आणि मीनाकुमारीपासून अगदी तब्बू, उर्मिला मातोंडकर, ऐश्वर्या रायपर्यंतच्या अलिकडच्या काळातील अभिनेत्रींनाही त्यांनी आपला आवाज दिला. त्यांनी मोहम्मद रफी, किशोरकुमार आणि सुधीर फडके यांच्याबरोबरचा काळ गाजवलाच, पण हृषीकेश रानडेसारख्या तरुण गायकाबरोबरही गाणी गायली. आवाजाला वय नसते. आवाज सदैव तरुण असतो, हे त्यांनी सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे आपला आवाज तरुण ठेवण्यासाठी त्या सदैव रियाज करीत होत्या. त्यांनी कधीही रियाज चुकवला नाही.

आशाताई सुमारे ९०० चित्रपटांशी गायिका म्हणून जोडल्या गेल्या. त्यांनी २० भाषांमध्ये १२,००० पेक्षा जास्त गाणी गायली. अनेक भावभावनांना आपल्या सुरांनी रंग दिले आणि प्रत्येकाचे भावविश्व समृद्ध केले. शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत, मराठी भावगीते, अभंग, गझल, मराठी-हिंदी चित्रपटगीते, नाट्यगीते, गझल, लावण्या, डिस्को-रॉक-पॉप अशा सर्व प्रकारच्या संगीतामध्ये आशाताई तेवढ्याच ताकदीने गायल्या. त्यांनी चित्रपटांमधल्या कॅब्रे नृत्यांनाही आवाज दिला. खरोखरच, त्यांच्या आवाजाची लवचीकता आणि झेप खूप मोठी होती. ओ. पी. नय्यर यांच्यासोबत त्यांनी खूप सुंदर गाणी गायली. 'आँखोसे जो उतरी है दिल में' (फिर वही दिल लाया हूँ), 'आईये मेहरबान' (हावरा ब्रिज), 'ये है रेशमी जुल्फों का अंधेरा' (मेरे सनम), 'इशारों इशारों में'(कश्मीर की कली), 'जाइये आप कहां जाएंगे' (मेरे सनम), 'वो हसीन दर्द देदो' (हम साया) ही त्यांची काही खास गाणी. ओ. पी. नय्यर यांनी त्यांच्या आवाजातील खट्याळपणा आणि लयबद्धता सुंदरतेने वापरली आणि आपल्याला अनेक अजरामर गाणी मिळाली.

'तीसरी मंजिल' या चित्रपटानंतर आशाताईंनी पंचमदांसाठी गाणे सुरू केले. आर. डी. बर्मन ज्या चित्रपटांचे संगीत देत, त्या चित्रपटांमध्ये आशा भोसले यांचे गाणे नक्की असायचे. १९७० च्या दशकात दोघांनी अनेक हिट गाणी दिली. आर. डी. बर्मन यांच्यासोबतची त्यांची बहुतेक गाणी गाजली. 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा', 'चुरा लिया है तुमने', 'मेहबूबा मेहबूबा', 'ओ मेरे सोना रे' ही गाणी आजही लोकांच्या ओठांवर आहेत. 'तुम साथ हो जब अपने', 'दम मारो दम', 'दो लफ्जों की है दिल की कहानी', 'कह दूं तुम्हें', 'सुन सुन दीदी तेरे लिए' या गाण्यांना आशा भोसले यांनी स्वरसाज चढवला आणि इतिहास घडवला. गुलाम अलींबरोबर मेहंदी हसनबरोबरदेखील आशाताईंनी गाणी गायिली आहेत.



आशा भोसले यांच्या मराठी आणि हिंदी गाण्यांचा खजिना खूप मोठा आहे. मला त्यांची 'उमराव जान' मधली सगळीच गाणी खूप आवडतात. त्यातही 'इन आँखों की मस्ती के' ही या गाण्यात त्यांच्या आवाजातील नजाकत आणि शास्त्रीय स्पर्श स्पष्ट जाणवतो. हृदयनाथ मंगेशकर यांच्यासोबतच्या त्यांच्या गाण्यांमध्ये खास वेगळेपणा होता. आशा भोसले यांनी त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली काही अतिशय दर्जेदार आणि भावपूर्ण मराठी गाणी गायिली आहेत. 'तरुण आहे रात्र अजुनी', 'केव्हा तरी पहाटे', 'गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे' यांसारखी गाणी खूप गाजली. या गाण्यांमध्ये शास्त्रीय संगीताचा आधार आणि भावनांची खोली दोन्हीही जाणवते. हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीताची खासियत म्हणजे सूक्ष्म चढ-उतार आणि भावपूर्णता. आशा भोसले यांच्या आवाजाने त्या रचनांना वेगळेच सौंदर्य दिले.

वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू ब्रेट ली, अभिनेता संजय दत्त यांच्याबरोबर गाण्याचा प्रयोग केला. 'आशा अँड फ्रेंड्स' या अल्बमचा हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला. अभिजात संगीतकलेला जसे स्थळ-काळ-वेळेचे बंधन नसते, तसेच आशाताईंच्या आवाजालाही या कशाचेही बंधन नव्हते. त्यांच्या शेवटच्या काळातील गाण्यांपैकी 'कशिश' हा मला आवडणारा खास आणि भावपूर्ण अल्बम. 'कशिश' म्हणजे ओढ, आकर्षण. या अल्बममधील गाण्यांमध्ये हीच भावना सुरेख जाणवते. आशाबाईंनी अनेक सुंदर मराठी गाण्यांवर स्वरसाज चढवला. 'धुंदी कळ्यांना', 'देव जरी मज कधी भेटला', 'का रे दुरावा', 'गोमू संगतीनं', 'गोरी गोरी पान', 'जांभूळ पिकल्या झाडाखाली' यासारखी त्यांची अगणित गाणी लोकप्रिय झाली. या गाण्यांमध्ये त्यांचा आवाज कधी कोमल, कधी खट्याळ तर कधी खूप भावपूर्ण वाटतो. 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे', 'ही वाट दूर जाते', 'फुलले रे क्षण माझे', 'ऋतु हिरवा', 'सांज ये गोकुळी', 'झिनी झिनी वाजे', 'गंध फुलांचा गेला सांगून', 'आज कुणीतरी यावे', 'एका तळ्यात होती' अशी त्यांनी गायिलेल्या मधुर, लोकप्रिय गीतांची यादी बरीच मोठी आहे. 'रेशमाच्या रेघांनी'मधला लावणीचा ठसका, 'सैनिक हो तुमच्यासाठी'मधला कृतज्ञता भाव, 'शूरा मी वंदिले' यातील प्रेम आणि आदर, 'जे वेड मजला लागले'ची गोडी... हे सारे आशाताईंच्या आवाजाने श्रवणीय केले.

आशाताईंनी गायला सुरुवात केली त्या काळात हिंदी चित्रपट संगीतावर लता मंगेशकर, शमशाद बेगम, गीता दत्त अशा गायिका राज्य करीत होत्या. परंतु या गायिकांच्या राज्यात राहून, गाऊन, आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचे, स्वतःला सिद्ध करण्याचे मोठे आव्हान आशाताईंपुढे होते. या दरम्यान त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी, मुलांची जबाबदारी, प्रतिकूल परिस्थिती या सगळ्या विपरीत घटकांशी सामना करत करीत आशाताईंनी हे आव्हान स्वीकारले आणि ते स्वबळावर, आत्मविश्वासाने यशस्वीपणे पेलून दाखवले. लतादीदींपेक्षा वेगळ्या गायकीचा ठसा त्यांनी संगीत क्षेत्रावर उमटवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आशाताईंचे विशेष म्हणजे त्या प्रत्येक पिढीबरोबर पुढे पुढे सरकत राहिल्या. त्यामुळे त्यांचा आवाज, त्यांचे सूर आणि गायकी सदैव तरुण राहिली. त्यांनी इतक्या प्रकारची गाणी गायिली, पण त्यात कुठेही सरमिसळ झाली नाही. त्यांनी गायिलेल्या अभंगांमध्ये भावभक्तीचा गोडवा असायचा तर नाट्यसंगीताला विशिष्ट बाज असायचा. त्यांनी गायलेला कॅब्रे तितकाच दिलखेचक आणि शृंगारिक असायचा. असे अनेक कप्पे त्यांनी लीलया जपले. हे त्यांचे वैशिष्ट्य होते. थोर गायकच हे करू शकतात आणि तेही अगदी सहजपणे.

आशाताईंची प्रत्यक्ष भेट होण्याचे भाग्य मला लाभले होते. प्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांच्या 'चेहरे' या छायाचित्रांचे प्रदर्शन पुण्यात होते. संगीतकार आनंद मोडक आणि माझे कुटुंबीय तेव्हा तिथे उपस्थित होते. त्यावेळी आशाबाईंनी मला आशीर्वाद दिला होता. ती आठवण माझ्याजवळ सदैव आहे आणि तीच माझी शक्ती आणि स्फूर्ती आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे त्या आपल्या जवळ आहेत, असे मला वाटते. आशाताईंना अगणित पुरस्कार मिळाले. पद्मविभूषण, पद्मश्री देऊन भारत सरकारने त्यांचा सत्कार केला. गिनीज बुकमध्ये त्यांचे नाव समाविष्ट केले गेले. परंतु त्या सगळ्या पुरस्कारांपेक्षाही जास्त त्यांनी आपले जग समृद्ध केले आहे. म्हणूनच आशाताई शरीररूपाने आपल्यातून गेल्या असल्या तरी स्वरांमधून, गीतांमधून आणि विविध प्रकारच्या संगीतातून त्या आपल्यात चिरंतन रूपात आहेत. कारण आयुष्यातल्या प्रत्येक क्षणी आपल्या मनात एखादा भाव उमटेल, एखादी हळुवार भावना स्पर्श करेल, तेव्हा आशाताईंचे सूर आपल्याला अलगद वेढून घेतील आणि हळूच सांगतील, 'मी आहे'.

# रविवारची पत्रे

## नागपुरातील महिलांची शेगाव पायीवारी

रात्रीचा अंधार नाहीसा होऊन आकाशी सूर्यनारायण उगवले. प्रत्येकाच्या हृदयमंदिरात गजानन महाराज अंश प्रकट होऊनी वारीसाठी सारे वारकरी प्रतापनगर येथील गणेश मंदिरात सज्ज झाले. श्री गजानन महाराज यांच्या हयातीतले रामचंद्र पाटील यांची पणती प्रज्ञा पन्नासे यांनी वारीच्या दोन्ही वाहनांची विधिवत पूजा केली. गजानन देशपांडे, डॉ. मनीषा यमसनवार आदींनी स्वागत केले. प्रवासादरम्यान भजनाच्या रंगात रंगून गेले सारे भक्त. एकमेकांचा परिचय झाला. वाटेत मोझरी इथे संत तुकडोजी महाराज यांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. तिथून भजनाच्या नादात अकोला कधी पोहोचलो हे कळलेच नाही. अकोल्यावरून दोन किलोमीटर गायगाव येथे नानासाहेब



उजवणे यांच्या मंगल कार्यालयात भोजनास्वाद घेतला. नानासाहेब उजवणे आणि त्यांची सहचारिणी यांचा गजानन महाराजांवरचा दृढविश्वास जाणून घ्यायला मिळाला. घरासमोरून जाणाऱ्या वारकऱ्यांना महाराजांच्या कृपेने स्वादिष्ट जेवण ते देतात. आम्ही इथून पालखी सजवून नागझरी वाटेने निघताना अकोला येथील माजी महापौर हरीशभाई आलमचंदानी यांनी सपत्नीक पालखीची पूजा केली व पालखीसह पायीवारी नागझरीकडे प्रस्थान झाली. वाटेत गजानन महाराज पारायण सेवा समितीचे वतीने नारळ पाणी, ग्लुकोज पाणी, मसाले भात यांची थोड्या थोड्या अंतरावर सोय केली होती. रात्री अडीच वाजता नागझरीला पोहोचलो. सुप्रभाती ६ ला पालखी दिंडीसह शेगावात सकाळी ९ वाजता पोहोचलो. शेगाव संस्थेने पालखीची पूजा आरती केली. त्यानंतर 'श्रीं'चे दर्शन घेऊन चतुर्थीचा पोटभर प्रसादरूपी नाश्ता करून आमच्या गाड्यांनी नागपूरला प्रस्थान केले. अशी भावभक्तीच्या गजरात कुणालाही काहीही त्रास न होता महाराजांच्या कृपेने पालखीसह महिलांची वारी व्यवस्थित पार पडली. या वारीत १०० च्या वर महिलांनी श्रद्धा आणि विश्वास ठेवून सहभाग घेतला. पहिल्यांदाच पायीवारी असून काहीच जाणवले नाही, ही साक्षात गजाननाचीच कृपा; या कृपेचे आम्ही सारे वारकरी भाग्यवान ठरलो.

**शैला चिमड्यालवार**/सावली/९४०५१५९३४०

## होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा : प्रश्न स्त्री सन्मानाचा

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' हा आपल्या भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र आहे. आपल्या परंपरेत स्त्रीला केवळ एक व्यक्ती म्हणून नव्हे, तर शक्ती, संस्कार आणि सृजनाची अधिष्ठात्री म्हणून पाहिले गेले आहे. स्त्री ही कुटुंबाची आधारस्तंभ, समाज घडवणारी शक्ती आणि राष्ट्राच्या प्रगतीची केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच स्त्रीचा सन्मान राखणे हे केवळ कर्तव्य नसून संस्कृतीचे रक्षण आहे. मात्र, सध्या विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये 'होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा' या नावाखाली सादर होणाऱ्या कार्यक्रमांनी चिंतेची परिस्थिती निर्माण केली आहे. सुरुवातीला मनोरंजनाच्या उद्देशाने सुरू झालेला हा उपक्रम कालांतराने आपल्या मूळ उद्देशापासून दूर गेला. आज या कार्यक्रमांमध्ये महिलांची चेष्टा करणे, त्यांची खिल्ली उडवणे, वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्याशी संबंधित प्रश्न विचारून त्यांना अवघड स्थितीत टाकणे, अश्लील किंवा अयोग्य हावभाव करायला लावणे, चुकीचे अंगविक्षेप करायला भाग पाडणे तसेच तुच्छतेची वागणूक देणे असे प्रकार वाढलेले दिसतात. मनोरंजनाच्या नावाखाली होणारे हे प्रकार प्रत्यक्षात स्त्रीच्या सन्मानाला धक्का देणारे आहेत. एका बाजूला एखाद्या विजेत्या महिलेला पैठणी किंवा इतर बक्षीस दिले जाते; पण दुसऱ्या बाजूला सहभागी झालेल्या अनेक महिलांचा सार्वजनिकरीत्या अपमान होतो. यामुळे त्यांच्या आत्मसन्मानावर परिणाम होतो, आत्मविश्वास कमी होतो आणि मानसिक खच्चीकरण होते. याचे दुष्परिणाम केवळ त्या महिलांपुरते मर्यादित राहत नाहीत. अशा कार्यक्रमांचा प्रभाव लहान मुलांवरही पडतो. त्यांच्या मनावर चुकीचे संस्कार होतात आणि स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकृत होण्याची शक्यता निर्माण होते. महिलांमध्ये एकमेकींबद्दल ईर्ष्या, स्पर्धा आणि द्वेष वाढीस लागतो, ज्यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण दूषित होते. भारतीय संस्कृती आपल्याला शिकवते 'स्त्री ही पूजनीय आहे, विनोदाची वस्तू नाही.' म्हणूनच स्त्रीच्या सन्मानाला धक्का पोहोचवणाऱ्या कोणत्याही प्रकाराला समाजाने ठामपणे विरोध करणे आवश्यक आहे. स्त्रीचा अपमान म्हणजे समाजाच्या मूल्यांचा अपमान होय. जिथे स्त्रीचा सन्मान नाही, तिथे समाजाची अधोगती निश्चित आहे. गरज आहे ती समाजात जागृती निर्माण करण्याची. महिलांचे मानसिक आणि सामाजिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी तसेच पुढील पिढीला योग्य संस्कार देण्यासाठी अशा कार्यक्रमांवर तातडीने नियंत्रण आणणे अत्यावश्यक आहे. मनोरंजनाच्या नावाखाली स्त्रीचा सन्मान तुडवणारे उपक्रम बंद होणे ही काळाची गरज आहे. स्त्री ही केवळ घराची 'होम मिनिस्टर' नसून ती समाजाची संस्कृती, कुटुंबाची ओळख आणि राष्ट्राची शक्ती आहे. तिचा सन्मान राखणे म्हणजे आपल्या संस्कृतीचे रक्षण करणे होय. म्हणूनच समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन स्त्री सन्मानासाठी आवाज उठवावा, अशा कार्यक्रमांना विरोध करावा आणि सन्मानपूर्वक, संवेदनशील व संस्कारित समाज घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**नलिनी वायाळ गावडे**/पुणे/८८८८९८७६७६

## पावले ही फुलांची उपक्रमात 'ताम्हण'चा जागर!

महाराष्ट्र राज्याची उपराजधानी नागपूर शहर, गेल्या दशकांपासून विविध नैसर्गिक फुलांनी बहरलेले शहर म्हणून ओळखले जात आहे. नागपूर तरुण भारत शताब्दी वर्षाच्या पर्वावर पावले ही फुलांची हा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमात ताम्हण या राज्य फुलाचा उत्सव साजरा करण्यात आला. १९९० च्या सुमारास महाराष्ट्र सरकारने ताम्हण फुलाला राज्यफूल म्हणून घोषित केले आहे. याला मोठा बोंडारा, हिंदीत जारुल, अर्जुन तर इंग्रजीत प्राईड ऑफ इंडिया या नावाने सुद्धा ओळखले जाते. मध्यम उंचीचा लांब गर्द पाने व जांभळ्या व तांबड्या रंगाच्या फुलांनी बहरलेले सौंदर्य वैशाखाच्या रणरणत्या उन्हात आपले वेगळेपण जपते. पश्चिम महाराष्ट्राच्या पानगळींच्या जंगलात, कोकणात नदी-नद्यांच्या काठाने आणि विदर्भ मराठवाड्यात सर्वत्र आढळणारा ताम्हण वृक्ष सर्वांच्या सुपरिचित आहे. इतर राज्यात कमी अधिक प्रमाणात आढळल्या जाणारा ताम्हण वृक्ष शेजारील देशात सुद्धा आढळून येत असल्याचे वृक्ष अभ्यासकांचे मत आहे.

ताम्हण वृक्षाच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, याची साल पिवळसर, करड्या रंगाची आणि गुळगुळीत असते. पाने साधी लंबगोल आकाराची, वरच्या बाजूने गडद हिरवी, तर खालच्या बाजूने फिकट हिरवी असतात. हिवाळ्यात पानगळ होताना पानांचा रंग तांबडा होतो. तर वसंत ऋतूची चाहूल लागताच तिला नवं पालवी फुटण्यास प्रारंभ होतो. नवं पालवीच्या पश्चात वृक्ष कळ्या फुलांनी बहरण्यास प्रारंभ होते. जांभळ्या व तांबड्या रंगाचे अत्यंत देखणे फुल रणरणत्या उन्हात मनाला मोहित करते. ताम्हण पुष्प पूर्ण उमलल्यानंतर सहा ते सात सेंटीमीटर व्यासाचे होते. सप्त नाजूक पाकळ्यांचे फूल त्याची रंगसंगती ही अप्रतिम असते. फुलांच्या मध्यभागी पिवळे नाजूक पुंकेसर विलक्षण सौंदर्यात भर घालते. झाडाला पाण्याची मुबलकता असल्यास, वर्षात दोन वेळा झाड फुलांनी बहरते. मार्च, एप्रिलमध्ये बहरलेले झाड दोन महिने फुलांनी सजलेले आढळून येते. केवळ निसर्ग सौंदर्यातच ताम्हणभर घालीत नाही तर, ताम्हणवृक्षाचे आयुर्वेद, पर्यावरणीय, सांस्कृतिक, पौराणिक महत्त्व सुद्धा बोलले जाते.

ताम्हण वृक्ष हे सागाच्या वृक्षाला पर्याय असल्याचे सांगितले जाते. अंतःर्गुणाच्या संदर्भात बोलायचे झाल्यास, या झाडाची साल विविध आजारांना बहुगुणी औषधी म्हणून कार्य करते. महाराष्ट्र विविध वारसा व परंपरेने नटला आहे. त्यात पर्यावरणीय संतुलन, जैव विविधता राखण्यास ताम्हण वृक्षाचा मोठा वाटा आहे. ताम्हण सांस्कृतिक परंपरा समृद्ध करून, धार्मिक विधींमध्येही ताम्हण फुलाचे महत्त्व अबाधित राहिलेलं आहे. याच्या संवर्धनासाठी शासन स्तरावर व्यापक प्रयत्नही होणे गरजेचे आहे.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

## माहिती तंत्रज्ञान युगातील युवा पिढी

आजचे जग हे उत्तम रोबोटिक्स यासारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे जवळ आले आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग योग्य प्रकारे केल्यास युवा पिढीसाठी मोठी संधी निर्माण होईल. तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात क्रांती घडली आहे. ऑनलाईन शिक्षण व्हर्च्युअल क्लासरूम आणि इबुक्समुळे विद्यार्थ्यांना कुठेही कधीही शिक्षण शक्य झाले आहे. युवा पिढीला विविध



विषयांमध्ये गती मिळविण्यासाठी इंटरनेट मोठा आधार ठरत आहे. अनेक तरुण नवीन स्टार्टअप्स सुरू करत आहेत, ज्यामध्ये तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

सोशल मीडियाचा उपयोग करून तरुणांना आपल्या कल्पना करा आणि व्यवसाय जगासमोर सादर करता येतात. डिजिटल मार्केटिंग वेब डिझाईन आणि ॲप डेव्हलपमेंटसारख्या क्षेत्रात आजची युवा पिढी अधिक सक्रिय आहे. तंत्रज्ञानामुळे युवा पिढीला रोजगाराच्या अनंत संधी उपलब्ध झाल्या आहेत. तथापि तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे काही नकारात्मक परिणाम देखील होत आहेत. सोशल मीडियाचा अतिरेक ऑनलाईन गेमिंगची नशा आणि माहितीचा गैरवापर यामुळे युवापिढीचा वेळ वाया जातो. त्याचबरोबर डिजिटल साधनांच्या अति वापरामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. युवा पिढीने तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता शिक्षण, संशोधन आणि सामाजिक प्रगतीसाठी करायला हवा. पालक, शिक्षक आणि समाजाने यासाठी प्रेरणा द्यायला हवी.

युवा पिढी आणि तंत्रज्ञान यांचे नाते अतूट आहे. तंत्रज्ञानाच्या योग्य वापरामुळे युवा पिढी जगभरातील स्पर्धेमध्ये आघाडीवर राहू शकते. परंतु या प्रगत साधनांचा विवेकपूर्ण आणि मर्यादित वापर करणे महत्त्वाचे आहे. युवा पिढीने तंत्रज्ञानाचा उपयोग करताना मूल्यसंस्कार आणि नीतिमत्ता याचा विसर पडू देऊ नये. तंत्रज्ञान हे भविष्य घडवणारे साधन आहे परंतु त्याचा अतिरेक हा हानिकारक ठरू शकतो व योग्य दृष्टिकोन आणि सर्तकतेने तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यास युवा पिढी समाजाच्या विकासाला नवी दिशा देऊ शकते.

**सोहम प्रशांत पेंडसे**/९०२८६७५५१८

## अंधश्रद्धा नसावी

सुशिक्षित नागरिक विशेषतः महिला बुवाबाजीकडे मोठ्या प्रमाणात आकृष्ट होताना दिसतात. याचे प्रमुख कारण आहे सहनशक्तीचा अभाव, मिळते त्यात समाधानी नसणे, दुसऱ्यावर विश्वास ठेवणे. चार लोक एकत्र करून स्वार्थापोटी त्यांचे माध्यमातून प्रचार, प्रसार करणे हा गोरखधंदा तथाकथित बुवाबाजी करणारे करतात. त्याला जीवनात समाधानी नसलेले लोक हकनाक बळी पडताना दिसतात. अशी माणसं जागी होतात ते सर्वस्व लुटल्यानंतरच.

नाशिकचे अशोक खरात प्रकरण त्यातलेच. जे त्यांच्या आहारी गेलेत ते सर्व सुशिक्षित आहेत. महाराष्ट्र महिला आयोगाच्या माजी अध्यक्षां सारखी सुशिक्षित महिला जर अशा भोंदूच्या आहारी जात असेल तर इतरांचे काय? रूपाली चाकणकर यांचा परिवार पण सुशिक्षित आहे. मुलगी वकील आहे तर मुलगा एमबीए करतो आहे. अशा सुखी, समाधानी, परिवाराला अशी दुर्बुद्धी का व्हावी हे न उलगडणारे कोडे आहे.

प्रसार माध्यमांनी खरात प्रकरण चांगलेच गाजवले. पण त्याला आता फार उशीर झाला. या भोंदूला शिक्षा होईलही पण ज्या महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले त्याचे काय? आता तर काही खासदार, आमदार, मंत्री, प्रशासकीय अधिकारी यांची नावे या प्रकरणाशी जोडली जात आहे. आता या विषयाकडे राजकीय चष्म्यातून बघितले जात आहे. याचा परिणाम चौकशी यंत्रणेवर होऊ शकतो. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा विशेषतः समाजातील विशेष गणमान्य व्यक्तींचा खरातसारख्या व्यक्तीशी कळत नकळत संबंध येऊ शकतो. खरातचे खरे रूप समाजासमोर आल्यानंतर पोलिस यंत्रणा, प्रसार माध्यमे जागृत झालीत पण या व्यक्तीला मोठे कुणी केले? याला अंधश्रद्धा म्हणायची की व्यक्तिगत स्वार्थ, असमाधानी वृत्ती.

आयुष्य अतिशय सुंदर आहे.आपले भविष्य आपल्याच हातात आहे. सुंदर आयुष्य जगायचे असेल तर बुवाबाजीकडे वळण्याची आवश्यकता नाही. स्वतःवर विश्वास असावा. कर्म करीत रहावे. यश-अपयशाची चिंता न करता. खरात प्रकरणातून एवढा धडा जरी आपण घेतला तर असे भोंदू भविष्यात जन्माला येणार नाहीत.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## महत्वाचे...



## प्रयास संस्थेच्या वतीने स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रयास मागासवर्गीय बहुद्देशीय संस्थेच्या वतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभिनव आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या रंगभवन अभ्यासकेंद्र येथे शहर व जिल्ह्यातील गरजू, होतकरू आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत स्पर्धा परीक्षेची पुस्तके वाटप सोलापूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त विणा पवार आणि प्रयास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिंदे यांच्या हस्ते किरण्यात आले. यावेळी अभ्यासकेंद्राचे अनिल घनवट, प्रसाद खोबरे, प्रज्योत फुटाणे, दिनेश जाधव, ओमकार गायकवाड, अविनाश खरटमल, रोहन उडाणशिवे, शुभम खातमोडे आदी उपस्थित होते.

## धनगर समाजाला विधान परिषदेची उमेदवारी द्यावी

**सोलापूर, दि. १७ एप्रिल-**

आगामी विधान परिषदेच्या होणाऱ्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने धनगर समाजाला प्रतिनिधित्व द्यावे, अशी मागणी शहर आणि जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडे केली आहे. विधान परिषदेतील १३ मे रोजी रिक्त होणाऱ्या जागेत धनगर समाजाचे नेते आमदार गोपीचंद पडळकर होते. आमदार पडळकर यांची जागा धनगर समाजालाच मिळावी अशी आग्रही भूमिका धनगर समाजाची आहे. यासाठी भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, सोलापूर महानगर पालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, सांगली भाजपचे नेते आणि महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. राजेंद्र तथा चिमणभाऊ अण्णासाहेब डांगे, सांगलीचे भाजपचे नेते ब्रह्मानंद पडळकर, भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेश सरचिटणीस नवनाथ पडळकर यांचा विचार करून उमेदवारी द्यावी अशी मागणी सोलापूर शहर भाजपचे पदवीधर प्रकोष्ठ संयोजक प्रा.देवेंद्र मदने, ओबीसी सेलचे माजी अध्यक्ष रामभाऊ वाकसे, जिल्हा चिटणीस अमोल बापू कारंडे, माजी उपाध्यक्ष प्रशांत फत्तेपूरकर आदींनी केली आहे.

## होम लोन 'री-स्ट्रक्चर' करून देतो म्हणून फसवणूक

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

होम लोन री स्ट्रक्चर (सोयीप्रमाणे कर्जाची नवी रचना) करून देतो म्हणून साडे ८ लाख व मोटार कार नेऊन फसवणूक केल्याप्रकरणी सात रस्ता येथील एका होमलोन कंपनीच्या हप्ता वसुलदारावर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल पुदाले ( रा. शेळगी, सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत प्रविण शिवाजी चव्हाण (वय ३३ वर्षे, रा. १०४, ऋषी हाईटस, राघवेंद्र नगर, सैफुल, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील आरोपी राहुल पुदाले हा २०२१ ते आजतागायत, सात रस्ता, सोलापूर येथे फास्टट्रॅक हौसिंग फायनान्स कंपनीमध्ये होम लोन रिकवरी चे काम करीत होता . आणि याच होम लोन कंपनीतून फिर्यादीने होम लोन घेतला होता .त्याचे हप्ते देणे बाकी असल्याने फिर्यादीला घराच्या जप्तीची नोटीस आली होती .तेव्हा कंपनीत होम लोन रिकवरी कामास असलेला वरील आरोपी राहुल पुदाले याने फिर्यादीला विश्वासात घेऊन तुमचे थकीत हप्ते बाबत होम लोन री स्ट्रक्चर करुन देतो व घराची जप्ती थांबवतो असे सांगितले . त्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने थकीत लोन भरण्यास हप्त्याची रक्कम ८ लाख ६८ हजार ७०० रुपये आरोपीला दिली असता आरोपीने ती रक्कम फायनान्स कंपनीत न भरता स्वतःसाठी वापरली . यावरच न थांबता आरोपीने फिर्यादीची वापरती रेनॉल्ड डस्टर कार (क्रं. एम एच १३ ए झेड ७५६६ ) हप्ते भरतो असे सांगुन घेवून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक पवार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत .

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील दोन कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित समारंभात, सोलापूर विभागातील मध्य रेल्वेच्या दोन कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्काराने सन्मानित केले. पुरस्कारामध्ये एक पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा गौरव करणारा विशेष उल्लेख आणि ३५००/- रुपयांचे रोख बक्षीस यांचा समावेश होता. पुरस्कार विजेते रमेश तनमोर, तंत्रज्ञ धाराशिव, सोलापूर विभाग यांनी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी येडशी-ढोकी विभागात पायी गस्त घालत असताना, त्यांना स्थान क्रमांक ४६४/०९ येथे एका OHE खांबाचा (Mast) 'RR क्लॅम्प' वाकलेल्या आणि पिळवटलेल्या अवस्थेत दिसून आला. यामुळे OHE फिटिंगचा समतोल बिघडून जक्ए तार तुटण्याची आणि परिणामी एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता होती. त्यांची सतर्कता आणि वेळीच केलेल्या कृतीमुळे गंभीर दुर्घटना टळली. तर योगेंद्र कुमार, तंत्रज्ञ , दुधनी, सोलापूर विभाग यांनी २८ जानेवारी २०२६ रोजी दुधनी-वाडी विभागात तपासणीचे कर्तव्य बजावत असताना, त्यांना किमी ५२३/२४ येथे एक 'खठ वायर ड्रॉपर' तुटलेल्या आणि लटकलेल्या अवस्थेत दिसून आला. यामुळे रेल्वेच्या सुरक्षित संचालनावर गंभीर परिणाम होत होता. त्यांनी तात्काळ संबंधित सर्व अधिकाऱ्यांना याविषयी माहिती दिली आणि एक संभाव्य अपघात टाळला.

# करवाढीशिवाय १४०० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास मान्यता देणार

- भाजपच्या पक्ष बैठकीत झाला सर्वानुमते निर्णय
- महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

शहरवासीयांवर कोणताही कर अथवा दरवाढीचा बोजा न टाकता १४०० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेला मनपा सभेत मान्यता देण्याचा निर्णय भाजपच्या पक्ष बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला. यामुळे या योजनेभोवती निर्माण झालेला संभ्रम आणि गैरसमज दूर झाला असल्याची माहिती महापौर विनायक कोंड्याल आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी दिली.

सोमवारी (दि. २० एप्रिल) होणाऱ्या सोलापूर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापालिका आयुक्तांनी पाणीपुरवठा सुधारणा योजनेचा १४०० कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला आहे. हा प्रस्ताव शासनाकडे तातडीने पाठविणे आवश्यक असल्याने तो अजेंड्यावर समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र, या प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर भांडवली मूल्यावर आधारित करप्रणाली आणि संभाव्य करवाढीबाबत भाजपमध्येच मतभेद निर्माण झाले होते. कोणतीही करवाढ केली जाणार नाही असे यापूर्वी महापौर विनायक कोंड्याल आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले होते. त्यानंतर भाजपा आमदार विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेत भांडवली मूल्यावर



आधारित करप्रणालीला विरोध दर्शविला. तसेच प्रस्ताव इंग्रजीत का पाठविला, याबाबतही त्यांनी जाब विचारला. त्यामुळे भाजपमध्ये दोन गट पडल्याचे चित्र निर्माण झाले होते.

दरम्यान, रविवारी सायंकाळी महापालिकेत झालेल्या भाजपच्या पक्ष बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत सर्व सदस्यांनी आपापली मते मांडल्यानंतर अखेरीस कोणताही कराचा बोजा न टाकता पाणीपुरवठा योजनेस मान्यता देण्यावर एकमत झाले, अशी माहिती सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी दिली.

या बैठकीस महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर अजेंड्यावरील विविध विषयांवर चर्चा करत पक्षाची रणनीतीही निश्चित करण्यात आली.

या बैठकीनंतर नरेंद्र काळे यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, जनहिताला प्राधान्य देत कोणताही वाढीव कर लादला जाणार नाही. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे हे १९ एप्रिल रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार असून पाणीपुरवठा योजनेबाबत अधिकृत माहिती देणार आहेत. दररोज पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत असून करवाढीबाबतचा गैरसमज दूर झाल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

# मालमत्ता कर थकबाकीदारांवर महापालिकेची धडक कारवाई

- ७/१२ उताऱ्यावर बोजा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू
- ४२४ पैकी १३६ गटांवर बोजा चढविण्याची प्रक्रिया पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

मालमत्ता कर थकबाकीदारांविरोधात सोलापूर महानगरपालिकेने कठोर पाऊल उचलत संबंधित मिळकतदारांच्या ७/१२ उतारा व मिळकत पत्रिकेवर कायदेशीर बोजा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. एक लाख रुपयांपेक्षा जास्त कर थकबाकी असलेल्या मिळकतदारांना वारंवार नोटीस देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने ही कारवाई करण्यात येत आहे, अशी ही माहिती उपायुक्त आशिष सुमन सुधाकरराव लोकरे यांनी दिली.

महापालिकेने दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करून थकबाकी भरण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर ९ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधित मिळकतदारांना वैयक्तिक नोटिसाही बजावण्यात आल्या. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत अभय योजना राबवून शास्ती, नोटीस फी व वॉरंट फीमध्ये १०० टक्के सवलत देण्यात आली होती. या योजनेला काही मिळकतदारांनी प्रतिसाद देत थकबाकी भरली. मात्र, अद्याप ८३९ मिळकतदारांची थकबाकी प्रलंबित असून, अधिनियमातील प्रकरण ८, नियम ४२ नुसार त्यांच्या मिळकतींवर बोजा नोंदविण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार महसूल विभाग, तहसीलदार, नगर भूमापन अधिकारी व भूमी अभिलेख विभागाकडून कार्यवाही सुरू आहे. उत्तर सोलापूर तहसीलदारांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ४२४ गटांपैकी १३६ गटांवर बोजा चढविण्याची प्रक्रिया पूर्ण केली असून याबाबत महापालिकेला कळविण्यात आले आहे. तसेच नगर भूमापन कार्यालयाकडील मिळकत पत्रिकांवर बोजा नोंदविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. संबंधित मिळकतदारांनी चालू आर्थिक वर्षासह संपूर्ण थकबाकी भरल्यानंतर त्यांच्या मालमत्तेवरील बोजा काढण्यात येणार आहे, असे महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले.

# स्थायी समिती सभेत पाणीपुरवठ्यासाठी क्लोरीन टनर खरेदीच्या प्रस्तावाला मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी लागणाऱ्या क्लोरीन टनर खरेदीच्या प्रस्तावाला स्थायी समिती सभेने शुक्रवारी एकमताने मान्यता दिली. नवीन खरेदी मक्तेदारांकडून होण्यापूर्वी तूर्त २० लाख रुपये किमतीचे क्लोरीन टनर खरेदी करण्याचा हा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने स्थायी समितीकडे पाठविला होता. चर्चेअंती याला मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेपुढे हा केवळ एकच प्रस्ताव मान्यतेसाठी आला होता. गत आर्थिक वर्षात मान्यता दिलेल्या मक्तेदाराकडून जीएसटी वगळून ९३०० रुपये दराने ६०० नग क्लोरीनचा पुरवठा करण्यात आला होता. हा पुरवठा संपला असल्याने शहराला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यासाठी गरजेचा असलेला क्लोरीन टनर पुरवठा पुन्हा करून घेण्यात येत आहे. यासाठी नव्या आर्थिक वर्षात क्लोरीन टनर खरेदी करण्याचा नव्याने प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

पाणीपुरवठ्याची तातडीची गरज व अत्यावश्यक सेवा विचारात घेता मंजूर मक्तेदाराकडून ज्यादा ३० टक्के क्लोरीन टनर खरेदी करण्याबाबत निविदेमध्ये अट नमूद असून करारपत्रातही ही बाब नमूद आहे. १८० नग क्लोरीन टनर खरेदी करण्याचा १९ लाख ७५ हजार ३२० रुपयांच्या जीएसटी वगळून येणाऱ्या खर्चास, योग्य त्या रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करारपत्र करून वर्कऑर्डर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी आला आहे.

## आठ आरोपींना तीन वर्षांची शिक्षा

**मोहोळ न्यायालयाचा निकाल**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १८ एप्रिल-**

मोहोळ येथील दिवाणी व फौजदारी न्यायाधीश क्र. १ श्री. मुंडे यांनी फौजदारी खटला क्र. ३२/२०१४ मध्ये महत्त्वपूर्ण निकाल देत आठ आरोपींना दोषी ठरवले. या प्रकरणात माणिक श्रीधर खाडे, समीर आत्माराम खाडे, समाधान आत्माराम खाडे, विनायक श्रीधर खाडे, श्रीधर लक्ष्मण खाडे, आत्माराम लक्ष्मण खाडे, लिलावती माणिक खाडे व तनुजा समीर खाडे (सर्व रा. कातेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर) यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १४७, १४८, ३२३, ३२६ व १४९ अंतर्गत दोषी ठरवण्यात आले. न्यायालयाने सर्व आरोपींना प्रत्येकी ५ हजार रुपये दंड व तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फिर्यादी धनाजी शिवाजी जाधव (रा. कातेवाडी) यांना आरोपींकडून एकूण ५० हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. या खटल्यात सरकार पक्षातर्फे ॲड. कीर्ती कस्तुरे यांनी काम पाहिले. फिर्यादीतर्फे ॲड. सु. खं. देशपांडे व ॲड. मनोजकुमार भालेराव यांनी बाजू मांडली. आरोपींच्या बाजूने ॲड. शाहू भोसले यांनी युक्तिवाद केला.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन:- डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १८०/१ यांसी नविन सर्व्हे नं. १७१/१/दक्षिण यापैकी ''राधाकृष्ण नगर भाग-२'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वसाहतीमधील:

प्लॉट नं. ३९: पूर्वपश्चिम ४० फुट, दक्षिणोत्तर २५ फुट, एकूण १००० चौरस फुट अथवा ९२.९३ चौ.मी.

प्लॉट नं. ४०: पूर्वपश्चिम ४० फुट, दक्षिणोत्तर २५ फुट, एकूण १००० चौरस फुट अथवा ९२.९३ चौ.मी.

प्लॉट नं. ४१: पूर्वपश्चिम ४० फुट, दक्षिणोत्तर १८ फुट, एकूण ७२० चौरस फुट अथवा ६६.९१ चौ.मी.

असे तिन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्र २७२० चौ. फुट अथवा २५२.७७ चौ.मी. यासी एकत्रित चतुःसिमा - पूर्वेस:- प्लॉट नंबर २८, २९, ३०, दक्षिणेस:- नरसिंग विडी घरकुल, पश्चिमेस:- रस्ता, उत्तरेस:- प्लॉट नंबर ३८. येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुली प्लॉट जागा व त्यातील असणारे वहिवाटीचे हक्क व इतर सर्व कायदेशीर अधिकार व यातील तदंमभूत वस्तूसह. सदर मिळकत ही श्री. अतिश कृष्णराव क्षिरसागर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांना सदर जागेचा व्यवहार करुन आमचे अशिलाकडून रक्कम स्विकारलेली आहे व सदरचा व्यवहार ठरलेला आहे.

सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलास दिलेली आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाहीचा, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा, लीज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबंध, वाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमूद मिळकतीचे आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचेही कसलेही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख १८/०४/२०२६.

सही/-
रविक्रांत रंगनाथ पाटील
ॲडव्होकेट (बी.ए.एल. एलएल.बी.)
पत्ता: आहेरवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर
मो.नं. ७३८७३८४१०१
विशाल शांतय्या स्वामी तर्फे ॲडव्होकेट



### मध्य रेल्वे

सोलापूर विभाग

सिग्नलिंगचे काम

ई-निविदा सूचना

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-२०२६-२७-०३

दिनांक: १५.०४.२०२६

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: अनुक्रमांक:- १., कामाचे नाव आणि ठिकाण:- मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील लातूर-लातूर रोड सेक्शनमधील घामी (प्रस्तावित नवीन ब्लॉक स्टेशन) येथे इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची तरतूद., निविदा क्रमांक:- SUR-N-T-२०२६-२७-०३, कामाचा अंदाजित खर्च:- रु. ८,६७,२२,८९८.४९, निविदा अर्जाची किंमत:- शून्य, जमा करावयाची किमान रक्कम:- रु. १७,३४,५००, कामाच्या पूर्ततेचा कालावधी:- १२ महिने, निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:- ०८/०५/२०२६ रोजी १५:३० नंतर, तपशील आयरेप्स वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही शुद्धिपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदा सादर करणाऱ्यांना विनंती आहे की, त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग ३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (EMD) प्राप्त करून त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. ईएमडी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे व्यक्तिशः सुपूर्द करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

डीआरएम एस अँड टी शाखा, सोलापूर

16

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डने प्रवास करणे टाळा



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

शहर सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः शहर सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे डोंबरजवळगे येथील गट क्र. व उपविभाग क्र. १८१/४/अ याचे क्षेत्र १ हे. ३१ आर व पोट खराब २ आर असे एकूण क्षेत्र १ हे. ३३ आर यांसी आकार १ रू. ८४ पैसे असे असून याची चतुःसिमा पुर्वेस : गट नं. १७७, पश्चिमेस : गट नं. १८२ व रस्ता, दक्षिणेस : गट नं. १८०, उत्तरेस : गट नं. १७४ अशी आहे.

येणे प्रमाणे मिळकती जागा रोहिदास यल्लप्पा बनसोडे यांचे मालकी कब्जे वहिवाटीची होती व आहे. वरील नमूद मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याने व तसेच सदर वर नमूद मिळकतीचे मालकांनी तसा विश्वास दाखविल्याने आमचे अशिल वीरेंद्रनाथ सुर्यकांत ढंगे यांनी वरील मिळकत डोंबरजवळगे अक्कलकोट सोलापूर हि मिळकत इसारापावती काही रक्कम देवून आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

सदरील मिळकतीवर इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे दिनांक १८/०४/२०२६.

**अशिल**
**वीरेंद्रनाथ सुर्यकांत ढंगे**
**मो.नं. ९६०४५६१४३६**

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. नितीन नागनाथ लोंढे,
बी.ए., एमएसडब्ल्यू, एलएल.बी.,
प्लॉट नं. २८, राघवेंद्र नगर, एम.आय.डी.सी. सोलापूर
मो.नं. ९७६४४१०९२१



नेमलेली तारीख ७ /०४/२०२६

ॲड. ए.पी. रोकडे
अडव्होकेट
निशानी क्र. १६

### जाहिर समन्स/नोटीस

अहमदनगर येथील मे. सिव्हील जज्ञ साहेब, सि.डी. अहमदनगर यांचे कोर्टात.......

एच.एम.पी. नं. २०६/२०२५

**प्रणाली मयुर दाते** — अर्जदार .....

विरुध्द

**मयुर रावसाहेब दाते** — सामनेवाले...-:

सामनेवाले,
**मयुर रावसाहेब दाते**
रा. आर. एम. १९०, जयभवानी चौक, बजाजनगर, वडगांव कोल्हाटी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर, मो.नं. ८६९८६८८९९६

ज्या आर्थी अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द घटस्फोट मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे आपणास वेळोवेळी समन्स काढून तुम्हास समन्संची बजावणी होऊ शकली नाही. तसेच मे. कोर्टाचे समन्स/नोटीस तुम्हास आर.पी.ए.डी. द्वारे पाठवून देखील तुम्ही जाणीवपुर्वक मे. कोर्टाचे समन्स स्विकारले नाही, तसेच मे. कोर्टा मार्फत देखील तुम्हास समन्स/नोटीस पाठविली आहे. तसा बेलिफ यांचा रिपोर्ट आलेला आहे. सदर अर्जाच्या पुढील कामकाजासाठी आपणास अर्जाचे समन्स/नोटीसची बजावणी होणे आवश्यक व गरजेचे असल्याने मे. कोर्टाने तुमचे विरुध्द जाहीर समन्स काढण्याचा आदेश केला आहे. सबब तुम्हास या जाहीर समन्स/नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, दिनांक ३०/०४/२०२६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा अशा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असुन जो दाव्यासंबंधी सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती त्यांच्या बरोबर असेल अशा वकील साहेब यांचेमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे सुचीत करण्यात येत आहे.

तुम्हाला जाहीर समन्स/नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहील्यास तुमच्या विरुध्द एकतर्फा आदेश होऊन अर्जाची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

आज दिनांक २४ माहे मार्च २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
बेंच क्लार्क
सिव्हिल जज्, सि.डी. अहमदनगर

शिक्का

हुकूमावरुन
अधिक्षक
सिव्हिल जज्, सि.डी. अहमदनगर



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास सावधान करणेत येते की,

डि ।। सब डि ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी जिल्हा परिषद सोलापूर हद्दीतील व पंचायत समिती ता. उत्तर सोलापूर हद्दीतील ग्रामपंचायत मौजे हिप्परगे येथील गट नं. ६०/३ पैकी प्लॉट नं. ३५ व ३६ ही खुली जागा या दोन्ही जागेचे मिळून एकूण क्षेत्र १४४.९२ चौ.मी. अगर १५६०.०० चौ.फुट इतके आहे. यामध्ये लिहून देणार श्री. विनोद गोकुळ व्हटकर यांचे मालकी हक्कासह सदर मिळकत त्यांनी विक्रीस काढलेले आहे.

त्यानुसार आमचे अशिल रा. सोलापूर यांनी सदर मिळकत खरेदी घेण्याचे ठरवून इसारा रक्कम संबंधीत खुली प्लॉट मालक यांना दिली आहे. त्याच वेळी सदरची खुली प्लॉट निर्वेध व निजोखमी असल्याची खात्रीही त्यांनी दिली आहे. त्यानुसार चालू योग्य बाजार भावानुसार मुल्य ठरवून पुढील व्यवहार करणेचे ठरले आहे.

सबब, या खरेदी व्यवहारास कोणाची कांही हरकत, आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत पुराव्यानिशी हरकत दयावी. अन्यथा मुदतीत हरकत न आलेस मिळकत निर्वेध व निजोखमी समजून पुढील व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली ता. १८/०४/२०२६.

सही/-
ॲड. एम. व्ही. फुलमाळी
कार्या : बेसकर चेंबर नं. १०६, जिल्हा न्यायालयाचे शेजारी, सोलापूर,
मो. नं. ८९७५५७७१०३



### जाहिर नोटीस

जन्म - मृत्यू नोंद नं. ९६/२०२५

**करमाळा येथील मे. तहसीलदार सो, तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कोर्टात**

**श्री. अंकुश रामभाऊ आमृळे** -- अर्जदार

**विरुद्ध**

**ग्रामसेवक सो. ग्रामपंचायत झरे,** -- सामनेवाला

यातील अर्जदार यांचे वडील रामभाऊ निवृत्ती आमृळे यांचे दिनांक ३०/०३/२०२४ मौजे, झरे ता. करमाळा येथे मृत्यू झाला आहे. परंतु यातील अर्जदार अंकुश रामभाऊ आमृळे यांचे वडील रामभाऊ निवृत्ती आमृळे यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत जन्म - मृत्यू रजिस्टरला झालेली नव्हती व नाही. म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद दिनांक ३०/०३/२०२४ रोजी झाल्याचे मा. ग्रामसेवक ग्रामपंचायत मौजे, झरे येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला नोंद धरणे कामी मे. कोर्टाचा हुकूम मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांचे वडील रामभाऊ निवृत्ती आमृळे यांच्या मृत्यूची नोंद मौजे, झरे ग्रामपंचायत रजिस्टरला धरणेकामी कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास दि. ४/५/२०२६ रोजी सकाळी ११-00 वाजता किंवा १५ दिवसाचे आत स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. अगर कोणीही हजर न राहिल्यास मे. कोर्ट कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार नाही म्हणून योग्य तो हुकूम करतील कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहिर नोटीस दिली असे.

आज दिनांक १७/४/२०२६ रोजी आमचे सही न्यायालयाचे सही शिक्यानिशी दिली.

सही/-
हुकुमावरून
तहसीलदार, करमाळा



### जाहिर नोटीस

जन्म - मृत्यू नोंद नं. ९७/२०२५

**करमाळा येथील मे. तहसीलदार सो, तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कोर्टात**

**श्री. अंकुश रामभाऊ आमृळे** -- अर्जदार

**विरुद्ध**

**ग्रामसेवक सो. ग्रामपंचायत झरे,** -- सामनेवाला

यातील अर्जदार यांची आई सुभद्रा रामभाऊ आमृळे यांचे दिनांक २५/०१/२०१४ मौजे, झरे ता. करमाळा येथे मृत्यू झाला आहे. परंतु यातील अर्जदार अंकुश रामभाऊ आमृळे यांची आई सुभद्रा रामभाऊ आमृळे यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत जन्म - मृत्यू रजिस्टरला झालेली नव्हती व नाही. म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद दिनांक २५/०१/२०१४ रोजी झाल्याचे मा. ग्रामसेवक ग्रामपंचायत मौजे, झरे येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला नोंद धरणे कामी मे. कोर्टाचा हुकूम मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांची आई सुभद्रा रामभाऊ आमृळे यांच्या मृत्यूची नोंद मौजे, झरे ग्रामपंचायत रजिस्टरला धरणेकामी कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास दि. ४/५/२०२६ रोजी सकाळी ११-00 वाजता किंवा १५ दिवसाचे आत स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. अगर कोणीही हजर न राहिल्यास मे. कोर्ट कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार नाही म्हणून योग्य तो हुकूम करतील कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहिर नोटीस दिली असे.

आज दिनांक १७/४/२०२६ रोजी आमचे सही न्यायालयाचे सही शिक्यानिशी दिली.

सही/-
हुकुमावरून
तहसीलदार, करमाळा



### Classifieds

**विकणे आहे**

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.

मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**




## महत्त्वाचे

### गोल्फपटू उदयन मानेला ग्रीन आयजीपीएल विजेतेपद



**नवी दिल्ली** : गोल्फपटू उदयन मानेने शनिवारी येथे आयोजित एएम ग्रीन आयजीपीएल स्पर्धेत दिग्गज गोल्फपटू गगनजीत भुल्लरवर सात शॉट्सची निर्णायक आघाडी घेत, आपले पहिलेवहिले आयजीपीएल विजेतेपद पटकावले.पहिल्या फेरीपासूनच किमान संयुक्त आघाडीवर असलेल्या मानेला, सुरुवातीला दोन बोगींचा सामना करावा लागला. मात्र, या भारतीय खेळाडूने अत्यंत आत्मविश्वासाने या परिस्थितीला प्रत्युत्तर दिले. त्याने सात बर्डीज नोंदवित अंतिम फेरीत ६७ गुणांची नोंद केली आणि आपला वर्चस्वपूर्ण विजय निश्चित केला. ■

### विश्व बॅडमिंटन स्पर्धेसाठी शुभंकर डिझाईन स्पर्धा

**नवी दिल्ली** : भारतीय बॅडमिंटन संघटनेने (बीएआय) बीडब्ल्यूएफ विश्व बॅडमिंटन स्पर्धा २०२६ साठी अधिकृत देशव्यापी शुभंकर (मॅस्कॉट) डिझाईन स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी चाहते आणि कलाकारांना आमंत्रित करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रतिष्ठित बॅडमिंटन स्पर्धेची ओळख घडवण्याची संधी मिळेल. या स्पर्धेचा उद्देश चाहत्यांचा सहभाग वाढवणे आणि भारताची सांस्कृतिक विविधता व बॅडमिंटनचा वारसा साजरा करणे हा आहे. १७ वर्षांनंतर बीडब्ल्यूएफ विश्वचॅम्पियनशिप भारतात परत येत आहे, ही बॅडमिंटनमधील भारताची प्रगती अधोरेखित करते. शुभंकर शोध स्पर्धा भारताच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगती दर्शवणारी एक दृश्यात्मक ओळख तयार करण्याची एक अनोखी संधी देते. ही स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुली असून, ती १८ एप्रिल ते १० मे पर्यंत चालेल. यामध्ये २५,००० रुपयांचे बक्षीस आणि व्हीआयपी तिकिटे आहेत.

### कनिष्ठ विश्वचषक नेमबाजीत भारतीयांचे यशाचे लक्ष्य

**कैरो** : इजिप्तची राजधानी कैरो येथे १९ ते २७ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या संयुक्त कनिष्ठ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५८ भारतीय नेमबाज व सहायक कर्मचाऱ्यांची पहिली तुकडी कैरोच्या दिशेने रवाना झाली आहे. भारताने या स्पर्धेतील एकूण १८ पदकाच्या स्पर्धांसाठी ७१ नेमबाजांचे पथक पाठवले आहे; यामध्ये कैरो येथे होणाऱ्या १५ ऑलिम्पिक स्पर्धांसाठीच्या ३६ नेमबाजांचा समावेश आहे. या तीन अतिरिक्त स्पर्धांमध्ये कनिष्ठ गटातील पुरुष व महिलांच्या ५० मीटर रायफल प्रोन (झोपून नेमबाजी) या पारंपरिक स्पर्धांचा, तसेच पुरुषांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेचा समावेश आहे. ही २५ मीटर पिस्तूल स्पर्धा २०२८ च्या ऑलिम्पिकचा भाग बनण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकूणच, कैरो येथे २५ देशांतील २८४ खेळाडू स्पर्धा करतील; यात भारताचा संघ सर्वात मोठा असेल. यजमान इजिप्त आपला २९ सदस्यांचा संघ मैदानात उतरवेल, तर वैयक्तिक तटस्थ खेळाडू या नावाने सहभागी होणाऱ्या रशियाने ४३ सदस्यांचा मोठा संघ स्पर्धेसाठी पाठविला आहे. या स्पर्धेसाठी फ्रान्स (२४), ग्रेट ब्रिटन (१६) आणि इटलीने (१३) संघ पाठविले आहे.

### गिल तांत्रिकदृष्ट्या सरस : पीयूष चावला

**नवी दिल्ली** : शुभमन गिल हा तांत्रिकदृष्ट्या इतका सरस आहे की, त्याला धावांची कमतरता भासताना तुम्ही कधीच पाहणार नाही. हीच त्याच्या फलंदाजीची खरी सुंदरता आहे, असे भारताचा माजी फिरकी गोलंदाज पीयूष चावला म्हणाला. गिलची फलंदाजी पाहणे हा एक सुखद अनुभव असतो. ८६ धावांच्या या खेळीत, गिलने केवळ शास्त्रीय फटके खेळले. केवळ साधे फटके मारून त्याने केकेआरच्या गोलंदाजी आक्रमणाला दबावाखाली आणले. त्याने चेंडूच्या गुणधर्माचा आदर करत फलंदाजी केली, असे चावला म्हणाला. चावलाने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात गुजरात टायटन्सचा विजय निश्चित करण्यात शुभमन गिलच्या संयमी खेळीला श्रेय दिले. तसेच, अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील संघाने सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात संधीचे सोने करण्यात केलेली चूक हाच या सामन्याचा कलाटणी देणारा क्षण ठरल्याचेही त्याने नमूद केले.

### फिरकीपटू रशीद खानच्या घरी चिमुकल्याचे आगमन

**नवी दिल्ली** : अफगाणिस्तानचा स्टार फिरकीपटू रशीद खानने मैदानाबाहेरील एका विशेष क्षणाचा आनंद साजरा केला. त्याने समाज माध्यमावर एका भावूक पोस्टद्वारे आपल्या मुलाच्या जन्माची बातमी सामायिक केली आणि या नवजात बाळाची ओळख अझलान म्हणून करून दिली. या घोषणेसोबतच त्याने एक प्रेमळ छायाचित्र आणि लाकडी फलकाचा फोटो शेअर केला, ज्यावर 'हॅलो जग, माझे नाव अझलान खान आहे,' असे लिहिले होते; यामुळे या घोषणेला एक उबदार आणि वैयक्तिक स्पर्श लाभला. ईश्वराचे आभार). या जगात तुझे स्वागत आहे, माझ्या छोट्या राजकुमारा, असे म्हणत त्याने आभार मानले आणि त्याने आपल्या हितचिंतकांना आपल्या कुटुंबासाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले. ■

# दिल्लीचा बंगळुरूवर ६ गड्यांनी विजय

## केएल राहुल, ट्रिस्टन स्टब्सची दमदार अर्धशतके

◆ **बंगळुरू, १८ एप्रिल**

शनिवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यात केएल राहुल (५७) व ट्रिस्टन स्टब्सच्या (नाबाद ६०) अर्धशतकी खेळींच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर (आरसीबी) एक चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी विजय मिळविला. दिल्लीचा हा पाच सामन्यातील तिसरा विजय असून त्यांनी ६ गुणांसह गुजरातला मागे टाकत चौथे स्थान मिळविले. आरसीबीचा हा सहा सामन्यातील दुसरा पराभव असून ते ८ गुणांसह दुसऱ्या स्थानावर कायम आहे.

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजांनी आरसीबीला २० षटकांत ८ बाद १७५ धावांवर रोखले. त्यानंतर दिल्ली कॅपिटल्सने १९.५ षटकांत ४ बाद १७९ धावा काढून आपला विजय साकार केला. ४७ चेंडूंत नाबाद ६० धावांची विजयी खेळी करणारा ट्रिस्टन स्टब्स सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. आरसीबीचा सलामीवीर फिल सॉल्ट (६३) याची अर्धशतकी खेळी व्यर्थ ठरली.

फिल सॉल्ट व विराट कोहलीने ५२ धावांची सलामी भागीदारी करून आरसीबीच्या डावाची झकास सुरुवात केली. लुंगी नगिदीने कोहलीला (१९) निसंकाकडून झेलबाद केले. पुढे सॉल्टने देवदत्त पडिक्कलच्या साथीने संघाला शंभर धावांच्या जवळ आणले, त्यावेळी देवदत्त (१८) अक्षर पटेलच्या गोलंदाजीला बळी पडला. पुढे फिल सॉल्ट कुलदीप यादवच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. सॉल्टने अवघ्या ३८ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांसह ६३ धावांचे योगदान दिले, तो बाद झाला तेव्हा आरसीबीची स्थिती १०.४ षटकांत ३ बाद १०५ अशी होती. कर्णधार रजत पाटीदार (८) मोठी खेळी करेल असे वाटत असताना मुकेश कुमारने त्याला नटराजन्‌कडे झेल सोपविण्यास भाग पाडले. टिम डेव्हिडने (२६) जितेश शर्माच्या (१४) मदतीने संघाची धावसंख्या वाढविण्याचा चांगला प्रयत्न केला, मात्र पटेलने डेव्हिडला, तर नगिदीने जितेशला रोखले. रोमारिओ शेफर्ड (१) कुलदीपच्या फिरकीपुढे टिकाव धरू शकला नाही. कृणाल पांड्या १२ धावा काढून धावबाद झाला. रसिख सलाम (०) व भुवनेश्वर कुमार (३) नाबाद राहिले. दिल्ली कॅपिटल्सकडून अक्षर पटेल, कुलदीप यादव, लुंगी नगिदीने प्रत्येकी २ बळी, तर मुकेश कुमारने एक बळी मिळविला.



केएल राहुल
धावा ५७
चेंडू ३४
चौकार ६
षट्कार २

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. पहिल्याच षटकांत भुवनेश्वर कुमारने सलामीवीर पाथमु निसंकाला (१) पायचित केले. मात्र त्यानंतर केएल राहुलने धैर्याने आरसीबीच्या गोलंदाजांचा सामना करत दिल्लीचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. राहुलने करुण नायर (५), समीर रिझवी (२) व ट्रिस्टन स्टब्सच्या साथीने वैयक्तिक अर्धशतक साजरे केले व संघाला शंभर धावांच्या जवळपास आणले. कृणाल पांड्याने रोखण्यापूर्वी केएल राहुलने ३४ चेंडूंत ६ चौकार व २ षट्कारांसह ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली. पुढे ट्रिस्टन स्टब्सने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत अक्षर पटेलच्या साथीने संघाला विजयाच्या दिशेने नेले. तथापि, यादरम्यान अक्षर पटेल (२६) जखमी निवृत्त झाला. अक्षर लंगडतच मैदानाबाहेर गेला. आशुतोष आणि कृणालने त्याला मैदानाबाहेर जाण्यास मदत केली. तोपर्यंत दिल्ली कॅपिटल्सने ४ बाद १३४ धावांपर्यंत मजल मारली होती. पुढे ट्रिस्टन स्टब्स व डेव्हिड मिलरने नाबाद खेळी करत दिल्ली कॅपिटल्सला विजयापर्यंत पोहोचवले. ट्रिस्टन स्टब्सने ४७ चेंडूंत नाबाद ६० धावांची विजयी अर्धशतकी खेळी केली, यात त्याने ४ चौकार व एक षट्कार खेचला. डेव्हिड मिलर २२ धावांवर नाबाद राहिला. आरसीबीकडून भुवनेश्वर कुमारने २६ धावांत ३ बळी टिपण्यात यश मिळविले. कृणाल पांड्याने एक बळी घेतला.जोश हेझलवुड, रसिख खान व सुयश शर्मा व रोमारिओ शेफर्डने केवळ धावा वाटण्याचे काम केले.

(वृत्तसंस्था)

ट्रिस्टन स्टब्स
नाबाद ६०
चेंडू ४७
चौकार ४ षट्कार १



# अभिषेक, क्लासेनची अर्धशतके

**सनरायझर्स हैदराबाद ९ बाद १९४**

◆ **हैदराबाद, १८ एप्रिल**

येथील राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) विरुद्धच्या आयपीएल सामन्यात अभिषेक शर्मा (५९) व हेनरिक क्लासेनच्या (५) बहारदार अर्धशतकी खेळीच्या बळावर सनरायझर्स हैदराबादने २० षटकांत ९ बाद १९४ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली. आता सीएसकेसमोर विजयासाठी १९५ धावांचे लक्ष्य राहिले.

सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबादला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. आपल्या घरच्या मैदानावर खेळताना अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेडने ३५ चेंडूंत ५५ धावांची सलामी भागीदारी करून सनरायझर्स हैदराबादला दमदार सुरूवात करून दिली. मुकेश चौधरीच्या चेंडूवर हेडचा झेल उडाला व गायकवाडने तो झेप घेत पकडला. ट्रॅव्हिस हेडने २० चेंडूंत २३ धावांची भर घातली. त्यानंतर मुकुल चौधरीने पुढच्याच चेंडूवर अभिषेकला साथ देण्यास आलेल्या कर्णधार ईशान किशनला (०) आल्या पावली तंबूत परत पाठविले. हैदराबादने ६ षटकांत ७५ धावांत २ महत्त्वपूर्ण गडी गमावले. पुढे अभिषेकने हेनरिक क्लासेनच्या मदतीने संघाला शंभर धावांचा जवळपास आणले, त्याचवेळी जॅमी ओव्हर्टनने अभिषेक शर्माला सॅमसनकडून झेलबाद केले. अभिषेक शर्माने झंझावाती फलंदाजी करीत अवघ्या २२ चेंडूंत ६ चौकार व ४ षट्कारांसह ५९ धावांची अर्धशतकी खेळी केली.



हेनरिक क्लासेन
धावा ५९
चेंडू ३९
चौकार ६
षट्कार २



अभिषेक शर्मा
धावा ५९
चेंडू २२
चौकार ६
षट्कार ४

पुढे हेनरिक क्लासेनने जबाबदारीने फलंदाजी करीत अनिकेत वर्मा (२), नितीश कुमार रेड्डी (१२) व सलील अरोराच्या मदतीने सनरायझर्स हैदराबादला १७.२ षटकांत ६ बाद १७७ धावांचा टप्पा गाठून दिला. ओव्हर्टनने अनिकेत व नितीश कुमारला बाद केले. ओव्हर्टनच्या तीन बळींमुळे क्लासेनचे काम अवघड झाले. मध्यम गती गोलंदाज अंशुल कम्बोजने हेनरिक क्लासेनला रोखले. हेनरिक क्लासेनने ३९ चेंडूंत ६ चौकार व २ षट्कारांसह ५९ धावांची खेळी केली.

लियाम लिव्हिंगस्टोन (१), शिवांग कुमार (१२), प्रफुल्ल हिंगेने (नाबाद शून्य) सनरायझर्स हैदराबादला २० षटकांत ९ बाद १९४ अशी आव्हानात्मक धावसंख्या रचून दिली.

सीएसकेकडून जॅमी ओव्हर्टन व अंशुल कम्बोजने प्रत्येकी ३ बळी, मुकेश चौधरीने २ बळी, तर गुरजपनीत सिंगने एक बळी टिपला.

(वृत्तसंस्था)

# धोनीने काढले ग्राऊंडमनसोबत फोटो



मैदानावर ग्राऊंडमनसोबत छायाचित्र काढता महेंद्रसिंह धोनी

◆ **हैदराबाद, १८ एप्रिल**

चेन्नई सुपर किंग्सचा (सीएसके) अनुभवी खेळाडू एम.एस. धोनीने पुन्हा एकदा मैदानाबाहेर आपल्या एका हृदयस्पर्शी कृतीने सर्वांची मने जिंकली आहेत. शनिवारी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या आयपीएल सामन्यापूर्वी, राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर धोनी ग्राऊंड स्टाफशी संवाद साधताना आणि त्यांच्यासोबत फोटो काढताना दिसला.

समाज माध्यमावर सामायिक केलेल्या एका व्हिडीओमध्ये, धोनी ग्राऊंडमनशी अत्यंत आपुलकीने संवाद साधताना, त्यांच्याशी हसून बोलताना आणि फोटोंसाठी पोझ देताना दिसत आहे. यातून त्याची नम्रता आणि या खेळासाठी अनेकदा पडद्याआड राहून योगदान देणाऱ्या घटकांबद्दल असलेला त्याचा आदर दिसून येतो.

दरम्यान, आयपीएल २०२६ मध्ये धोनीने अद्याप एकही सामना खेळलेला नाही; सराव सत्रादरम्यान त्याच्या पोटरीच्या स्नायूला दुखापत झाल्यामुळे तो सामन्यांपासून दूर राहिला होता. तथापि, या हंगामात पहिल्यांदाच तो संघासोबत प्रवासाला निघाला आहे.

(वृत्तसंस्था)

# राजस्थान केकेआरच्या पराभवाची मालिका पुढे नेणार का?

◆ **कोलकाता, १८ एप्रिल**

दुखापतग्रस्त राजस्थान रॉयल्स जोरदार पुनरागमन करून संघर्ष करणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्सचे दुःख अधिक वाढवण्याचा प्रयत्न करेल. रविवारी दुपारी कोलकाता येथीलर ईडन्स गार्डन्सवर होणाऱ्या आयपीएल सामन्यात, भिन्न कामगिरी करणारे हे दोन संघ आमने-सामने उभे ठाकणार आहे.

या सामन्यात या हंगामातील सर्वात मजबूत संघांपैकी एकाचा सामना कदाचित सर्वात वाईट फॉर्ममध्ये असलेल्या संघाशी होणार आहे.

सनरायझर्स हैदराबादने रोखण्यापूर्वी राजस्थानने सलग चार विजय मिळवून जोरदार मुसंडी मारली होती, तर दुसरीकडे केकेआरची वाटचाल अगदी उलट दिशेने झाली आहे व सहा सामन्यांनंतरही ते आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहेत.



अजिंक्य रहाणे



ईशान किशन

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील केकेआर संघाचा अनेकदा विजयाच्या स्थितीतून पराभवच सातत्याने होत राहिला आहे, ज्यामुळे संघाचा आत्मविश्वास आणि लय कमी झाली आहे. त्यांचा एकमेव गुण कोलकाता येथे पंजाब किंग्सविरुद्ध पावसामुळे रद्द झालेल्या सामन्यातून मिळाला आहे.

**केकेआरच्या दुखापतींच्या समस्य**

हर्षित राणा व आकाश दीप दुखापतींमुळे संघाबाहेर असल्याने, तर मथिशा पाथिराना अजून संघात सहभागी न झाल्याने कमकुवत वेगवान गोलंदाजी आक्रमणामुळे केकेआरच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

तरीही, रहाणे व मुख्य प्रशिक्षक अभिषेक नायरच्या मार्गदर्शनाखाली मैदानावर घेतलेल्या त्यांच्या निर्णयांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

निवड आणि सामना व्यवस्थापनाने भुवया उंचावल्या आहेत. काही वादग्रस्त निवड निर्णयही घेण्यात आले आहेत, यात न्यूझीलंडचा टी-२० विश्वचषकातील सर्वाधिक धावा करणारा खेळाडू टिम सेफर्ट केवळ शेवटच्या सामन्यात खेळला, तर स्टार अष्टपैलू खेळाडू रचिन रवींद्र अजूनही बाकावरच बसला आहे. अनेक आश्वासक देशांतर्गत खेळाडूंनाही अद्याप संधी मिळालेली नाही.

**आजचे सामने**

**कोलकाता नाईट रायडर्स वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून ००

**पंजाब किंग्स वि. लखनौ सुपर जायंट्स**
**स्थळ** : महाराजा यादविंद्र सिंह स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून
थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर

शेन वॉटसन, टिम साउथी आणि ड्वेन ब्राव्हो यांचा समावेश असलेला एक सुसज्ज सपोर्ट स्टाफ असूनही, कोलकाता नाइट रायडर्स मैदानावर नवनवीन कल्पनांचा अभाव असलेला दिसत आहे.

(वृत्तसंस्था)

# लखनौ पंजाब किंग्सला रोखणार?

◆ **मुल्लानपूर, १८ एप्रिल**

रविवारी मुल्लानपूर येथे होणाऱ्या आयपीएल सामन्यात पंजाब किंग्ज आपला विजयी सिलसिला कायम राखण्यासाठी आपल्या भक्कम फलंदाजीवर अवलंबून असेल. त्यांच्यासमोर लखनौ सुपर जायंट्सचे आव्हान असेल; मात्र लखनौचा संघ सध्या अडचणीत असून, कर्णधार ऋषभ पंतच्या दुखापतीमुळे त्यांची चिंता वाढली आहे. आतापर्यंत एकमेव अपराजित संघ असलेल्या पंजाब किंग्जने या हंगामात अत्यंत प्रभावी कामगिरी केली आहे. पाचपैकी चार सामन्यांत त्यांनी विजय मिळवला असून, कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धचा एक सामना पावसामुळे रद्द झाला होता.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील केकेआर संघाचा नेट रन रेट (+१.०६७) अत्यंत समाधानकारक आहे. त्यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर त्यांनी लक्ष्याचा पाठलाग करताना अनेकदा निर्णायक विजय मिळविले आहेत.

**लक्ष्याचा पाठलाग करण्यात पंजाब किंग्सचे वर्चस्व**

२०२५ च्या हंगामापासून, लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब किंग्सने आपल्या मागील ११ पैकी ९ सामन्यांत विजय मिळविला आहे. यावरून त्यांचे या क्षेत्रातील वर्चस्व स्पष्ट होते. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या अलीकडील विजयातही याची प्रचिती आली. यजमान संघाची ही विजयी घोडदौड रोखण्यासाठी लखनौ सुपर जायंट्सला काहीतरी असाधारण कामगिरी करावी लागेल.



श्रेयस अय्यर



ऋषभ पंत

गुणतालिकेत सध्या सातव्या क्रमांकावर असलेल्या लखनौ संघाला सलग पराभवांचा सामना करावा लागत आहे. त्यातच, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या गत सामन्यात कर्णधार ऋषभ पंतच्या कोपराला झालेली दुखापत, त्यांच्या मोहिमेसाठी आणखीच मोठा धक्का ठरली आहे.

पंतला मैदानावर स्पष्टपणे वेदना होत असल्याचे दिसून आले आणि केवळ तीन चेंडूंचा सामना केल्यानंतर तो दुखापतीमुळे मैदानाबाहेर गेला. त्यानंतर कोपराला घट्ट पट्टी बांधून तो पुन्हा फलंदाजीला आला असला, तरी त्याला ६ चेंडूंत केवळ १ धावच करता आली. त्यामुळे, रविवारच्या सामन्यात तो खेळू शकेल की नाही, याबद्दल अद्याप अनिश्चितता कायम आहे.

आरसीबीविरुद्धचा सामना पूर्णपणे एकतर्फी ठरला; कारण लखनौचा संघ केवळ १४६ धावाच उभारू शकला. या सामन्यात मुकुल चौधरी व आयुष बडोनी केवळ या दोघांनीच थोडाफार प्रतिकार केला.

(वृत्तसंस्था)

### लखनौच्या फलंदाजीत अडचण

लखनौच्या फलंदाजीला अद्याप अपेक्षित सूर गवसलेला नाही; या हंगामात त्यांना अद्याप २०० धावांचा टप्पाही गाठता आलेला नाही. याउलट, पंजाब संघाने दोनदा २०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या गत सामन्यात तर, १६.३ षटकांतच ३ बाद १९८ धावा करीत ते विजयाच्या दिशेने वेगाने कूच करत होते.

पंजाबचा सलामीवीर प्रभसिमरन सिंग (२११ धावा) सध्या अत्यंत बहारदार फॉर्ममध्ये आहे, तर कर्णधार अय्यरनेही (२०३ धावा) तितकीच प्रभावी कामगिरी केली आहे. या दोघांचाही स्ट्राइक रेट अनुक्रमे १७२.९५ आणि १८७.९६ इतका जबरदस्त आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या विजयात या जोडीने अत्यंत मोलाची कामगिरी बजावली होती. याशिवाय प्रियांश आर्या व कूपर कॉनलीलाही पंजाबच्या फलंदाजीला अधिक आक्रमक आणि मजबूत बनवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रमुख गोलंदाज अर्शदीप सिंगने मुंबई इंडिन्सविरुद्ध २२ धावांत ३ बळी घेत पुन्हा एकदा आपला सूर मिळविला. लखनौचा सर्वात यशस्वी गोलंदाज म्हणून प्रिन्स यादव (९ बळी) आघाडीवर आहे. त्याच्या पाठोपाठ आवेश खान (५) व मोहम्मद शमीचा (४) क्रमांक लागतो. दिग्विजय राठी हा देखील खूपच महागडा गोलंदाज ठरला होता. ■

## ए. एस. शरवाणीका जागतिक रॅपिड; १२ वर्षांखालील मुलींची विजेती

◆ **चेन्नई, १८ एप्रिल**

जागतिक १० वर्षांखालील कॅडेट विजेती ए. एस. शरवाणीका हिने वयोगटात एक पायरी वर चढत सर्बियातील व्हर्नजाका बंजा येथे झालेल्या फिडे जागतिक रॅपिड १२ वर्षांखालील मुलींच्या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. दोन फेऱ्या बाकी असतानाच तिने विजेतेपद आपल्या नावी केले.

११ फेऱ्यांच्या या स्पर्धेत महिला कॅण्डिडेट मास्टर असलेल्या शरवाणीकाने १० विजय नोंदविले, तर युक्रेनच्या दारिया क्रावचुकविरुद्ध तिला एकमेव बरोबरी (ड्रॉ) स्वीकारावी लागली.



११ वर्षीय शरवाणीकाने नवव्या फेरीत, आपल्यापेक्षा उच्च मानांकन असलेल्या स्लोव्हेनियाच्या एमा जाक्सा हिचा पराभव करत, हे विजेतेपद निश्चित केले.

शरवाणीकाने एकूण १०.५ गुणांसह स्पर्धेचा समारोप केला; तिने शोल्पानबेक झांसाया (७.५ गुण) हिच्यापेक्षा ३ गुणांची स्पष्ट आघाडी घेत हे विजेतेपद पटकावले. हा विजय तिचे दुसरे जागतिक रॅपिड विजेतेपद ठरला आहे. यापूर्वी, वयाच्या नवव्या वर्षी तिने १० वर्षांखालील गटात सुवर्णपदक जिंकले होते; तसेच २०२४ मध्ये अल्बानिया येथे झालेल्या फिडे जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ अजिंक्यपद स्पर्धेतील ब्लिट्झ प्रकारातही तिने रौप्यपदक मिळवले होते.

(वृत्तसंस्था)

## आयपीएलचा दर्जा आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या समीप : ल्युक वुड

◆ **नवी दिल्ली, १८ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधील खेळाचा दर्जा हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना मिळणाऱ्या अनुभवाच्या सर्वात जवळचा आहे, असे गुजरात टायटन्सचा डावखुरा वेगवान गोलंदाज ल्युक वुड म्हणाला.

या स्पर्धेत खेळणे हे त्याचे लहानपणापासूनचे ध्येय होते आणि इंग्लंडचे प्रतिनिधित्व करण्याच्या सन्मानानंतर, तो 'आयपीएल'लाच दुसऱ्या क्रमांकावर मानतो.



आयपीएल हा क्रिकेटच्या वार्षिक वेळापत्रकातील एक मुख्य आणि प्रमुख कार्यक्रम आहे, हे जगभरात सर्वश्रुत आहे. त्यामुळे, माझ्यासाठी आयपीएलमध्ये खेळता येणे आणि एखाद्या संघाचे प्रतिनिधित्व करणे हा एक मोठा सन्मान आहे. लहानपणी, इंग्लंडकडून खेळण्यासोबतच, आयपील मध्ये खेळणे हे देखील माझ्या नेहमीच नजरेसमोर असलेल्या ध्येयांपैकी एक होते, असेही तो म्हणाला.

फ्रॅन्चायझी लीग्स काही बाबतीत सारख्याच असतात, पण आयपीएलमधील क्रिकेटचा प्रत्यक्ष दर्जा कदाचित एका वेगळ्याच पातळीवरचा आहे आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या अनुभवाच्या तो सर्वात जवळचा आहे, असे वुडने एका विशेष संभाषणात सांगितले. वुडने इंग्लंडसाठी ३ एकदिवसीय व १६ टी-२० सामने खेळले आहेत. याशिवाय त्याने द हंड्रेड, बिग बॅश लीग, बांगलादेश प्रीमियर लीग, पाकिस्तान सुपर लीग आणि २० यांसारख्या लीगमध्येही सहभाग घेतला आहे.

(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# मराठी विषय टाळल्यास शाळांना दंड; मान्यताही गोठवणार

## मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त परंतु मराठी विषयाकडे दुर्लक्ष का बर?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ एप्रिल-**

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा विषय शिकवणे सक्तीचे केले असले तरी अनेक शाळा या नियमाची पायमल्ली करत आहेत. याची अत्यंत गंभीर दखल घेत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शुक्रवारी शासन निर्णय जारी केला.

यापुढे मराठी भाषा अनिवार्यपणे न शिकवणाऱ्या शाळेला १ लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाईल. तसेच, नियमाचे पालन न करणाऱ्या शाळांची मान्यता किंवा 'ना-हरकत प्रमाणपत्र' रद्द केले जाईल. सर्व व्यवस्थापनांच्या, माध्यमांच्या व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी (अनिवार्य) भाषा अध्यापनासाठी मराठी विषयातील विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षकांची नियुक्ती करावी लागणार आहे.



दरम्यान, इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांमध्ये अजूनही 'मराठी' भाषा विषय गांभीर्याने शिकवला जात नाही, अशा अनेक तक्रारी आहेत. या नवीन नियमावलीमुळे आणि थेट १ लाखाच्या दंडाच्या तरतुदीमुळे आता सीबीएसई, आयसीएसई आणि आंतरराष्ट्रीय मंडळांच्या शाळांना चाप बसणार आहे. राज्यात खासगी शाळांत मंडळाच्या १३,५३८, सीबीएसईच्या १, २६० आणि आयसीएसईसह इतर ३८९ शाळांचा समावेश आहे.

> राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा वाचवण्यासाठी तसेच मराठी माध्यमाच्या विकास व संवर्धनासाठी प्रत्येक शाळेत महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी विषय असणे आवश्यक आहे.अभिजात दर्जा प्राप्त परंतु मराठी विषयाकडे दुर्लक्ष का बर मराठी अनिवार्य असणे म्हणजे महाराष्ट्र राज्यात सरकारी कामकाज, शिक्षण आणि दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर बंधनकारक करणे होय. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अंतर्गत मराठीला राजभाषेचा दर्जा देण्यात आला आहे, ज्यानुसार राज्य प्रशासनातील सर्व कामे मराठीत करणे अनिवार्य आहे.
>
> **- प्रशांत शिरगुर,** राज्य उपाध्यक्ष स्पर्धा परीक्षा तथा पवित्र पोर्टल शिक्षक भरती.

---

## महत्वाचे...



### चवदार तळ्याचा सत्याग्रह हा मानव मुक्तीसाठी होता : प्रा. मस्के

**बार्शी, दि. १८ एप्रिल-**

महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. हा सत्याग्रह केवळ पाणी पिण्यासाठी नसून तो समस्त मानव मुक्तीसाठी होता, असे विचार प्रा. डी. डी. मस्के यांनी व्यक्त केले. बार्शी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (नवे व जुने) आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वस्तीगृह यांनी आयोजित केलेल्या समता सप्ताहामध्ये, चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि मानवी हक्क या विषयावर प्रा.डी.डी. मस्के बोलत होते. यावेळी कमलाकर सारंगकर, रमेश गवळी यांचे ही भाषण झाले. यावेळी सुभाष भोसले व तिन्ही वसतीगृहातील कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जयप्रकाश बिले स्कूलमध्ये सीनियर केजी विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन डे

**जेऊर, दि. १८ एप्रिल-**

सिनियर केजी मधील विद्यार्थ्यांनी आकर्षक कॅम्प व गाऊन परिधान करून आत्मविश्वासाने मंचावर प्रवेश केला आणि आपल्या शालेय जीवनातील पहिला महत्त्वाचा टप्पा पूर्ण केल्याचा अभिमानाने उत्सव साजरा केला. कार्यक्रमासाठी पंचायत समिती सदस्य सोनाली तकिक, संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश बिले यांनी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन करून केली. या कार्यक्रमासाठी स्कूल संचालिका डॉक्टर स्वाती बिले तसेच मुख्याध्यापिका अमृता परदेशी उपस्थित होत्या. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकली. तसेच छोटेखानी भाषणांमधून विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य आणि आत्मविश्वास प्रभावीपणे दाखवून दिला. विशेषतः 'ग्रॅज्युएशन वॉक' हा कार्यक्रमाचा आकर्षणबिंदू ठरला, ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या नीलिमा आढाव, शुभांगी बरडे, अर्चना कादगे यांनी केले. नीलिमा आढाव यांनी आभार मानले.



### राष्ट्ररत्न फाउंडेशनतर्फे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून सामूहिकरीत्या संविधान प्रास्ताविका वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा प्रांजली मोहीकर होत्या. यावेळी संस्थेच्या विश्वस्त ज्योती मेने यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांवर प्रकाश टाकला. सुहास भोसले यांनी बाबासाहेबांचे विचार मांडले. तसेच विश्वस्त शैलेश मोहीकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात हीच आमुची प्रार्थना अन् हेच आमचे मागणे हे प्रेरणादायी गीत सादर केले. या कार्यक्रमाला उपाध्यक्ष प्रेमचंद मेने, विश्वस्त ज्योती मेने, शैलेश मोहीकर, प्रकाश शिंपी, सुहास भोसले, राजू निकंबे, भारती ढोबळे, साक्षी ढोबळे, संगीता महिंद्रकर, अनुराधा निकम, वैशाली गायकवाड, पुष्पलता गायकवाड उपस्थित होते.

---

# यशराज संस्थेतर्फे वक्तृत्व स्पर्धा व बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ एप्रिल-**

यशराज बहुउद्देशीय व संशोधन संस्था बार्शी यांच्याकडून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन प्रा. डॉ. राहुल पालके व बसवराज पुरवंत यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी विनोद कबाडे, शंकर वाघमारे, अमोल कुलकर्णी, ॲड. वृषाली वाघमारे उपस्थित होते. स्पर्धेतून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचारांचा जागर झाला. महापुरुषांच्या विचारांची उपयुक्तता ही समाजाला नवविचार व नवदिशा देत असते. त्यामधून सामाजिक आत्मभान व गतिमानता येत असते. असे प्रतिपादन डॉ. राहुल पालके यांनी यावेळी केले. सूत्रसंचालन कोमल कबाडे यांनी केले व स्पर्धेचे परीक्षण ॲड. वृषाली वाघमारे आणि प्रा. अमोल कुलकर्णी यांनी केले. स्पर्धेसाठी शंकर वाघमारे, यल्लाप्पा कट्टीमनी, सागर जानराव, संजय निरंजन, परमेश्वर खुने, यशराज कबाडे, मयूर कबाडे, संतोष गुंड, रंगनाथ हांजगी, शिलाजी घोळवे, हेमंत मेश्राम, विकास ओमन, प्रमोद पाटील, प्रथमेश निरंजन, अंकुश बांगर, विलास शिंदे, प्रमोद शिंदे आदींनी सहकार्य केले. वक्तृत्व स्पर्धेसाठी जिल्ह्यातील विविध गटातील विद्यार्थी सहभागी झालेले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व पुस्तके देण्यात आली तर सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

> वक्तृत्व स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे - गट ५ वी ते ७ वी- प्रथम- रंजना माने, द्वितिय- रुही गुळवे, तृतीय- विहान उमाप. गट ८ वी ते १० वी- प्रथम- प्रणाली धस, द्वितीय- श्रवण आडसूळ, तृतीय- शितल गुळवे. खुला गट- प्रथम- प्रथम भिंगारे, द्वितीय- अपूर्व आगलावे, तृतीय- रोहन भंडारी.




---

### दुचाकीस्वार जखमी; चारचाकी वाहन चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

ओव्हरटेक करताना धडक देऊन दुचाकी स्वाराला जखमी केल्याप्रकरणी एका चार चाकी वाहन चालकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वप्नील तळभंडारे (रा. सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत सलमान इब्राहिम फनिबंद ( रा. १७/२८, घर नं. ६३, शानदार चौक, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी सलमान हा १६ एप्रिल रोजी दुपारी विकास नगर येथून दुचाकी वरुन जात असताना वरील आरोपीने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन फिर्यादीच्या दुचाकीस धडक देऊन फिर्यादीला जखमी करण्यास कारणीभूत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार इनामदार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

---

# मंगळवेढा पोलिस ठाण्यासमोर वाहनांचा विळखा


## वाहतूक विस्कळीत

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ एप्रिल-**

मंगळवेढा पोलीस ठाण्याच्या गेट जवळ रोडवर चहासाठी येणारी जाणारी वाहने थांबत असल्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याच्या नागरिकांच्या प्रतिक्रीया असून वाहतूक शाखेच्या पोलीसांचे जाणीवपुर्वक या वाहनांकडे दुर्लक्ष होत असल्याने शहरवासीयांमधून त्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करुन संतापजनक प्रतिक्रीया व्यक्त होत आहेत.

पंढरपूर मार्गावर शासकीय गोडावूनच्या समोर मंगळवेढा पोलीस स्टेशन असून पोलीस स्टेशन असा फलक लावलेल्या बोर्डालगत रस्त्यावरुन येणारी जाणारी वाहने चक्क येथे उभा करुन हॉटेल मध्ये चालक चहा पिण्यास जात आहेत. उभ्या राहत असलेल्या वाहनाबाबत सुज्ञ नागरिकांनी वाहतूक शाखेच्या पोलीसाकडे यापुर्वी तक्रार करुनही त्यांना या गोष्टीचे गांभीर्य वाटत नसल्यामुळे वाहन उभे करण्यात दिवसें दिवस वाढ होत आहे. येथूनच पोलीस अधिकारीही पोलीस ठाण्या मध्ये येत जात असतात मात्र त्यांच्याही लक्षात वाहनाबाबत कसे काय येत नाही? असा सवालही नागरिकामधून विचारला जात आहे. या उभ्या वाहनामुळे वाहतूकीस अडथळा होत आहे. तसेच सिमेंट रस्त्यामुळे येथे रस्त्याला मोठा कट असून मोटर सायकलला जाण्यास उभी वाहने अडथळा ठरत असल्यामुळे मोटर सायकलस्वारांना रोडवर वाहने चढविताना या कटावरुन गाड्या घसरुन पडत असल्याचेही सांगण्यात आले. कर्तव्यात कुचराई करणाऱ्या वाहतूक पोलीसावर तात्काळ कारवाई अशी मागणी या परिसरातील नागरिकामधून होत आहे. वाहतूक शाखेचे पोलीस कर्तव्याकडे लक्ष न देता जिकडे दामाजी तिकडे धाव अशी कार्यपध्दती त्यांची असल्याची चर्चाही शहरवासीयांमधून रंगू लागली आहे.

---



### अक्कलकोट नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा; विकासाच्या अनेक निर्णयांवर शिक्कामोर्तब

**तथा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ एप्रिल-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहराला आदर्श, स्वच्छ आणि विकसित शहर बनवण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्रितपणे प्रयत्नशील आहोत. अशी ग्वाही नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिली

पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह, अक्कलकोट येथे नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी सभेला संबोधन करताना बोलत होते. सभेमध्ये शहर विकास, धार्मिक परंपरा, नागरिक सुविधा आणि जनहिताच्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. अनेक महत्त्वपूर्ण ठरावांना मंजुरी देत अक्कलकोटच्या प्रगतीला नवी दिशा देण्यात आली. दर गुरुवारी मांस विक्री बंद करण्याचा ऐत्यासिक निर्णय घेण्यात आला. या सभेला मुख्याधिकारी रमाकांत डाके, उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड उपस्थित होते.

> **सभेतील प्रमुख निर्णय-**
>
> ✻ मागील सभांचे इतिवृत्त कायम करून प्रलंबित विकासकामांना मंजुरी
>
> ✻ दक्षिण महाद्वार व मुरलीधर मंदिर परिसरातील स्वागत कमानींना कै. कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे प्रवेशद्वार असे नामकरण करण्यास मान्यता.
>
> ✻ खासबाग येथील चौकाचे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण एकमताने मंजूर.
>
> ✻ प्रत्येक गुरुवारी शहरातील मांसविक्री बंद ठेवण्याचा निर्णय
>
> ✻ शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सर्वांगीण विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

---



### मणिपुरी अंकुरांचे हुंकार सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

राष्ट्रीय (तांत्रिक) उपक्रम ंतर्गत ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर व चैतन्यभुवन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मणिपुरी विद्यार्थ्यांसाठी सहनिवास प्रकल्प चालविला जात आहे. सध्या येथे २१ मणिपुरी विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना शिक्षणाबरोबरच खेळ, कला व कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. या उपक्रमाचे मार्गदर्शन डॉ. अमोल गांगजी व सी.ए. श्रीरंग कुलकर्णी करीत असून अनंत अल्लीशे विद्यार्थ्यांची सातत्याने काळजी घेत आहेत.

गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सायं. ६.३० वाजता विवेक सभागृहात मणिपुरी अंकुरांचे हुंकार हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ.वासंती अय्यर (सोनी कॉलेजच्या संचालिका,) होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. इरेश स्वामी (सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू व सोलापूर ज्ञान प्रबोधिनीचे उपाध्यक्ष) होते. तसेच कमांडिंग ऑफिसर कर्नल रणधीर सतीश उपस्थित होते.

---

### विजयवैभवलक्ष्मी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**




जुळे सोलापूर येथील आयएमएस शाळेसमोरील श्री विजयवैभवलक्ष्मी मंदिराचा २० वा वर्धापन दिन रविवार १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहुर्तावर आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्त मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिराचे पुजारी वेदमुर्ती रेवणय्या स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

रविवार १९ रोजी पहाटे ५ ते साडेआठ पर्यंत रूद्र पठण होणार आहे. त्यानंतर पंचामृताभिषेक, क्षिराभिषेक, पंचगव्याभिषेक व राजोपचार महापूजा होणार आहे. त्यानंतर विशेष अलंकार महापूजा होईल. सकाळी ९ ते १० पर्यंत कुंकुमार्चन व १० वाजता महाआरती होणार आहे. साडेदहा ते एक वाजेपर्यंत होमहवन करण्यात येणार आहे. दुपारी साडेचार ते सहा वाजेपर्यंत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी सहा वाजता पालखी मिरवणूक (मंदिर प्रदक्षिणा) निघणार आहे. सायंकाळी साडेसहा वाजता दीपोत्सव कार्यक्रम असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्व कार्यक्रमांचा भाविकभक्तांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराचे विश्वस्त जोकारे, सोलापूरे व भोगडे परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

---

## निधन वृत्त...

### मंदाकिनी उपळाईकर



**बार्शी, दि. १८ एप्रिल-**

येथील मल्लप्पा धनशेट्टी रोडवरील राऊळ गल्लीत राहणाऱ्या मंदाकिनी अशोकराव उपळाईकर यांचे वृद्धापकाळाने शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन सुना आणि चार नातवंड असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### प्रमोद अभ्यंकर



**पंढरपूर, दि. १८ एप्रिल-**

येथील रहिवासी सेवानिवृत्त तालुका निरीक्षक भूमिअभिलेख प्रमोद दिगंबर अभ्यंकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी पंढरपूर येथे अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई, नातवंडे आहेत.

### विजयलक्ष्मी सोमा



**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

साखर पेठ येथील रहिवासी विजयलक्ष्मी गोपाळ सोमा (वय ६०) यांचे शुक्रवार, दि. १७ एप्रिल रोजी रात्री आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पती, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

# मॉडेल विविधांगी प्रशालेतील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धा परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. १८ एप्रिल-**

येथील मॉडेल विविधांगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेचा नावलौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांची तयारी म्हणून विविध परीक्षांत सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली.

मंथन पब्लिकेशनच्या प्रज्ञाशोध परीक्षेत स्वराज अमित सावंत (इ.७ वी) याने ३०० पैकी २८० गुण मिळवत राज्यात ६ वा व जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. सरताज सलीम मुलाणी याने केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत स्वराजने राज्यात ९ वा क्रमांक मिळवला, तर प्रणव देवकर व सरताज मुलाणी यांनी जिल्हास्तरावर यश मिळवले.



अक्षरगंगा परीक्षेत स्वराज सावंत राज्यात २ रा आला, तर प्रणव देवकर व सरताज मुलाणी यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. इतर स्पर्धा परीक्षांमध्येही विद्यार्थ्यांनी उच्च गुण मिळवत गुणवत्ता सिद्ध केली.

यावेळी यशस्वी स्पर्धकांचा सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य रितेश पांढरे, शिक्षक संदीप गदादे, नवनाथ गायकवाड, संतोष पाटोळे, संजय पवार, रजनी चौरे, मेघा जोशी, वैशाली बनकर, वैशाली पांढरे व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार नवनाथ गायकवाड यांनी मानले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे, व्हा. चेअरमन नितीन इनामके, अजय गिरमे, खजिनदार ज्योती लांडगे, संचालक अनिल रासकर, प्रकाश गिरमे, ॲड. सचिन बधे, डॉ. अविनाश जाधव,रत्नदीप बोरावके, पृथ्वीराज भोंगळे, दिलीप इनामके, कल्पेश पांढरे, लीना गिरमे, प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---



# पंढरपुरात युवकांसाठी रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ एप्रिल-**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे, कौशल्य विकास केंद्र, पंढरपूर व युवाशक्ती फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने पंढरपूर आणि तालुक्यातील होतकरू युवकांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे द.ह. कवठेकर विद्यालय (तालुका पोलीस स्टेशन मागे) मधील कौशल्य विकास केंद्र या ठिकाणी शुक्रवारी (दि.१७) हा मेळावा सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत आयोजित करण्यात आला होता. सुयोग्य निवड झालेल्या विविध शैक्षणिक विभागातील तरुण तरुणींना सुमारे १५ ते ३० हजार रुपये वेतनावर विविध कंपनीमध्ये घेण्यात आले. मेळाव्यात २० पेक्षा जास्त नामांकित कंपन्यामध्ये दोन हजारहून अधिक विविध पदे भरण्यात आली, यासाठी सर्व शाखेतील पदवीधर, दहावी, बारावी पास, नापास आय. टी. आय.(सर्व ट्रेड) डिप्लोमा इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, सीएनसी ऑपरेटर, सीआयपिईटी आदी शैक्षणिक पात्रता असलेले विद्यार्थी या मेळाव्याला आले होते, यावेळी शंभरच्या वर तरुण तरुणींना रोजगार विविध कंपनीमध्ये देण्यात आला.

या मेळाव्याला पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सुधीर पटवर्धन व युवाशक्ती फाउंडेशनचे रवी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मिटकॉन कंपनीचे प्रसाद तावसे, द. ह. कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी व कौशल्य विकास केंद्रचे श्याम उत्पात यांनी हा मेळावा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# बग्गी ते कंटेनर : भीमजयंती मिरवणुकीचा हायटेक प्रवास



## देशातील सर्वात विराट मिरवणूक सोलापुरात

### जगभरातील बहुजन बांधव घेऊन जातात काळीज भरुन ऊर्जा

### मल्लखांबसह मैदानी खेळाची परंपरा लोप पावत आहे

### शंभरहून अधिक मंडळांच्या मिरवणुका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर । किरण बनसोडे**

सोलापूर शहरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताहाची सांगता दरवर्षी भव्य आणि विराट मिरवणुकीने होत असून, या मिरवणुकीने काळानुसार उल्लेखनीय बदल अनुभवले आहेत. पूर्वी सजवलेल्या बग्यांमधून निघणारी ही मिरवणूक आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या संगतीने सजवलेल्या भव्य कंटेनरवरून, पारंपारिक वाद्य ते साऊंडच्या दणदणाटात आणि हायटेक सादरीकरणासह अधिकच आकर्षक व दिमाखदार स्वरूपात पार पडत आहे. देशभरातीलच नव्हे तर जगभरातील बहुजन बांधव या मिरवणुकीत सहभागी होत सोलापुरात ऊर्जा आणि उत्साहाचा अद्वितीय संगम घडवतात.

अवघ्या जगात सर्वात मोठी मिरवणूक सोलापुरात काढण्यात येते. भीम जयंतीचा जगभरात नावलौकिक आहे. जगभरातून भीम अनुयायी या मिरवणुकीसाठी येतात. काळीज भरून ऊर्जा घेऊन जातात. सोलापूर शहरात डॉ.आंबेडकर जयंती सप्ताहास १४ एप्रिलपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होतो आणि येणाऱ्या रविवारी या सप्ताहाची भव्य मिरवणुकीने सांगता केली जाते. सोलापुरातील भीम जयंती मिरवणुकीचा स्फूर्तीदायी इतिहास आहे. काळानुसार भीम जयंती मिरवणुकीच्या स्वरुपात प्रतिवर्षी नवे बदल पडत गेले आहेत. प्रारंभीच्या काळात आकर्षक अशा सजवलेल्या बग्गीतून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येत होती. आरंभीच्या काळात शंभरहून अधिक मंडळांकडून मिरवणूक काढण्यात येत होती.

सोलापुरात दिवंगत जीवाप्पा ऐदाळे, हरिभाऊ तोरणे गुरुजी, उद्धव थोडो शिवशरण, एन.टी. बनसोडे यांच्यासह वतनदार मंडळींच्या पुढाकाराने मिरवणुकीची सुरुवात झाली होती. ही मिरवणूक फॉरेस्ट येथील शाळा क्रमांक १० च्या मैदानातून सुरु होत होती आणि विसर्जन बुधवार पेठेतील थोरला राजवाडा (मिलिंदनगर) येथील पंचाची चावडी पुढे होत असे. फॉरेस्ट येथून वाडिया हॉस्पिटल, रेल्वे स्टेशन, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैया चौक), मेकॅनिक चौक, नवी पेठ, माणिक चौक, मधला मारुती, सराफ बाजार, मंगळवार पेठ पोलीस चौकी, चाटी गल्ली, बाळीवेस मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पुढे थोरला राजवाडा (मिलिंद नगर) पंचाच्या चावडीपुढे या मिरवणुकीचे विसर्जन होत होते. निळे ध्वज हातात घेऊन जय भीमचा नारा देत या मिरवणुकीत मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी होत असत. या मिरवणुकीत बैलगाडीवर मल्लखांबाचे विविध खेळ मलखांबपटू सादर करत होते. विविध मैदानी खेळांचे सादरीकरणही केले जात होते. वेगवेगळे कलावंत आपल्या अनेकविध खेळाचे कौशल्य दाखवून सर्वांची मने आकर्षीत करीत असत. या मिरवणूकीत सर्वात लक्ष वेधून घेणारे आवसे वस्ती आंबराई येथील समता सैनिक दलाचे बँड पथक असे. खाकी हॉफ पँट, पांढराशर्ट, निळा स्कार्फ, बुट असा यांचा वेष होता.

संग्रहित छायाचित्रे







६ बॅग पाइपर (मशाक) ६ बिगुलधारक, ६ बासरीवादक आणि ड्रम आणि समोर त्यांना हातवारे करुन सूचना देणारे मास्तर, अतिशय सुरेल गाणी, तालबध्द संचालन त्यांच वैशिष्टय होत. स्त्री - पुरूष शिस्तीत निघत होते. मिरवणूकीच्या शेवटी एक रथ असे. डॉ. बाबासाहेबांचे तैलचित्र त्यामध्ये ठेवलेले असे. भीमसैनिक ' भीमराजा प्राण माझा भीमराजा प्राण हे गीत उत्साहाने म्हणत असत. त्यानंतर मिरवणुकीत लेझीम पथके आली. विविध वस्त्यामधून लेझीम पथके संगीताच्या तालावरती लयबध्द खेळ करू लागली. मिरवणुकीत सजवलेले ट्रक आणि डॉ. बाबासाहेबांचे विविध तैलचित्र असे. ट्रकवरती बाबासाहेबांच्या लढ्याचे सचित्र दर्शन, विविध घोष वाक्ये, यांची रेलचेल होती. सर्व समाज या मिरवणुकीचे स्वागत करीत होते. ठिकठिकाणी पाणपोया उघडलेल्या असत.

काळानुसार या मिरवणुकीत बदल झाला. लेझीम पथके आती सजवलेल्या ट्रकवरुन मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पुढे डॉल्बी साऊंड सिस्टिमचा वापर मिरवणुकीत होऊ लागला. डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकू लागली. कालांतराने मंडळांची संख्याही वाढली. सुरुवातीतीत काळात सर्व समाजबांधवांच्यावतीने बग्गीतून एकच मिरवणूक निघायची. शंभरहून अधिक मंडळांच्या वतीने मिरवणूक काढण्यात येत होती. आता ट्रक ऐवजी भलेमोठे कंटेनरचा वापर मिरवणुकीसाठी केला जात आहे. दरम्यान, डॉल्बीच्या मोठ्या आवाजावर निर्बंध आले. त्यामुळे काही मंडळाकडून पुन्हा पारंपारीक वाद्यांचा उपयोग मिरवणुकीत केला जात होता. सध्या विविध मंडळांकडून आकर्षक देखावे, आकर्षक सजावट मिरवणुकीत केली जाते. काही मंडळांकडून प्रबोधनात्मक फलक व देखावे सादर केले जातात. बाणेकरी तालीम संघाने मैदानी खेळाचे परंपरा राखली होती. आता मैदानी खेळाची परंपरा मिरवणुकीत लोप पावली आहे.

#### पारंपरिक मिरवणूक मार्गात बदल; मोठ्या आवाजावर नियंत्रण

कंटेनरचा वापर होत असल्याने पारंपारिक मिरवणूक मार्ग टाळून काही मंडळे मोठ्या रस्त्यावरुन मिरवणूक काढत आहेत. कंटेनरमुळे पारंपरिक मिरवणूक मार्गात काही प्रमाणात बदल झाला आहे. मात्र, मिलिंद नगर येथे मिरवणुकीचा समारोप करण्याची परंपरा आजही कायम आहे. पारंपारिक वाद्य ते सध्या कानठळ्या बसविणारा डॉल्बीचा आवाज असा बदल काळानुरूप झाला असल्याचे दिसून येते. मोठ्या आवाजावर नियंत्रण ठेवण्याची गरज वर्तवली जात आहे.

#### १९६४ सालानंतर पार्क चौकातून मिरवणुकीस प्रारंभ

पूर्वी ही मिरवणूक फॉरेस्ट येथील शाळा क्रमांक १० च्या मैदानातून सुरु होत होती. १९६४ सालानंतर पार्क चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला. तेव्हापासून भीमजयंती मिरवणुकीचा प्रारंभ येथील पुतळ्यापासूनच होऊ लागला. सध्या या चौकाचे नामकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे करण्यात आले आहे. ही परंपरा आजतागायत कायम आहे.

# शहरात आज पाच ठिकाणी भगवान परशुराम पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

आज अक्षय तृतीया आहे. आजच भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव होत आहे. सोलापूर शहर आणि हद्द वाढ भागात एकूण पाच ठिकाणी भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवा निमित्त त्यांच्याप्रतीमेच्या पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**ब्रह्म सेवा संघ**

पहिला कार्यक्रम जुळे सोलापूर ब्रह्म सेवा संघ सामाजिक संस्थेच्या वतीने सकाळी साडेआठ वाजता जुळे सोलापुरातील पाण्याच्या टाकीजवळ भगवान परशुराम ाच्या मूर्तीचे पूजन होईल. याच संस्थेतर्फे सायंकाळी साडेपाच वाजता इंदिरानगर मधील गणपती मंदिरात भगवान परशुराम पूजन होणार आहे.

**ब्रह्म प्रतिष्ठान**

जुळे सोलापुरातील ब्रह्म प्रतिष्ठान या संस्थेतर्फे सकाळी दहा वाजता विजापूर रोडवरील आरटीओ कार्यालयाच्या जवळ असलेल्या ब्रह्मचैतन्य नगर येथे श्री. सुहास देशपांडे यांच्या निवासस्थानी सकाळी अकरा वाजता भगवान परशुराम यांच्या



मूर्तीचे पूजन होईल.

**जुने विठ्ठल मंदिर**

भगवान परशुराम जयंती महोत्सव मध्यवर्ती समितीच्या वतीने शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जुने विठ्ठल मंदिरात सायंकाळी भगवान परशुराम यांच्या मूर्तीचे पूजन होणार आहे.

**के.एल.ई स्कूल मैदान**

जुळे सोलापूर भगवान परशुराम जन्मोत्सव समितीतर्फे जुळे सोलापूर आतील डी मार्ट जवळील के.एल.ई. शाळेच्या मैदानावर सायंकाळी साडेपाच वाजता भगवान परशुराम यांच्या मूर्तीचे पूजन होणार आहे.

तरी सोलापूर शहरातील सर्व नागरिकांनी आपापल्या सोयीच्या ठिकाणी आणि आपल्या सोयीच्या वेळेनुसार सर्व ठिकाणी भगवान परशुराम यांच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## क्रुझरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

क्रुझरच्या धडकेत जखमी झालेल्या काळेगाव च्या दुचाकी स्वाराचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शुक्रवारी मृत्यू झाला. कुमार लक्ष्मण शेंडगे (वय ६० वर्ष रा.काळेगाव ता.तुळजापूर) असे मयताचे नाव आहे. ते १२ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास काळेगाव ते येवती असा प्रवास करीत होते. काळेगाव येथे क्रुझर धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून दुसऱ्या दिवशी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारादरम्यान शुक्रवारी मृत्यू झाला.

## रॉकेल ओतून पेटवून घेतलेल्या विवाहितेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

मानसिक तणावातून अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेतलेल्या महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शुक्रवारी दुपारी मृत्यू झाला. महादेवी भारत चौगुले (वय ४५ वर्ष राहणार मद्रे) असे त्या मयत महिलेचे नाव आहे. घरातील मानसिक तणावातून त्यांनी शुक्रवारी पहाटे एक वाजेच्या सुमारास अंगावर रॉकेल ओतून स्वतःला पेटून घेतले होते. यात सर्वांग होरपळल्याने तिला उपचारासाठी पती भारत यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा शुक्रवारी दुपारी मृत्यू झाला.

## कीटकनाशक पिलेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

पत्नी बरोबरील भांडणात कीटकनाशक पिलेल्या एका ३० वर्षीय पतीचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज शनिवारी पहाटे मृत्यू झाला. नामदेव विठ्ठल कदम (वय ३० वर्ष, रा.जाधववाडी ता.पंढरपूर) असे त्या मयत पतीचे नाव आहे. घरात पत्नी बरोबर भांडण झाल्याने त्याने १४ एप्रिल रोजी सकाळी रागाच्या भरात कीटकनाशक विषारी औषध पिले होते. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊजी शंकर यांनी दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा आज शनिवारी पहाटे मृत्यू झाला.

# प्लॉट खरेदीत ३२ लाखांची फसवणूक

### बिल्डरवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

प्लॉट बुकिंगच्या वेळी प्लॉटची पूर्ण रक्कम देऊनही आज तागायत प्लॉट नावावर करून न देता ३२ लाख ६१ हजाराची फसवणूक केल्याप्रकरणी एका बिल्डर विरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वप्नील सुहास राऊत ( रा. १६ अ कोर्ट कॉलनी, विजापूर रोड, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत गौरीशंकर गंगाधर ख्याडे ( रा. १०२, गॅलेक्सी अपार्टमेंट, विरशैव नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादीने दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी ते आजतागायत, विरशैव नगर येथे वरील आरोपीला प्लॉट क्रं. १०२




प्लॉट विकत - बुकिंग साठी पूर्ण रक्कम ३२ लाख ६१ हजार रुपये बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स आरोपी स्वप्निल राऊत यास दिली होती. प्लॉटची पूर्ण रक्कम देवून सुध्दा आरोपी ने जाणुन बुजुन सदरचा प्लॅट आजतागायत फिर्यादी च्या नावावर करुन दिला नाही . प्लॉट खरेदीत आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने याबाबत पोलिसात धाव घेऊन आरोपीने मानसिक व आर्थिक त्रास देऊन आपली फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक न्यामणे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## साडीने गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

दारूच्या नशेत एका ३४ वर्षीय तरुणाने घरातील लाकडीवाशाला साडी ने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना न्यू बुधवार पेठेतील रमाबाई आंबेडकर नगरात शुक्रवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास उघडकीस आली.

सिद्धार्थ वसंत कांबळे (वय ३४ वर्ष, रा. रमाबाई आंबेडकर नगर, आम्रपाली चौक, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी त्याचा मृतदेह राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत घरच्यांना आढळून आला. त्याला नातेवाईकांनी फासातून सोडवून येथील शासकीय रुग्णालय दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.





# सहकार भारतीच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न : कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ एप्रिल-**

व्हिजन एक्स्पो फॉर वुमेन एम्पावरमेंट या संकल्पनेतून सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या वतीने महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न होत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह ऋषीकेश कुलकर्णी यांनी केले. सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या वतीने आयोजित महिला उत्पादित वस्तुच्या राज्यस्तरीय एक्स्पोच्या कार्यालयाचे उदघाटन चौपाड येथे कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी या एक्स्पोच्या स्वागताध्यक्षा सुधा अळ्ळीमोरे, विभाग प्रमुख संतोष गायकवाड, डॉ. जयंत शेळगीकर, प्रशांत बडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

महिलांची संघटन शक्ती एकत्र करून त्यांना सक्षम करणे हेच सहकार भारतीचे काम आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यांना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. असेही यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह ऋषीकेश कुलकर्णी यांनी सांगितले. दि. २४ ते २५ एप्रिल या कालावधीत नॉर्थकोट मैदानावर प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील महिलांकडून उत्पादित करण्यात आलेल्या वस्तु आणि पदार्थाचे राज्यस्तरीय प्रदर्शन सोलापूर मध्ये पहिल्यांदाच होत असल्याचे या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षा सुधा अळ्ळीमोरे यांनी सांगितले. कला, स्वाद व संस्कृतीचा अनोखा संगम नॉर्थकोटच्या मैदानावर होणार आहे.

प्रारंभी महिला प्रकोष्ठ प्रमुख प्राची धामणगांवकर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. नंतर फित कापून आणि भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करून कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी किरण करकमकर, यशवंत बुर्हाडे, अर्चना कुलकर्णी, श्रुती पवार उपस्थित होते.







# पी.बी.ग्रुपतर्फे ऐतिहासिक बैलगाडी मिरवणुकीचा देखावा

## ● १९४१ च्या कसबे तडवळे अधिवेशनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ एप्रिल-**

बुधवार पेठ, मिलिंद नगरातील पी.बी.ग्रुप अर्थात प्रबुध्द भारत तरुण मंडळाच्या वतीने यंदाच्या भीम जयंती मिरवणुकीत इतिहासाला उजाळा देणारा भव्य आणि लक्षवेधी देखावा साकारला जाणार आहे. १९४१ मधील ऐतिहासिक कसबे तडवळे परिषदेला केंद्रस्थानी ठेवत ऐतिहासिक बैलगाडी मिरवणुकीचा देखावा सादर केला जाणार आहे. माजी गटनेते तथा मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मिरवणूक दिमाखात पार पडणार आहे.

धाराशिव जिल्ह्यातील कसबे तडवळे येथे दि.२२ व २३ फेब्रुवारी १९४१ रोजी पार पडलेल्या पहिल्या महार-मांग वतनदार परिषदेला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उपस्थित राहिले होते. त्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी अनुयायांनी तब्बल ५१ बैलगाड्यांचा भव्य ताफा उभारून ऐतिहासिक मिरवणूक काढली होती. हाच प्रेरणादायी प्रसंग यंदा देखाव्याच्या माध्यमातून जिवंत केला जात असून, तो मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.



मिलिंद नगरातील प्रबुद्ध भारत तरुण मंडळाची स्थापना १९५२ साली झाली असून, मंडळाने सातत्याने सामाजिक कार्याची परंपरा जपली आहे. वर्षभर विविध उपक्रमांद्वारे समाजसेवेची कास धरत मंडळाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त लेझीम ताफा, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुण्यतिथीनिमित्त आरोग्य शिबिरे, बुध्द जयंतीनिमित्त खीर वाटप असे विविध उपक्रम राबवले जातात.



दिवाळीमध्ये सफाई कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप, सिद्धेश्वर यात्रेत भाविकांना दूध वाटप, महिला दिनानिमित्त महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान अशा उपक्रमांतून मंडळाचा सामाजिक बांधिलकीचा ठसा उमटतो. सोलापूर शहरातील गरजू विद्यार्थ्यांच्या शालेय प्रवेशासाठी, गणवेश व शैक्षणिक साहित्याकरिता आर्थिक मदत सातत्याने दिली जाते. विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, हा आमचा मुख्य हेतू आहे, असे चंदनशिवे यांनी स्पष्ट केले.

#### २० कार्यकर्त्यांची समिती

भव्य देखावा साकारण्यासाठी सुमारे २० कार्यकर्त्यांची समिती स्थापन करण्यात आली. आजच्या मिरवणुकीच्या अनुषंगाने रंगराज भवन फॅब्रिकेशन, रामपुरे यांच्यासह पुण्यातील सुप्रसिध्द मुर्तीकार रुपेश उघाडे यांचे विशेष योगदान लाभले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात विशेष नाकाबंदी व कोंबिंग ऑपरेशन यशस्वी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ एप्रिल : लातूर जिल्ह्यात गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी व कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. १६ व १७ एप्रिल २०२६ या दोन दिवसाच्या कालावधीत एकूण २७ ठिकाणी विशेष नाकाबंदी व कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कारवाई दरम्यान रात्रीच्या वेळेत दोन टप्प्यांत संपूर्ण जिल्ह्यात व्यापक प्रमाणावर पोलिस यंत्रणा तैनात करण्यात आली होती.

या विशेष मोहिमेसाठी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी स्वतः हजर राहून नेतृत्व केले. ऑपरेशनपूर्वी रात्री २२.३० वाजता सर्व अधिकारी व अंमलदारांना सविस्तर सूचना देऊन ब्रीफिंग करण्यात आले व ठिक २३.०० वाजता विविध ठिकाणी पथके रवाना करण्यात आली. अत्यावश्यक सेवा वगळता सुमारे ६० टक्के पोलिस मनुष्यबळ या मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आले होते. अमावस्या काळात मालमत्तेविषयक गुन्ह्यांची शक्यता लक्षात घेता मोटारसायकल व चारचाकी वाहनांद्वारे सतत पेट्रोलिंग करण्यात आले. जिल्ह्यातील संवेदनशील व महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची काटेकोर तपासणी करण्यात आली. तसेच हॉटेल, लॉज, धाबे, बसस्थानके, रेल्वे स्थानके, पेट्रोल पंप, बँका, एटीएम, सराफ लाईन तसेच निर्मनुष्य ठिकाणे व महत्त्वाच्या स्थळांची तपासणी करण्यात आली.

सदर ऑपरेशन दरम्यान जेलमधून सुटलेले आरोपी व रेकॉर्डवरील गुन्हेगार यांना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी करण्यात आली. तसेच फरार व वाँटेड आरोपींविरुद्ध विशेष मोहीम राबवून त्यांना अटक करण्यात आली. हिस्ट्रीशीटर गुन्हेगारांवर देखील लक्ष ठेवून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.



## विविध वृत्त...

### पैशासाठी विवाहितेचा छळ; सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१८ एप्रिल : लातूर : घर बांधण्यासाठी माहेरहून दहा लाख रुपये घेऊन ये, अन्यथा नांदविणार नाही, असे म्हणत विवाहितेचा पती, सासू, सासरे आणि दीराकडून छळ होत होता. दहा लाख रुपयांची मागणी करत विवाहितेला शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**फिर्यादी मानसी कुणाल इंगळे (वय ३४, हा. मु. मळवटी रोड, लातूर) यांचा कुणाल वसंत इंगळे सोबत विवाह झाल्यानंतर काही दिवसांतच त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ होऊ लागल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. रुद्राक्षनगर, म्हाडा कॉलनी येथे सासरी असताना पती कुणाल इंगळे, सासू सुनिता वसंत इंगळे, सासरे वसंत इंगळे, दीर आकाश वसंत इंगळे यांच्याकडून शिवीगाळ करुन शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. शिवाय, माहेरहून दहा लाख रुपये आणले नाही तर जिवे मारण्याची धमकी दिली जात होती. याप्रकरणी शुक्रवार (दि. १७) रोजी मानसी इंगळे यांच्या फिर्यादीवरुन सासरच्या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक संतोषकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यु. डी. हावा हे करीत आहेत**

### पेठ येथे डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१८ एप्रिल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती पेठ येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व बौद्ध बांधव आणि ग्रामस्थांनी सामूहिक 'बुद्ध वंदना' घेतली. यावेळी संपूर्ण परिसर 'जय भीम'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. यावेळी प्रा. करमाळे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाचा आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचा वेध घेतला. अध्यक्षस्थानी पेठचे सरपंच सचिन पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून पेठ सोसायटीचे चेअरमन धीरज पाटील, उपसरपंच शामअण्णा पाटील, विकास वाडकर, आणि ओम धरणे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक नामदेव मोटेगावकर तर सूत्रसंचालन स्वप्निल करवंजे यांनी केले. आभार सुभाष खंदाडे यांनी मानले. यशस्वितेसाठी जयंती समितीचे अध्यक्ष विशाल करवंजे, उमाकांत कांबळे, नंदकुमार कांबळे, बब्रुवान करवंजे, शैलेश कांबळे आणि पेठ गावातील सर्व प्रतिष्ठित ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.**

### आदर्श शिक्षिका पुरस्काराने दळवे सन्मानित

तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१८ एप्रिल : शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अलका भगवानराव दळवे यांना पुणे येथे ग.दी. माडगुळकर नाट्यगृहात जागतिक पातळीवरील शिक्षक दत्तात्रय वारे यांच्या हस्ते आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले परिश्रम, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी घेतलेले उपक्रम आणि विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्ये रुजविण्याचे कार्य याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना अलका दळवे यांनी हा सन्मान आपल्या सहकारी शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या सहकार्यामुळे मिळाल्याचे सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक सूर्यवंशी, सर्व सहकारी शिक्षक, शा.व्य. समितीचे पदाधिकारी, रवीद्र कुटवाडे व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे**

## उष्म्यापासूनबचावासाठी लातूरकरांची ज्यूस, थंड पेयांना पसंती

तभा वृत्तसेवा

**लातूर , दि. १८ एप्रिल :** वाढत्या काहिली आणि उष्म्यापासून बचाव करण्यासाठी लातूरकर दुपारच्या सुमारास झडाच्यासावलीचाशोध घेताना दिसून येत आहेत. त्याचप्रमाणे शरीर थंड ठेवण्यासाठी लिंबू शरबत, लस्सी, मठ्ठा अशा थंड पेयांना पसंती देत असून अशा थंड पेयांचीविक्री करणाऱ्या व्यावसायिकांकडे मोठी गर्दी होत असलेली पाहावयास मिळत आहे. लातूरच्या गांधी चौकासह शहराच्या अनेक चौकात ज्यूस साठी अशा प्रकारची गर्दी होताना दिसत आहे.यावर्षीच्या उष्म्याने कहर केला आहे. अगदी फेब्रुवारीच्या मध्यापासूनचसूर्य आग ओकतानादिसत होता. मार्चमध्ये काही काळ अवकाळी पावसाचे सावट राहिल्याने तेवढ्यापुरता उष्मा कमी झाला होता. मात्र, अवकाळी संपताच पुन्हा एकदा उष्णता भडकून उठल्याचे पदोपदी जाणवत आहे. मागच्या काही दिवसात उष्णता खूप वाढली आहे. दुपारच्या सुमारास रस्त्यावरील वाहतुकीचे प्रमाण घटल्याचे दिसून येत आहे.




हवामान विभागाने वातावरणाबाबत जरी केलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही तज्ज्ञांकडून केले जात आहे. काहीही झाले तरी आणखी महिना दोन महिने उष्णता कायम राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अधून मधून अवकाळी पाऊस होणार असल्याचे सांगण्यात येत असल्याने अवकाळी पाऊस वारंवार होत राहिला तर ऐन पावसाळ्यात पावसाचे आगमन लांबण्याची भीतीही शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

जमीन पूर्णतः तापली तरचपावसाळ्यात पाऊस व्यवस्थित होतो, अन्यथा शेतकऱ्यांना त्यासाठी आकाशाकडे डोळे लावून बसावे लागते,असे आतापर्यंत अनेकदा झाल्याचे सर्वांनी पाहिले आहे. आजघडीला उष्णता वाढत असली तरी पुढच्या काही दिवसात पुन्हा एकदा पावसाळ्यासारखे वातावरण होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पावसाळ्याचाअनुभव घेण्याची पाळी परत एकदा लातूरकरांवर येते की काय ? असेही बोलले जात आहे. हे हवामान तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे होईल तेव्हा होईल. परंतु सध्या मात्र लातूरच्या नागरिकांना असह्य उष्म्याचा सामना करावा लागत आहे. असह्य उष्म्यापासूनबचाव करण्यासाठी कामाच्या धबडग्यातूनस्वतःला झडाच्यासावलीत घेऊन जाण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करताना दिसतो. अशातच झाडांची संख्या बऱ्यापैकी कमी झाल्याने आहेत त्या झाडांखाली लोकांची गर्दी होताना पाहायला मिळते.लातूर शहरातील महात्मा गांधी चूक सतत गर्दीने गजबजलेला असतो. या ठिकाणी लिंबू शरबत, मठ्ठा, लस्सी विक्री करणारे व्यावसायिक नियमित असतात. सध्याच्या वाढत्या गरमीमुळे या व्यावसायिकांना दुपारच्या सुमारास नेहमी ग्राहकांच्या गराड्यात राहावे लागत असल्याचे पाहायला मिळते. एखादी मशीन चालावी त्याप्रमाणे या विक्रेत्यांचे हात चालताना दिसतात. ग्राहकही त्यांच्याकडील शीतपेयांचा आस्वाद घेऊन तृप्त होताना दिसतात. सामान्य ग्राहकांना परवडतील असे दर ठेवल्याने ग्राहक मोठ्या हॉटेलमध्ये जाऊन ही पेय घेण्यापेक्षा रस्त्यावर उभा राहून गप्पांचा आनंद घेत थंड पेय चाखताना पाहायला मिळतात. गांधी चौकात लिंबू शरबत - लस्सीचा आस्वाद घेण्यासाठी ग्राहक अनेकदा प्रतिक्षेत असल्याचे दिसून येते. सकाळी अकरा वाजता सुरु झालेला हा व्यवसाय सायंकाळी साडेपाच - सहा पर्यंतहीचालू असल्याचे दिसून येते. हा हंगामी व्यवसाय सध्या तरी अतिशय जोमात असल्याचे पाहायला मिळत आहे.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१८ एप्रिल :** श्री छत्रपती शिवाजी विद्यालय मळवटी. ता. लातूर येथे भारतीय संविधानाचे जनक महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक युवराज शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या अभिवादन कार्यक्रमास जाकर अली सय्यद, श्रीकृष्ण पवार, श्रीमती वैभवी पवार, विलास गिरी, श्रीमती मंजुषा शिंदे, चंद्रकांत चोपले, मधुकर गरड, सुनील आगलावे व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापक शिंदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षण घेण्यासाठी कठोर परिश्रम आणि फार मोठा संघर्ष करावा लागला होता. तरीही त्यांनी समाजातील सगळ्यांसाठी परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण प्राप्त केले आणि जगासमोर स्वतःला सिद्ध करून दाखवले. समाजातील अस्पृश्यता आणि धर्म जातिभेद भाव या विरोधात त्यांनी लढा दिला. आपल्या स्वतंत्र भारत देशाचे ते पहिले कायदेमंत्री होते. तसेच भारतीय संविधानाचे जनक दलित लोकांच्या जीवनासाठी गुलामगिरीच्या व मागासलेपणाचा उपेक्षितांच्या जीवनामध्ये बदल करणारे तसेच स्वतःच्या विद्वत्तेचा वापर समाजासाठी आणि जनतेचे आयुष्य प्रकाशमय करण्यासाठी त्यांनी अहोरात्र काम केले.

### जिव्हाळा मैत्री ग्रुप लातूरतर्फे मान्यवरांचा गुणगौरव

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१८ एप्रिल : ग्रुप जिव्हाळा मैत्री लातूरच्या वतीने येथील जयक्रांती महाविद्यालयाच्या विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या मान्यवरांचा डॉ. नागोराव कुंभार व सीए. जगदीश तोष्णीवाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात विवेक सौताडेकर, जिल्हा परिषद सदस्या योगीता जाधव, त्रषीकेश राज, गिरीष पाटील, शितल मालू, बसवराज धरणे, प्रशांत घार, उमाकांत जाधव, अनंतराव पानकोरे, उमेश गिरवलकर, प्रणिता संतोष शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन जनार्दन खांडेकर यांनी केले.

## नारीशक्ती वंदन अधिनियम समर्थनात लातूरात महिलांची पदयात्रा

तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१८ एप्रिल :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या वतीने लोकसभेच्या विशेष अधिवेशनात नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक मांडले असल्याने या माध्यमातून महिलांना लोकसभा व विधानसभेमध्ये आरक्षण प्राप्त होणार आहे. हे विधेयक महिलांचा सन्मान वाढविणारे असल्यामुळे त्याच्या समर्थनार्थ शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी एकत्र येत पदयात्रा काढली होती. या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या पदयात्रेत डॉ. माया कुलकर्णी यांच्यासह विविध क्षेत्रातील महिलांनी यामध्ये सहभाग नोंदविला होता.



लोकसभेच्या विशेष अधिवेशनात नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक मांडले असून लवकरच याचे कायद्यात रुपांतर होणार आहे. या विधेयकामुळे लोकसभा, राज्यसभा यासह विधानसभा व विधान परिषदेमध्ये महिलांना आरक्षण प्राप्त होणार आहे. या आरक्षणाचा लाभ प्रत्येक क्षेत्रातील महिलांना मिळणार असून यामुळे कायदे निर्माण करणाजया सभागृहात महिलांना मोठ्या प्रमाणात स्थान प्राप्त होणार आहे. हे विधेयक महिलांचा सन्मान वाढविणारे असल्यामुळे याच्या समर्थनार्थ लातूरशहरातील महिलांनी एकत्र येवून गुरुवारी सायंकाळी गंजगोलाई ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क या दरम्यान पदयात्रा काढली होती. या पदयात्रेत शहरातील ज्येष्ठ महिला तज्ज्ञ डॉ. माया कुलकर्णी यांच्यासह डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, सौ. संजिवनी कराड, शितल मालू, रागिनी यादव, मीना गायकवाड, शोभा पाटील, स्वाती घोरपडे, ज्योती आवसकर आदींसह विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येनी सहभाग नोंदविला. या रॅलीत सहभागी झालेल्या महिलांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनापर घोषणाही दिल्या. गंजगोलाई येथील माता जगदंबादेवीची आरती करून या रॅलीस सुरुवात झाली तर संविधानकर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून या रॅलीची सांगता करण्यात आली.

सदर रॅलीत शोभा कोंडेकर, ॲड. शितल पाटील, ॲड. मिनाक्षी पाटील यांच्यासह शहरात असलेल्या विविध भजनी मंडळाच्या महिला, आशाताई, स्वामी समर्थ केंद्राच्या सेवेकरी तसेच विधी व वैद्यकीय क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयकाच्या समर्थनार्थ लातूर शहर जिल्हा भाजप महिला आघाडीच्या वतीने अध्यक्षा शितल मालू यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम राबविण्यात आले. सदर विधेयक सभागृहात आणल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद करून त्यांचे अभिनंदनासाठी तब्बल चार हजार पोस्टकार्ड पाठविण्यात आले. त्याच बरोबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क ते दयानंद महाविद्यालय यादरम्यान महिलांची बाईकरॅलीही काढण्यात आली होती. शहरातील विविध भागामध्ये स्वाक्षरी मोहीम व मिसकॉल अभियानही घेण्यात आले.

## रेन वॉटर हार्वेस्टिंग, विहीर पुनर्भरण मोहीम हाती घ्यावी

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे निर्देश

तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१८ एप्रिल :** आगामी मॉन्सून कालावधीत सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविला जात आहे. त्यामुळे संभाव्य पाणी टंचाई व मॉन्सूनचे उशिरा आगमन होण्याची शक्यता लक्षात घेवून पाणी पुरवठ्याबाचत सुक्ष्म नियोजन करावे. उपलब्ध जलसाठ्याचा चापर काटकसरीने करणे आवश्यक असून त्यासाठी जनजागृतीवर भर द्यावा. तसेच मॉन्सून पूर्वी जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग, विहीर पुनर्भरण मोहीम हाती घेण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शुक्रवारी येथे दिल्या.

लातूर जिल्ह्यातील विविध विकास कामे व संभाव्य पाणी टंचाईबाबत पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. स हकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार यांची या बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थिती होती. तसेच जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणच्या अधीक्षक अभियंता तथा प्रशासक रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.




सद्यस्थितीत पाणी टंचाईची तीव्रता कमी असली तरी जिल्ह्यातील काही गावांमध्ये टंचाईची समस्या जाणवू लागली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, तिथे तातडीने उपाययोजना मंजूर करून नागरिकांना पाणी पुरवठा करावा. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सध्या अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती, गळती रोखणे यासारख्या कामांना प्राधान्य देवून पाण्याचा अपव्यय टाळावा, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी दिल्या. लातूर शहराला पाणी पुरवठा होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. यासाठी आवश्यक प्रयोगशाळा उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिल्या जाईल, असे त्यांनी सांगितले.

सद्यस्थितीत महावितरणने पाणी पुरवठा योजनांची वीज खंडित करण्याची कार्यवाही करू नये. तांड्यावरील पाणी टंचाई निवारणासाठीही विशेष उपाययोजना हाती घेण्याची गरज आहे. यासा ठी तातडीने सर्वेक्षण करून पुढील कार्यवाही हाती घ्यावी. बंधारे, तलावातील गाळ उपसा करण्याची कार्यवाही मोहीम स्वरुपात राबवावी, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले. यावेळी सहक ार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिमन्यु पवार यांनीही पाणी पुरवठ्याबाबत सूचना मांडल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## निटूर येथे शिवाजी महाराज महाराजस्व अभियान यशस्वी



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. १८ :** तालुक्यातील निटूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

या समाधान शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या लोकाभिमुख योजना व सेवा नागरिकांना थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे व वगळणे, शेत रस्ता व पांदन रस्ता खुला करणे, मतदार यादीत नाव समाविष्ट व वगळणे, आरोग्य सेवा, ग्रामपंचायत व पंचायत समिती मार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा, आधार कार्ड दुरुस्ती, श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना आदींचा समावेश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निटूर पंचायत समिती सभापती डॉ सुनीता संतोष वाघमारे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, नायब तहसीलदार प्रवीण आळंदकर व कुलदीप देशमुख, तसेच जिल्हा परिषद सदस्य रोहित पाटील, अनिल व्यंकटराव सोमवंशी , निटूर चे सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी, डॉ संतोष वाघमारे , अण्णाराव जाधव, प्रताप भागवत सुडे, कडाजी सूर्यवंशी, आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात विविध विभागांचे १५ पेक्षा अधिक स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलच्या माध्यमातून अनेक गरजू लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले तसेच विविध योजनांची माहिती देण्यात आलीया समाधान शिबिराचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. तसेच या समाधान शिबिरामध्ये १३६९ लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच अनेक विभागाकडे आलेल्या तक्रारीचे त्याच दिवशी निराकरण करण्यात आले.शासनाच्या सेवा व योजना थेट गावपातळीवर उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे सामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी तहसीलदार निलंगा प्रसाद कुलकर्णी यांनी उपस्थित नागरिकांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. कुलदीपजी देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन मंडळ अधिकारी निळकंठ जाधव यांनी केले.

## आश्रमशाळेत आंबेडकर जयंती विधायक उपक्रमाने साजरी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि.१८ एप्रिल :** तालुक्यातील केळगाव येथील शिवाजी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा केळगाव तांडा येथे जगभरातील करोडो लोकांच्या मनावर ज्यांनी आपल्या विचारांने व कर्तुत्वाने अधिराज्य केले अशा युगपुरुष बोधिसत्व भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव ज्ञानाचे दीपस्तंभ अशा थोर क्रांतीसुर्य विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी एकलव्य मागास सेवा समिती मानखेडचे अध्यक्ष शिवाजीराव भिकाणे , सचिव सचिन भिकाणे , सहसचिव डॉ शशीकिरण भिकाणे यावेळी उपस्थित होते. तसेच प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक बुजारे सर माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक बैकरे सर व सर्व शिक्षक यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व सांस्कृतिक विभाग प्रमुख चिकुर्ते आर एन सर आणि त्यांचा मंच यांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी सुंदर नाटिका व गित सादर केले यावेळी सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.१८ एप्रिल :** महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभागा तर्फे पर्यावरण संवर्धन, डिजिटल सक्षमीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता व भविष्यकाम, महिला सबलीकरण, आरोग्य जागरूकता, साहित्याची ताकद, मानवी हक्क, वाहतूक शिक्षण, मोबाईल व्यसन आणि सामाजिक कार्य या विषयावर नुकतीच पोस्टर्स व घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील ४६ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

सामुदायिक कार्य या विषयात प्रथम क्रमांक द्वितीय वर्षातील ऋत्विक मोरे याने मिळविला.

साहित्याची ताकद या विषयात द्वितीय क्रमांक प्रथम वर्षातील रुपाली गोरे, मोरे वैष्णवी, गरुड पार्वती यांनी मिळविला.

महिला सबलीकरण या विषयात तृतीय क्रमांक द्वितीय वर्षातील ढेकले राजश्री, कांबळे अंकिता यांनी मिळविला.

प्रोत्साहनपर पारितोषिक प्रथम वर्षातील गवळी सुषमा हिला देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून सामाजिक प्रश्र्नांवर सजग अभिव्यक्ती सादर केली. आकर्षक पोस्टर व प्रभावी घोषवाक्यांमधून त्यांनी समाज जागृतीचा मोलाचा संदेश दिला.

वरील सर्व विजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले यावेळी मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, समाजकार्य विभाग प्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.रमेश तडवी, ग्रंथपाल डॉ.प्रमोद सराफे, प्रो.डॉ.संजय गवई, परीक्षक डॉ.अमित पवार व प्रा.भाग्यश्री भुजबळ यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक करताना प्रा.रमेश तडवी म्हणाले की, स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढते व सामाजिक जाणीव दृढ होते. भाषा, साहित्य व कला यांचा संगम समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचा ठरतो. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आपल्या महाविद्यालयातील समाजकार्य विभाग हा शैक्षणिक विकासासोबत सामाजिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये अग्रभागी असतो. समाजकार्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समाजाभिमुख व्यक्तिमत्व घडते. समाजातील गरजा आणि समस्यांची त्यांना जाण असते तेव्हा भविष्यात आपण विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये उज्वल यश संपादन करावे अशी सदिच्छाही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

# रेशीम उद्योगात एक हजार शेतकरी सहभागी झाले तर औशातच खरेदीची हमी : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. १८ एप्रिल :** रेशीम उद्योग शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा असून शासनाच्या अनुदानामुळे सुरुवातीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. कमी पाण्यात अधिक उत्पन्न देणारा उद्योग असून भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरु शकतो. या रेशीम उद्योगात औसा मतदारसंघातील एक हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला तर त्यांच्या रेशीम उत्पादनाची
खरेदी औसा बाजार समितीमार्फत करण्याची ग्वाही आ. अभिमन्यू पवार यांनी दिली.

औसा येथे शनिवार, दि.१८ रोजी रेशीम उद्योगासंदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. कमी पावसाच्या परिस्थितीतही शाश्र्वत व नियमित उत्पन्न मिळवून देणारा प्रभावी पर्याय म्हणून रेशीम उद्योगाकडे वळण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.या बैठकीस उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, जिल्हा रेशीम अधिकारी एस. बी. वराट, सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीशैल्य बिराजदार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तर शेतकरी प्रतिनिधी म्हणून सिध्देश्र्वर कारले, बंकट बिराजदार, प्रशांत भोसले यांनी रेशीम उद्योगातील आपल्या अनुभवांवर आधारित मनोगत व्यक्त केले.




या बैठकीत महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. महिलांनी रेशीम उद्योगात सक्रिय सहभाग घेतल्यास त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळेल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.
रेशीम उद्योगाचे फायदेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. तुती लागवडीसाठी कमी पाणी लागते, तर 'महारेशीम अभियान' अंतर्गत तीन वर्षांत प्रति एकर सुमारे ४लाख ३२ हजार रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध होते. एकदा तुती लागवड केल्यास अनेक वर्षे सातत्याने उत्पन्न मिळते आणि रेशीम अळ्यांच्या संगोपनातून दरमहा नियमित उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होतो. याशिवाय उरलेला पाला जनावरांसाठी पौष्टिक चारा म्हणून उपयोगी पडतो.

एकंदरीत, कमी पावसाच्या भागातील शेतकऱ्यांसाठी रेशीम उद्योग हा केवळ पर्याय नसून आर्थिक प्रगतीचा खात्रीशीर मार्ग ठरत असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले. शासनाच्या योजनांचा लाभ, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि महिलांचा वाढता सहभाग यामुळे या उद्योगाचा विस्तार होण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## बामणी समाधान शिबिरातून जनतेचे समाधान झाले पाहिजे :आ. रमेशअप्पा कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.१८ एप्रिल :** देशाची यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि विकास पुरुष राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या या योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत असून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिरातून जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्र्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेला समाधान द्यावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर तालुक्यातील मौजे ममदापूर येथे कासारखेडा मंडळाच्या आयोजित समाधान शिबिराचे उद्धाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले. याप्रसंगी तहसिलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, भाजपा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, शिव पाणंद रस्ता समिती सदस्य सुरज शिंदे, अनिल भिसे, दिपक वांगस्कर, गोविंद नरहरे, विजयकुमार मलवाडे हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विविध गावचे सरपंच, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. व्यंकटराव पाटील यांचे निधन; आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्याकडून सांत्वन

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी दि. १८ :** देवणी तालुक्यातील चवणहिप्परगा येथील मूळ रहिवासी आणि उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक शिक्षण क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व प्राध्यापक व्यंकटराव पाटील यांचे १ एप्रिल रोजी वयोमानानुसार निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पाटील परिवारावर कोसळलेल्या दुःखाच्या प्रसंगी माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन सांत्वन केले.



दिवंगत प्रा. व्यंकटराव पाटील हे ग्रामविकास अधिकारी बब्रुवान पाटील आणि उदगीर नगर परिषदेचे माजी सदस्य तथा भाजपचे सक्रिय कार्यकर्ते एड. दत्ताजी पाटील यांचे वडील होत. निलंगेकर यांनी पाटील बंधूंची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी देवणी तालुका भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष शिवराज बिरादार, माझी जि प सदस्य प्रशांत पाटील जवळगेकर, माजी समाज कल्याण सभापती संजय दोरवे शिरूर अनंतपाळ भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष मंगेश पाटील , बाळू पाटील नेकनाळकर यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

प्रा. व्यंकटराव पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक विद्यार्थी घडवले. एक आदर्श शिक्षक आणि सुसंस्कृत मार्गदर्शक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच आमदार निलंगेकर यांनी चवणहिप्परगा येथे जाऊन कुटुंबाची भेट घेतली. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील एक मार्गदर्शक हरपला आहे. या कठीण काळात आम्ही सर्वजण पाटील कुटुंबाच्या सोबत आहोत, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या सांत्वन भेटीवेळी परिसरातील भाजप पदाधिकारी, गावकरी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. १ एप्रिल रोजी झालेल्या त्यांच्या निधनामुळे केवळ चवणहिप्परगाच नव्हे, तर संपूर्ण देवणी आणि उदगीर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बामणी येथील जळीतग्रस्त कुटुंबीयास आ. कराड यांच्याकडून मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.१८ एप्रिल :** पोटाची खळगी भरण्यासाठी झाडू तयार करून विक्री करणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील श्रीहरी कांबळे यांच्या घरास मध्यरात्री अचानकपणे आग लागून झालेल्या दुर्घटनेत संपूर्ण संसार जळून खाक झाला. संपूर्ण कुटुंब उघड्यावर आल्याने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी सदरील कुटुंबीयास तातडीने संसार उपयोगी साहित्यासह इतर मदत करून दिलासा दिला आहे.

गेल्या दोन पिढ्यापासून झाडू तयार करून विक्री करणे त्यातून मिळालेल्या चार पैशात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील सत्तर वर्ष वयाचे श्रीहरी लालबा कांबळे यांच्यासह कुटुंबात सहाजण असून हे सर्वजण झाडू बनवण्याचा व्यवसाय करतात गेल्या दोन पिढ्यापासून या व्यवसायावर हे कुटुंब अत्यंत आनंदी आणि सुखी जीवन जगत होते.

गेल्या १५ एप्रिल २०२६ रोजीच्या मध्यरात्री अचानकपणे शॉर्ट सर्किट होऊन झाडू बनविण्याच्या कच्च्या मालाला आग लागून झाडूच्या कच्च्या मालासह घरातील सर्व कपडे, अन्नधान्य संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले. यात दोन अडीच लाखाचे नुकसान होऊन काही क्षणातच हे संपूर्ण कांबळे कुटुंबीय उघड्यावर आले.

सदरील घटनेची माहिती समजतात भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी श्रीहरी कांबळे आणि त्यांच्या कुटुंबातील मालनबाई कांबळे, लक्ष्मण कांबळे, गजानन कांबळे, राम कांबळे, सीता कांबळे, कल्याण कांबळे या सर्वांना दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून, पांघरून, संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडी, किराणा साहित्य यासह सर्व प्रकारची तातडीची मदत त्याचबरोबर जळीतग्रस्त कांबळे कुटुंबीयास तात्काळ शासनाची घरकुल योजना मंजूर करून देण्यात यावी अशी सूचना तहसिलदार सौदागर तांदळे यांना केली.

याप्रसंगी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, प्रताप पाटील, सुरज शिंदे, गोविंद नरहरी विजयकुमार मलवाडे, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, ज्ञानोबा शेळके, मारुती शिंदे, आदिनाथ मुळे, सतीश बिराजदार, रुपेश काळे सुरेखा पुरी, सचिन साबदे, सुरेश पाटील यांच्यासह अनेक जण होते.

## भर उन्हात नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ :** नगरपंचायतच्या भोंगळ व नियोजनशुन्य कारभारामुळे शहरात पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः भटकंती करावी लागत आहे.अनेक भागात नळाला नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने महिलांना आणि नागरिकांना घागर-बकीट घेऊन दूरवरून पाणी आणावे लागत आहे.



शहरातील काही वॉर्डमध्ये रस्ते व गटारींची कामे सुरू असून शहरातील काही भागात नगरपंचायत व लोक वाट्यातून बोर घेण्यात आले असून या बोरचे पाणी शहरात विविध विकासकामे चालू असून गुत्तेदार या बोरचे पाणी रस्ता करण्यासाठी वापरत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या भागात नागरिकांना पाणी मिळत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असून तसेच शहरात पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन उघडी पडली असून पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उन्हाच्या तीव्र झळा सहन करत महिला पाण्यासाठी रांगा लावताना आणि दूरवरून पाणी आणताना दिसत आहेत. शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे की,नगरपंचायतीने पाणीपुरवठ्याबाबत तातडीने योग्य नियोजन करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा. अन्यथा येत्या काळात नागरिकांच्या संतापाला सामोरे जावे लागेल.

दरम्यान,प्रशासनाने शहरातील या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी वार्ड क्रं २ मधील संदिप धुमाळे, सोनी चाकोते, मंगेश लांडगे, लक्ष्मी धुमाळे, प्रभावती तोंडारे, रमाकांत शेरसांडे, आशा लांडगे, हारूबाई मुचाटे, परमेश्वर कोरे, कमळाबाई शेरसांडे, शोभा पटणे या नागरिकांकडून होत आहे.

# नागेंद्र भारती मठाच्या सभागृहाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. १८ एप्रिल :** अहमदपूर शहरातील जाज्वल्य असलेल्या नागेंद्र भारती मठाच्या नुतन सभागृहाचे लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या हस्ते नुकताच संपन्न झाला.

अहमदपूर शहरातील नागेंद्र भारती मठामध्ये अक्कलकोटचे स्वामी समर्थ हे पाच सहा वर्षे वास्तव्यास होते. नागेंद्र भारती महाराजांना गुरू करुन भारती महाराजांचे शिष्य म्हणून अनेक काळ अक्कलकोटचे स्वामी समर्थ सदरील मठामध्ये वास्तव्यास होते. काही काळ नागेंद्र भारती मठाचे मठाधिपती म्हणून गादीवर बसले होते. अशा या जाज्वल्य व पवित्र असलेल्या नागेंद्र भारती मठामध्ये आज स्वामी समर्थांची पुण्यातिथी हजारो भक्तांच्या उपस्थिती मध्ये साजरी करुन मान्यवरांच्या हस्ते येथील नुतन सभागृहाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. प्रादेशिक पर्यटन विभागाकडून भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांच्या पुढाकाराने २० लक्ष रु. विकास निधी आणुन सुंदर व देखणी वास्तू उभी केली आहे. सदरील सभागृहाचा लोकार्पण सोहळयच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार बब्रुवान खंदाडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा अध्यक्ष दिलीपराव



देशमुख, माजी नगराध्यक्ष भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. भारत भाऊ चामे, लोकनियुक्त नगराध्यक्ष ॲड. स्वप्नील व्हते, तहसीलदार उज्वला पांगारकर, नंदकुमार कोणाले, नगरसेवक ॲड. अजिंक्य चामे, हणमंत देवकते,माजी नगरसेवक धनंजय जोशी, कुलदीप हाके,विशाल तोंडचिरकर, अनिल पुरी, नगरसेवक संदीप चौधरी, बालाजी आगलावे,गणेश हालसे, पंचायत समितीचे माजी सदस्य माणिक नरवटे,बालासाहेब होळकर यांच्या सह अनेक जण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी केले. लोकार्पण सोहळा व स्वामी समर्थांची पुण्यातिथी सोहळा यशस्वी करण्यासाठी मठाधिपती रमेश भारती, बालाजी गिरी, सोनू गिरी, बळी पुरी, संकेत गिरी, श्रीधर गिरी, बालाजी बन, प्रल्हाद पुरी, सतिश गिरी,संजय भारती,सोमनाथ गिरी,पिंन्टू भारती,शिवा भारती, हणमंत गिरी,शिवाजी गिरी,राजू पुरी,सतिष गिरी,शिवाजी गिरी, दत्ता पुरी, यांच्या सह अनेकांनी अथक परिश्रम घेऊन सोहळा यशस्वी केला.बालाजी गिरी यांच्या वतीने हजारो भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## आज मातोळ्यात किर्तन सोहळ्याचे आयोजन





**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. १८ एप्रिल :** माजीमंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त भव्य व अध्यात्मिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. १९ रोजी सायंकाळी ७:३० वाजता तालुक्यातील मातोळा येथील श्री माधवराव भोसले हायस्कूल येथे पार पडणार आहे.

प्रसिद्ध कीर्तनकार संतचरणरज ह.भ.प. श्री बाळकृष्ण दादा वसंतगडकर कराड, जि. सातारा यांचे प्रभावी व भावस्पर्शी कीर्तन होणार असून, त्यांच्या ओजस्वी वाणीमुळे उपस्थितांना अध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळणार आहे.

या सोहळ्याचे आयोजन चेअरमन श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना श्याम बापु भोसले तसेच जिल्हा परिषद सदस्य मातोळा गट सौ. दिपाली श्याम भोसले यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. समस्त ग्रामस्थ मातोळा यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या निमित्ताने परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जवाहर नवोदय विद्यालयात संकुलस्तरीय क्रीडा स्पर्धांना प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ एप्रिल -**

जवाहर नवोदय विद्यालयात दोन दिवसीय संकुलस्तरीय क्रीडा स्पर्धांना १६ एप्रिल रोजी प्रभारी प्राचार्य डी. व्ही. बडे यांच्या हस्ते हिरवा ध्वज दाखवून प्रारंभ झाला.



या स्पर्धेत बीड, छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार, नाशिक, पालघर, पुणे, धुळे व धाराशिव येथील सुमारे २०० खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पर्धा १४, १७ व १९ वयोगटात होत असून धावणे, गोळाफ`क, भालाफेक, उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, क्रॉस कंट्री व अडथळा शर्यत अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. या स्पर्धेतून जुलैमध्ये होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.

स्पर्धा पंच व क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडत असून विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# मान्सूनपूर्व जलस्रोतांची कामे पूर्ण करा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**



जल जीवन मिशन अंतर्गत सर्व जलतारे, शोषखड्डे तसेच पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची कामे मान्सूनपूर्व पूर्ण करून हर घर जल योजनेचे उद्दिष्ट वेळेत साध्य करावे, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी दिल्या.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत हर घर जल योजना, जल सेवा अभियान आणि जल जीवन योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात दि. १७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियंवदा महाडदळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस. एस. कटकधोंड, कनिष्ठ भूवैज्ञानिक एम. आर. डोंगरे आदी उपस्थित होते. बैठकीत जल जीवन मिशनअंतर्गत उद्धव विहिरी शेजारी जलतारा अंतर्गत शोषखड्डे करणे, जलताराची कामे २५ एप्रिलपासून सुरू करून मान्सूनपूर्व सर्व कामे तांत्रिक बाबींसह पूर्ण करणे, तसेच पूर्ण झालेल्या कामांचे जिओ-टॅग फोटो अपलोड करण्यावर भर देण्यात आला. यासोबतच जल जीवन मिशन योजनांच्या उद्धवाजवळ आवश्यक कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तसेच गावांमध्ये पाण्याची क्षमता अधिक असलेल्या हातपंप व विंधन विहिरी शेजारी शोषखड्डे तयार करणे, पिण्याच्या पाण्याच्या जलकुंभांची स्वच्छता मोहीम राबविणे, मान्सूनपूर्व जैविक व रासायनिक तपासणी करणे, तसेच सर्व पाणी स्रोतांची तपासणी करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. रिचार्ज शाफ्टच्या कामांची स्वच्छता मोहीम राबविण्यावरही भर देण्यात आला.

या बैठकीस उमरगा, धाराशिव, भूम, तुळजापूर, परंडा व वाशी येथील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जेवळी येथे 'बसवरत्न पुरस्कार' सोहळा २१ एप्रिलला

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ एप्रिल -**









लोहारा तालुक्यातील जेवळी येथे महात्मा बसवेश्वर यात्रा कमिटीच्या वतीने सुरू करण्यात आलेला जेवळी बसवरत्न पुरस्कार - उत्सव गुणरत्नांचा, सन्मान कर्तृत्वाचा हा उपक्रम यंदाही उत्साहात पार पडणार आहे. येत्या २१ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता बसवमंच, बाजारपेठ येथे पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

महात्मा बसवेश्वर यात्रेनिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. मानवता हाच धर्म या विचारातून सर्व समाजघटकांचा सहभाग ठेवत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यंदाच्या बसवरत्न पुरस्कारासाठी संतोष उपासे, सुनील देशपांडे, वसंतराव पोतदार, मल्लिनाथ सोळसे, बाबा राठोड, पांडुरंग होनाजे व विशाल होनाजे यांची निवड करण्यात आली आहे.

## आरसोली शाळेत डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ एप्रिल -**

तालुक्यातील आरसोली येथील जिल्हा परिषद शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन समिती अध्यक्ष दिपक नागटिळक यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे व गीतांच्या माध्यमातून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. जयंतीनिमित्त निबंध, वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांसाठी तीन तासांचा वाचन उपक्रमही घेण्यात आला. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



कार्यक्रमास मुख्याध्यापक बाळासाहेब भगत, शिक्षक, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

## हभप. संजय बाबा पाचपोर महाराजांवरील टीकेचा जाहीर निषेध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार, रामायणाचार्य व गोसेवक म्हणून परिचित असलेल्या ह.भ.प. गुरुवर्य संजय बाबा पाचपोर महाराज यांच्यावर काही व्यक्तींनी केलेल्या अवमानकारक वक्तव्यांचा सर्व स्तरातून तीव्र निषेध व्यक्त होत आहे.

भाविकांमध्ये व्यक्त होत असलेल्या भावना अशी की, वारकरी संप्रदायाचे भूषण असलेल्या संतस्वरूप व्यक्तिमत्त्वावर टीका करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे असून, यामुळे त्यांच्या कार्यावर कोणताही परिणाम होत नाही; उलट टीका करणाऱ्यांच्या अज्ञानाचेच दर्शन घडते.

संजय बाबा पाचपोर महाराज यांनी आपल्या आयुष्यात वैयक्तिक स्वार्थ न ठेवता समाजकार्यास प्राधान्य दिले आहे. अनेक सेवाभावी संस्थांना त्यांनी मदत केली असून हजारो जीर्ण मंदिरांचा जीर्णोद्धार, बालसंस्कार शिबिरांद्वारे मुलांमध्ये चांगले संस्कार रुजविणे अशी विविध कामे त्यांनी केली आहेत.



तसेच शेकडो अनाथ मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत, गरीब कुटुंबांतील मुलामुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य आणि गोशाळांच्या माध्यमातून हजारो गायींचे संरक्षण करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. पळसखेड (ता. चिखली) येथील डॉ. पालवे यांच्या सेवा संकल्प प्रतिष्ठानला त्यांनी नवसंजीवनी दिल्याने तेथे आज अनेक बेघर मनोरुग्णांना आधार मिळत आहे.

याशिवाय १०० हून अधिक गोशाळांना मदत केली जात असून, वैशाली बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्था अंतर्गत मंगरूळ पाटी (ता. कळंब, जि. धाराशिव) येथील नवजीवन गोशाळेतही महत्त्वपूर्ण कार्य पाचपोर बाबा यांच्या आशीर्वादाने सुरू आहे. संस्थेच्या अध्यक्षा वैशाली बारकुल यांच्या मार्गदर्शनाखाली गोसेवा सातत्याने सुरू असल्याचे सांगण्यात आले.

संत हे समाजाला सन्मार्ग दाखवणारे दीपस्तंभ असतात. त्यांच्या कार्यावर टीका करणे म्हणजे समाजहितालाच विरोध करण्यासारखे असल्याने अशा प्रकारच्या वक्तव्यांचा सर्व स्तरातून जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

## बालाजी वडजे यांना पत्रकारिता पुरस्कारानिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ एप्रिल -**

मराठी पत्रकार संघाच्या मराठवाडा स्तरीय कै. अनंत भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्कार स्पर्धेत 'शोध वार्ता' गटात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल बालाजी वडजे यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला.

हा पुरस्कार पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन प्रदान करण्यात आला. हणुमान ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेचे चेअरमन नानाराव भोसले व भाजप नेते विजयकुमार सोनवणे यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी पत्रकारितेतील जबाबदारी व समाजाप्रती बांधिलकी अधोरेखित करत वडजे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

## पवनचक्की साहित्य चोरी प्रकरणी ५ आरोपी जेरबंद

### ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**



बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उमरेगव्हाण शिवारात पवनचक्कीवरील दोन सुरक्षारक्षकांना दोरीने बांधून मारहाण करत ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याच्या तारा व रोख रक्कम लंपास केल्याप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई करत ५ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून तब्बल ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.७ एप्रिल रोजी घडलेल्या या घटनेनंतर बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्ह्यातील अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. धाराशिव जिल्ह्यात यापूर्वीही पवनचक्की साहित्य चोरीचे प्रकार घडल्याने हा गुन्हा अतिसंवेदनशील मानला जात होता.


या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेला तपासाची जबाबदारी देण्यात आली होती. दि. १६ एप्रिल रोजी सपोनि सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ढोकी-कळंब रोडवरील गोविंदपूर पाटी येथे सापळा रचून ५ संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून २ महिंद्रा स्कॉर्पिओ, १ बोलेरो वाहन, तांब्याच्या तारा व रोख रक्कम असा एकूण ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चौकशीत आरोपींनी मेंढा, उमरेगव्हाण, चिकुंद्रा, गंधोरा, कन्हेरवाडी व वाशी परिसरात पवनचक्की साहित्य चोरी केल्याची कबुली दिली. तसेच चोरीदरम्यान सुरक्षारक्षकांना घाबरवण्यासाठी मारहाण केल्याचेही त्यांनी सांगितले. या आरोपींकडून दरोडा व चोरीचे एकूण ८ गुन्हे उघडकीस आले आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सुनिल कालिदार शिंदे (रा. ढोकी), लखन बापू पवार (रा. उपळा), सिद्राम पोपट पवार (रा. वरुडा), उद्धव बापू शिंदे (रा. बावी) व विक्रम लक्ष्मण पवार (रा. खामकरवाडी) अशी आहेत. त्यांच्या इतर साथीदारांचा पोलीस शोध घेत आहेत.

सदर आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी बेंबळी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. विनोद इज्जपवार, सपोनि. सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# तुळजापूरचा प्रणव जाधव एमपीएससी परीक्षेत राज्यात प्रथम

### देवसिंगा या छोट्याशा गावातील प्रणवच्या जिद्द, सातत्य आणि स्वप्नांचा विजय



**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

धाराशिव - तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा या छोट्याशा गावातून मोठं स्वप्न पाहणाऱ्या प्रणव नरसिंग जाधवने आपल्या अथक परिश्रमांच्या जोरावर महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (चझडउ) परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावत इतिहास रचला आहे.

नगर रचना व मूल्यांकन संचालनालय अंतर्गत असिस्टंट टाऊन प्लॅनिंग ऑफिसर (वर्ग-१) या पदासाठी झालेल्या स्पर्धात्मक परीक्षेत अव्वल स्थान मिळवून त्याने केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण तुळजापूर तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. प्रणवचे प्राथमिक शिक्षण तुळजापूर येथील लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूलमध्ये झाले. त्यानंतर तुळजाभवानी विद्यालय आणि मविराज शिंदे प्रशाला येथे त्याने माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. विज्ञान शाखेत बारावीपर्यंतचे शिक्षण त्याने लातूरच्या दयानंद महाविद्यालयातून घेतले.

पुढे पुण्यातील एमआयटी संस्थेतून अभियांत्रिकी पदवी पूर्ण करत असतानाच त्याच्या मनात चझडउची ठाम दिशा तयार झाली. २०१८ पासून प्रणवने एमपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. सुरुवातीच्या टप्प्यातील अडचणी, अभ्यासाचा ताण आणि स्पर्धेची तीव्रता यांचा सामना करत त्याने स्वतःला सातत्याने घडवत ठेवले. नाशिकचे मार्गदर्शक मोहन वाणी आणि पुण्यातील विविध क्लासेसच्या मदतीने त्याने अभ्यासाची योग्य दिशा ठरवली.

नगररचना विभागाच्या परीक्षेत केवळ दुसऱ्याच प्रयत्नात राज्यात प्रथम येण्याचा मान त्याने मिळवला. हे यश केवळ बुद्धिमत्तेचे नव्हे, तर नियोजन, संयम आणि आत्मविश्वासाचेही प्रतीक आहे. प्रणवच्या यशामागे त्याचे वडील प्रा. नरसिंग जाधव आणि आई यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे प्रणवला कठीण प्रसंगातही प्रेरणा मिळत राहिली.

प्रणव जाधवचा पुढील उद्देशही तितकाच व्यापक आहे. नगररचना विभागात काम करताना वाढते शहरीकरण, लोकसंख्येचा ताण आणि नियोजनातील आव्हाने यावर संशोधनात्मक काम करण्याचा त्याचा मानस आहे. समाजोपयोगी कार्य करत राज्याच्या विकासात हातभार लावण्याची त्याची तयारी आहे.

### 'प्लॅन बी' पण तितकाच महत्त्वाचा...

नव्याने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संदेश असून चझडउ हीच प्लॅन  म्हणून पाहा. मात्र प्लॅन इ म्हणून पदवी किंवा नोकरीचा पर्याय ठेवा. एक स्पष्ट उद्दिष्ट ठरवा, वेळेचे नियोजन करा आणि सर्व परीक्षा अनुभव म्हणून द्या; पण लक्ष एकाच ध्येयावर केंद्रित ठेवा. श्रेय कठोर परिश्रम, सातत्य आणि स्वप्नांवरील दृढ विश्वास महत्वाचा आहे. सध्याच्या काळात स्पर्धा प्रचंड वाढली असून जागा मर्यादित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी फक्त अभ्यास न करता स्मार्ट नियोजन, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सराव यांवर भर द्यायला हवा.

**-प्रणव जाधव** ( महाराष्ट्र टॉपर)

### तुळजापूरसाठी अभिमानाचा क्षण...

प्रणवच्या यशामुळे तुळजापूर तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातूनही उच्च ध्येय गाठता येते, याचा जिवंत आदर्श त्याने निर्माण केला आहे. प्रणवने अभियांत्रिकी शिक्षण घेत असतानाच चझडउ करण्याचा निर्धार केला होता. त्याने जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणे अभ्यास करून हे यश मिळवले. हे यश आमच्या कुटुंबासाठी तसेच तुळजापूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**- प्रा. नरसिंग जाधव** (प्रणवचे वडील)

या उल्लेखनीय यशाबद्दल राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ. गोविंद काळे यांच्या हस्ते प्रणवचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. पांडुरंग शिवशरण, डॉ. सतीश महामुनी, प्रा नागनाथ कदम, भोसले गुरुजी यांनी शाल व फेटा देऊन त्याचा सन्मान करण्यात आला. प्रणव जाधवची यशोगाथा ही केवळ एका विद्यार्थ्याची कहाणी नाही, तर हजारो स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक आहे.

योग्य दिशा, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार होऊ शकते, हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.

## उमरगा आयटीआयमध्ये डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ एप्रिल -**

हुतात्मा वेदप्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात संतोष वकारे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व कायदेविषयक कार्यावर मार्गदर्शन करत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्ते माधव माने यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासावर प्रकाश टाकत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश विद्यार्थ्यांनी आचरणात आणावा, असे आवाहन केले.

यावेळी सुभाष इंगळे यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन नाईकवाडे यांनी केले, तर गट निदेशक नागनाथ माकने यांनी आभार मानले. कार्यक्रमास मान्यवरांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग तहसिल कार्यालय लोहारा.**
**(दंडणिय विभाग)**

**जाहीर प्रगटन**

**जा.क्रं.२०२५/संकिर्ण/जन्म-मृत्यू/नोंदवही क्रं. १३७/कावी- दिनांक १३/०४/२०२६**

समस्त गावकरी हिप्परगा (रवा) ता. लोहारा जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयास **श्री/श्रीमती. नंदकुमार दिगंबर लोहार रा. हिप्परगा (रवा)** यांनी मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केली आहे.

**मृत्यू झालेल्याचे नांव- श्री/श्रीमती. दशरथ हरीबा लोहार** सदरील व्यक्तीचा हिप्परगा (रवा) या ठिकाणी दिनांक २०.०३.२००२ या दिवशी मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक २०/०५/२०२५ या रोजी अर्ज केला आहे.

वरील मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार**
**लोहारा, ता. लोहारा**

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १५ वर्षी तरूणीवर अत्याचार; आरोपीवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

एका गावातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पीडितेच्या वैद्यकीय जबाबावरून ही कारवाई करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

माहितीनुसार, दि. १ एप्रिल २०२५ ते ४ एप्रिल २०२६ दरम्यान गावातीलच एका तरुणाने तू मला आवडतेस असे सांगून मुलीला तिच्या घरातून तसेच स्वतःच्या घरी नेऊन वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच हा प्रकार कोणाला सांगितल्यास तुला व तुझ्या आईला जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही नमूद करण्यात आले आहे.



या प्रकरणी पीडितेने दि. १६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून ढोकी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### कदमवाडी शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात

**तुळजापूर, दि.१८ एप्रिल -**

तुळजापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कदमवाडी येथे 'आय एम विनर' स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भैरवनाथ गिरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. सदस्या सीमाताई माडजे, पंचायत समिती सदस्य कृष्णा रोचकरी, केंद्रप्रमुख वाले साहेब, तुपारे सर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कोरेवाडीचे मुख्याध्यापक वडणे सर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त विशेष सन्मान करण्यात आला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### डॉ. दिग्गज दापके-देशमुख यांना वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कार

**लोहारा, दि.१८ एप्रिल -**

धाराशिव येथील डॉ. दिग्गज दापके-देशमुख यांना कै. अनंत भालेराव स्मृती वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला. धाराशिव नगरपालिका सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक होते. यावेळी मा.खा.प्रा. रविंद्र गायकवाड, मा.आ. ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, नगराध्यक्ष नेहा काकडे आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल लोहारा येथील मित्रपरिवाराने डॉ. दापके-देशमुख यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

### खामसवाडी येथे विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**खामसवाडी, दि.१८ एप्रिल -**

येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना सायकल वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कळंब पंचायत समिती सदस्या सुवर्णा पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण करण्यात आले. जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या योजनेअंतर्गत सात विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना सायकल देण्यात आल्या. ऋषिकेश वनकळस, अपेक्षा मगर, प्रतिक्षा पाटोळे, अंजली पाटोळे, मानसी पाटोळे, अर्चना मगर व पूजा पाटोळे या विद्यार्थ्यांना लाभ मिळाला. कार्यक्रमास उपसरपंच दयानंद पाटील, संस्थाध्यक्ष अशोक शेळके, उपाध्यक्ष सुरेश पाटील, कुलदीप घावटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका मंदाकिनी सावंत व संस्थेच्या सदस्यांनी केले.



### उंडरगाव येथे भैरवनाथ यात्रेनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**लोहारा, दि.१८ एप्रिल -**

लोहारा तालुक्यातील उंडरगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भैरवनाथ यात्रा महोत्सवानिमित्त एक दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ एप्रिल रोजी हा सोहळा पार पडणार आहे. सकाळी भैरोबा कावड मिरवणुकीने कार्यक्रमाची सुरुवात होणार असून, ११ वाजता हलगी कडकडाट होईल. त्यानंतर कावड भैरोबा मंदिराकडे गाजत-वाद्यांसह प्रस्थान करणार आहे. पुढे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ वाजता मल्लांसाठी भव्य कुस्ती मैदान भरविण्यात येणार असून, रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. पांडुरंग रेड्डी महाराज यांचे कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमाची माहिती यात्रा समितीचे सर्वेसर्वा बालाजी ढोबळे (पाटील) यांच्यासह दादासाहेब रवळे, हणमंत रवळे, गोरोबा ढोबळे आदींनी दिली असून, ग्रामस्थांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### खंडणी मागणीप्रकरणी चौघांवर गुन्हा

**वाशी, दि.१८ एप्रिल -**

वाशी फाट्याजवळील गायरानात काम करत असलेल्या महिलेकडून सहा लाखांची खंडणी मागून मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शोभा जाधव यांना आरोपींनी धमकी देत लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच मोबाईलही हिसकावून घेतल्याची तक्रार आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद असून पुढील तपास सुरू आहे.

# ११३ कोटींच्या जलप्रकल्पाला वेग; २३ गावांना मिळणार नवसंजीवनी

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती... डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून सुरु झालेला जलप्रकल्प पुन्हा कार्यान्वित होणार....**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री व माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या भगीरथ प्रयत्नातून सुरू झालेला महत्त्वाकांक्षी जलप्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याच्या दिशेने मोठी प्रगती होत आहे. प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी तब्बल ११३ कोटी रुपयांची मंजुरी मिळाल्यानंतर सध्या काम वेगाने सुरू असून पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित कामाच्या ठिकाणी भेट देऊन प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कामाचा दर्जा व गती लक्षात घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

परिसरातील २३ गावांसाठी जीवनदायी ठरणाऱ्या या योजनेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे गती मिळाली आहे. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ऑगस्ट महिन्यात या कामाचा शुभारंभ करण्यात आला होता. सध्या काम वेगाने सुरू असून लवकरच या २३ गावांच्या शिवारात पाण्याची समृद्धी पोहोचण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

डॉ. पद्मसिंह पाटील यांनी पाहिलेलं स्वप्न साकार करण्याची संधी मिळणे हे समाधानकारक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या पाहणीवेळी अधीक्षक अभियंता देशमाने (जलसंपदा-यांत्रिकी, नांदेड), कार्यकारी अभियंता नलवडे (पाटबंधारे विभाग क्र. २, उमरगा), कार्यकारी अभियंता सावंत (जलसंपदा-यांत्रिकी, नांदेड), कार्यकारी अभियंता वाघमारे (विद्युत विभाग, संभाजीनगर), उपविभागीय अधिकारी मोरे (जलसंपदा उपविभाग क्र. ०८, लोहारा), उपविभागीय अधिकारी तोंडारे (विद्युत विभाग, लातूर), शाखा अभियंता पारवे (लोहारा) यांच्यासह प्रवीण भद्रे, लिंबराज साळुंके, अहमद पठाण, सुधीर भोसले, अण्णासाहेब तरंगे, बालाजी लोखंडे, किशोर पाटील, काका शेळके, दिलीप सिंदफळे, हनुमंत पाटील, रणजित पाटील, किरण बनसोडे आदींसह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहिती न दिल्याने काटगाव ग्रामपंचायत सदस्याचे उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ एप्रिल -**

काटगाव (ता. तुळजापूर) येथील ग्रामपंचायत सदस्य सुर्यकांत कांबळे यांनी ग्राम पंचायतीकडून मागितलेली माहिती न मिळाल्याच्या निषेधार्थ गावातच दोन दिवसांचे उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

कांबळे यांनी गावच्या विकासासाठी आलेल्या निधीची व त्यातून झालेल्या कामांची माहिती मागितली होती. मात्र सदस्य असूनही माहिती न दिल्याने त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला, तरीही प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही दखल न घेतल्याने त्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला.

ग्रामपंचायतीच्या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, माहिती मिळाली नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

या उपोषणास सिद्धेश्वर कस्तुरे, धुळप्पा रक्षे, सुनिल रोकडे, कचरू पठाण, विशाल कस्तुरे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला आहे.

**आ. प्रविण स्वामी यांच्या सुचनेची दखल...**

## येणेगुर-तुगांव पुलावरील भगदाडाची तातडीने दुरुस्ती

**वाहनधारकांना दिलासा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील येणेगुर ते तुगांव दरम्यान बेन्नितुरा नदीवरील पुलावर पडलेल्या मोठ्या भगदाडाची दुरुस्ती अखेर पूर्ण करण्यात आली आहे. या घटनेमुळे वाहनधारकांमध्ये निर्माण झालेली भीती दूर होऊन वाहतुकीला मोठा दिलासा मिळाला आहे.

दोन दिवसांपूर्वी पुलावर मोठे भगदाड पडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. त्यामुळे या मार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. घटनेची माहिती मिळताच आमदार प्रविण स्वामी यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले होते.

प्रशासनानेही याची गांभीर्याने दखल घेत तातडीने कामाला सुरुवात केली. दि. १७ रोजी पुलाची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली. त्यानंतर आमदार स्वामी यांनी पुन्हा प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गुणवत्ता व सुरक्षिततेची खात्री केली. या पाहणीवेळी युवा नेते अजिंक्य पाटील, तसेच पीबीआय कंपनीचे सुभाष श्यामल, भगवान चव्हाण आणि संतोष जाधव उपस्थित होते.



दरम्यान, या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गावरील पुलांची नियमित तपासणी व देखभाल अधिक काटेकोरपणे करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## पारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रास नवीन इमारतीसाठी १.५ कोटी निधी मंजूर



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ एप्रिल -**

वाशी तालुक्यातील पारगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत आरोग्य सेवांचा आढावा घेऊन नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

जि.प. सदस्या सविता तळेकर यांनी आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीसाठी १.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती दिली. तसेच पिंपळगाव कमळेश्वर उपकेंद्रासाठी ४६ लाखांचा निधी मंजूर असून लवकरच कामास सुरुवात होणार आहे.

आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकेला ५ हजार रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली. सध्या जीर्ण अवस्थेतील इमारतीसाठी टेंडर प्रक्रिया लवकरच पूर्ण होणार असून दुरुस्ती, सजावट व औषध खरेदीसाठीही निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्णांसाठी स्वतंत्र बेड व्यवस्था व विशेष आरोग्य पथक तयार ठेवण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी खर्च व आगामी कामांचा प्रस्ताव सादर केला, ज्यास मंजुरी देण्यात आली.

बैठकीस सविता तळेकर, कोमल मोटे, डॉ. महेंद्रकर, डॉ. कुलकर्णी, सीडीपीओ भारती तसेच आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## जनगणना २०२६-२७ साठी शिक्षिकांना प्रगणक कर्तव्य नको

**भूम तहसीलदारांना निवेदन...**

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ एप्रिल -**

जनगणना २०२६-२७ साठी प्रगणक म्हणून शिक्षिकांची नियुक्ती करू नये, अशी मागणी भूम येथील तहसीलदार जयंत पाटील यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षिका व कर्मचारी यांना मोठ्या प्रमाणात प्रगणक म्हणून नेमण्यात आले असून याला महिला शिक्षिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. घरची जबाबदारी सांभाळून जनगणनेचे काम करणे अवघड असून, गावागावांत फिरून माहिती संकलन व ऑनलाइन नोंदणी करणे हे काम कष्टदायक ठरणार आहे.

अनेक शिक्षिका ५० वर्षांवरील असून त्यांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर यादीत २५८ प्रगणकांपैकी सुमारे ८५ टक्के जिल्हा परिषद शिक्षकांचा समावेश असून, खाजगी अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.

त्यामुळे सुमारे ६० शिक्षिका व कर्मचाऱ्यांना या कर्तव्यातून वगळण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी रुपाली गवळी, वनिता कोकाटे, सोनवणे, पाटील, मुळे आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

### ७० हजारांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी १६ एप्रिल रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत ८७ प्रकरणे नोंदवली. या कारवाईतून एकूण ७०,०५० रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला.

## कृषि महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू; १३ विद्यार्थ्यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ एप्रिल -**

व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील कृषि महाविद्यालयात १७ एप्रिल रोजी आयडियल ॲग्री सर्च प्रा. लि. या नामांकित कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू यशस्वीरीत्या पार पडला. अंतिम वर्षातील एकूण ३० विद्यार्थ्यांनी या निवड प्रक्रियेत सहभाग घेतला असून त्यापैकी १३ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली.

आयडियल ॲग्री सर्च प्रा. लि. ही कंपनी पिकांच्या आरोग्य व उत्पादनवाढीसाठी जैविक खते, सूक्ष्मअन्नद्रव्ये, वनस्पती वाढ नियंत्रक तसेच पाण्यात विद्रव्य खते यांसारख्या विविध कृषी निविष्ठा उपलब्ध करून देणारी अग्रगण्य कंपनी आहे. खत निर्मिती क्षेत्रातही कंपनीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कॅम्पस मुलाखती कंपनीचे डेव्हलपमेंट हेड वैभवकुमार एस. जाधव व रिजनल हेड प्रवीण महिंद यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. निवड प्रक्रियेत सांगुळे संकेत, माळी ज्ञानेश्वर, मदने सौरभ, अनुभूले अभिषेक, घेवारे अजय, घुगे अभिजित, शेंडगे अनिकेत, साखरे प्रतिक्षा, जाधव दिप्ती, पाठक राजश्री, गंजे सरिता, मस्के प्रतीक्षा आणि भक्ती चौधरी या विद्यार्थ्यांची निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कॅम्पस प्लेसमेंटच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शेख मोहसीन तसेच प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने मोलाचे योगदान दिले.

## सोनारीत धनंजय सावंत यांचा वाढदिवस उत्साहात

**विठ्ठल-रुक्मिनीची मूती भेट; अभीष्टचिंतन सोहळ्यास मोठी गर्दी**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ एप्रिल -**

जिल्हा परिषदेचे विद्यमान सदस्य, माजी उपाध्यक्ष (धाराशिव) तसेच माजी बांधकाम सभापती धनंजय सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त सोनारी येथे १६ एप्रिल रोजी भव्य अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास तालुकाभरातून कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



अभीष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सावंत यांची मुले सोहम आणि सखी सावंत यांनी समाजकार्यात सक्रिय सहभाग घेण्याची घोषणा केली. सोहम सावंत यांनी आपल्या भाषणातून प्रतिष्ठानच्या ध्येयधोरणांची माहिती देत सामाजिक कार्य अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमास मा.आ. सुजितसिंह ठाकूर, जि.प. सभापती भाऊसाहेब खरसडे, गौतम लटके, धनंजय मोरे, संजय गांधी निराधार योजना समितीचे तालुकाध्यक्ष जयदेव गोपने, भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद बप्पा रगडे यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सुजितसिंह ठाकूर म्हणाले की, विद्यमान आमदारांची बांधीलकी केवळ सत्ता आणि खुर्चीपुरती मर्यादित आहे. अशा परिस्थितीत मतदारसंघाला धनंजय सावंत यांच्या रूपाने सक्षम पर्याय मिळू शकतो. जनतेच्या मनात जे आहे, तेच माझ्या मनात आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात आसु गावचे उपसरपंच शशिकांत खुने, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक नेते तसेच अनेक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आसू ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने धनंजय सावंत यांना विठ्ठल-रुक्मिणी यांची मूर्ती भेट देऊन भव्य सत्कार करण्यात आला. आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

या सोहळ्यास भूम, वाशी आदी भागांतूनही सावंत समर्थक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.